CMYK

विनम्र अभिवादन

महाराणा प्रताप यांची
आज जयंती

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ९ मे २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक १८८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूरचे तापमान	
कमाल	४१.६ अंश से.
किमान	२७.२ अंश से.

१० मे शुक्रवार
अक्षय्य तृतीया
सुवर्ण खरेदीचा उत्तम मुहूर्त
www.onlinepng.com
www.pngadgilandsons.com
पु. ना. गाडगीळ आणि सन्स
१८३२
सोने | चांदी | रत्ने
सोलापूर
जुना एम्प्लॉयमेंट चौक
९७६६१ ५६५०१
पंढरपूर
राजलक्ष्मी मार्केट, स्टेशन रोड,
८९५६६ ३५७५८

महत्त्वाचे...

पंतप्रधान मोदी-राज ठाकरे शिवाजी पार्कवर येणार एकत्र

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी १७ मे रोजी दादरमधील शिवाजी पार्कवर होणाऱ्या सभेत एकाच मंचावर येणार आहे. पाचव्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचारासाठी महायुतीची मुंबईत सभा होणार आहे. यासाठी मोदी मुंबई दौऱ्यावर येणार असून, त्यांचा यावेळी रोड शो देखील होईल. मुंबई, ठाणे आणि आसपासच्या जिल्ह्यांसाठी निवडणूक प्रचाराच्या दृष्टिकोनातून ही सभा खूप खास असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज ठाकरे पहिल्यांदाच सभेच्या निमित्ताने एकत्र येणार आहे. मनसेचे सरचिटणीस आणि प्रवक्ते वागीश सारस्वत यांनी ही माहिती दिली आहे.

आमने-सामने

अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील

शरद पवारांचा ऐन निवडणुकीत बॉम्ब

मुंबई, ८ मे

लोकसभा निवडणुकीचा तिसरा टप्पा मंगळवारी पार पडला आणि राजकीय विश्लेषकांनी आकड्यांचा खेळ मांडणे सुरू केले. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवारांच्या एका वक्तव्याने चर्चांना उधाण आले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या आणखी जवळ जातील, तर काही पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, असे वक्तव्य शरद पवारांनी करून ऐन निवडणुकीत बॉम्बगोळा टाकला आहे.

शरद पवार यांनी म्हटले की, पुढील दोन वर्षांत विविध प्रादेशिक पक्ष काँग्रेससोबत अधिक समन्वयाने काम करतील. यापैकी काही प्रादेशिक पक्ष त्यांचे हित लक्षात घेऊन काँग्रेस पक्षात विलीन होतील. मग हाच निकष तुमच्या पक्षासाठी लागू होईल का, असा प्रश्न विचारला असता शरद पवार म्हणाले की, मला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणताही फरक दिसत नाही, वैचारिकदृष्ट्या आम्ही गांधी, नेहरूंची विचारसरणी मानणारे आहोत. मात्र, प्रादेशिक पक्ष काँग्रेससोबत एकत्र येण्याच्या प्रक्रियेबाबत मी आत्ताच काही सांगू शकत नाही. सहकाऱ्यांशी चर्चा केल्याशिवाय मी काहीही बोलणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जुळवून घेणे किंवा त्यांचे विचार पचनी पडणे हे आमच्यासाठी अवघड असल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

पक्ष चालवणे शक्य नसल्याने विलीनीकरणाची भाषा

देवेंद्र फडणवीसांची सणसणीत प्रतिक्रिया

धुळे, ८ मे

भविष्यात प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील या शरद पवारांच्या भविष्यवाणीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सणसणीत प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवारांना त्यांचा पक्ष चालवणे शक्य होणार नसल्याने त्यांनी विलीनीकरणाचे संकेत दिले, असे फडणवीस म्हणाले. धुळ्यातील शिरपूर येथे माध्यमांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, शरद पवारांना असे म्हणायचे असेल त्यांचा जो काही शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे तो काँग्रेसमध्ये विलीन करावा, असे त्यांच्या डोक्यात असेल. शरद पवारांनी यापूर्वी अनेक वेळा पक्ष तयार केले आणि काँग्रेसमध्ये गेले. आता त्यांनी संकेत दिले कारण त्यांचा पक्ष त्यांना चालवणे शक्य होणार नाही. लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवारांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करतील. या वादात काँग्रेसमधून शिवसेनेत आलेले माजी खासदार संजय निरुपम यांनी उडी घेतली. ते म्हणाले, बारामती हातून निसटून जाण्याची भीती शरद पवारांना आहे. त्यामुळे त्यांनी विलिनीकरणाचे सुतोवाच केले आहे. काँग्रेसनेही यापूर्वी अनेकदा हा प्रस्ताव दिला आहे. मात्र, यात तिढा होता तो म्हणजे सुप्रिया सुळेंचा. प्रदेश काँग्रेसची धुरा ही सुप्रिया सुळेंकडे द्यावी. पण, काँग्रेसने हा प्रस्ताव झिडकारून लावला. काँग्रेसमध्ये विलीन होण्याशिवाय पवारांकडे पर्याय नाही. कारण त्यांच्या मुलीकडे असलेले राजकीय कौशल्य बुडत्या पक्षाला वाचवण्यासाठी अपुरे असल्याचा टोला संजय निरुपम यांनी लगावला.

वर्णद्वेषी शिवीगाळ सहन करणार नाही

पित्रोदांच्या टिप्पणीवर पंतप्रधान मोदी संतप्त

'शहजाद्यांना' उत्तर द्यावेच लागेल

वृत्तसंस्था,
वारंगल, ८ मे

मला शिवीगाळ करता ते मी सहन करू शकतो. परंतु माझ्या देशवासीयांचा वर्णद्वेष करीत शिवीगाळ केली जाते, ती सहन केली जाणार नाही. त्वचेच्या रंगावर आधारित आपण एखाद्या व्यक्तीची गुणवत्ता ठरवू शकतो का, असा सवाल करीत आज मला खूप राग आला आहे. रंगावरून ते देशवासीयांना शिवीगाळ करीत आहेत. वर्णद्वेषी अपमान देश सहन करणार नाही. याचे उत्तर काँग्रेसच्या शहजाद्याला (राहुल गांधी) द्यावे लागेल, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी काँग्रेसचे नेते सॅम पित्रोदा यांच्या वादग्रस्त टिप्पणीवर निशाणा साधला.

तेलंगणातील वारंगल जिल्ह्यात आयोजित प्रचार सभेत बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, मला शिवीगाळ करता ते मी सहन करू शकतो. पण, माझ्या देशवासीयांच्या त्वचेच्या रंगावरून शिवीगाळ केली जाते, ती सहन केली जाणार नाही. त्वचेच्या रंगावर आधारित आपण एखाद्या व्यक्तीची गुणवत्ता ठरवू शकतो का, याचे उत्तर काँग्रेसच्या राजपुत्राला द्यावे लागेल.

काँग्रेसचे लोक भिंग लावून जागा शोधत आहेत. चौथ्या टप्प्यात काँग्रेसचा नेहमीचा भिंग पुरेसा ठरणार नाही. काँग्रेसला जागा शोधण्यासाठी मायक्रोस्कोप वापरावा लागेल, असा टोलाही मोदींनी लगावला. आज जगातील विविध देशांमध्ये अस्थिरता, अशांतता, संकट आहे. अशा परिस्थितीत भारताचे नेतृत्व चुकीच्या हाती देता येईल का, असा सवालही त्यांनी केला.

काँग्रेसने 'हात' झटकले

जयराम रमेश यांनी सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म एक्स हॅण्डलवर म्हटले आहे की, सॅम पित्रोदा यांनी भारताची विविधता दाखवण्यासाठी देशातील लोकांचे केलेले वर्णन अत्यंत दुर्दैवी आणि अस्वीकार्य आहे. या विधानापासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्वत:ला पूर्णपणे वेगळे करते.

काय म्हणाले होते पित्रोदा

सॅम पित्रोदांनी एका माध्यम समूहाशी बोलताना भारतीयांच्या दिसण्याबाबत आक्षेपार्ह टिप्पणी केली. ते म्हणाले, ईशान्य भारतातील लोक चिन्यांसारखे दिसतात. दक्षिण भारतीय हे आफ्रिकन लोकांसारखे आहेत. उत्तर भारतीय काहीसे गोरे आहेत. भारताच्या लोकशाही, स्वातंत्र्य आणि उदारतेच्या कल्पनेला आज राममंदिरामुळे आव्हान दिले जात आहे, असा दावाही त्यांनी केला.

सॅम पित्रोदा यांचा राजीनामा

वर्णभेदाच्या माध्यमातून भारताच्या विविध भागांत राहणाऱ्या लोकांची वादग्रस्त तुलना करणाऱ्या काँग्रेस नेते सॅम पित्रोदा यांनी आज इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी तो लगेच स्वीकारला. सॅम पित्रोदा यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटले की, वर्णभेदावरून सॅम पित्रोदा यांनी केलेली तुलना अत्यंत दुर्दैवी आणि अस्वीकार्य आहे.

केंद्र सरकारने उठवली तांदूळ निर्यातबंदी

नवी दिल्ली : केंद्र सरकारने बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीला परवानगी दिली आहे. मॉरिशसला १४ हजार टन बिगर बासमती तांदळाची निर्यात करण्याला मंजुरी देण्यात आली. किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली होती.

तब्बल १० महिन्यांनंतर केंद्र सरकारने बिगर बासमतीची तांदळाच्या निर्यातीवरील बंदी हटवली. जुलै २०२३ मध्ये सरकारने बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. देशांतर्गत गरज आणि किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने निर्यातीवर बंदी घातली होती. दरम्यान, तांदळाची निर्यात ही नॅशनल कोऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेडकडे (एनसीईएल) देण्यात आली आहे.

औरंगाबाद-उस्मानाबाद नामांतर विरोधातील याचिका फेटाळल्या

मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

मुंबई, ८ मे

औरंगाबाद आणि उस्मानाबाद या शहरांच्या महसूल विभागांचे अनुक्रमे छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव असे नामकरण करण्याच्या राज्य प्राधिकरणाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळल्या. या निर्णयाचे स्वागत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. या दोन्ही शहरांच्या नामांतराची अधिसूचना बेकायदेशीर नाही, असे मुख्य न्यायाधीश देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. आजच्या सुनावणीवेळी न्यायालयाने स्पष्ट केले की, शहरांची आणि महसूल विभागांची नावे बदलण्याच्या अधिसूचनांचा कोणताही त्रास होत नाही, असे मानण्यास आम्हाला कोणताही संकोच नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील मागील महाविकास आघाडी सरकारने २९ जून २०२१ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन्ही शहरांचे नाव बदलण्याचा निर्णय घेतला होता. छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव जिल्ह्यातील रहिवाशांनी उच्च न्यायालयात या निर्णयाविरोधात याचिका दाखल केल्या होत्या. राज्य सरकारने २००१ मध्ये औरंगाबादचे नाव बदलण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो निर्णय पुन्हा बदलण्यास भाग पाडण्यात आले होते, असे या याचिकांमध्ये नमूद करण्यात आले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राजकीय फायद्यासाठी अनधिकृतपणे त्यांच्या शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीत दोन शहरांची नावे बदलली. हा निर्णय राज्यघटनेतील तरतुदींचा पूर्णपणे अवमान करणारा आहे.

माढ्यात सर्वाधिक ६६.१३ तर करमाळ्यात सर्वात कमी ५५.८८ टक्के मतदान

कमळ फुलणार की तुतारी वाजणार; महाराष्ट्राचे लागले लक्ष

माढा लोकसभा मतदारसंघातील सांगोला, माळशिरस, माण, फलटण विधानसभा मतदारसंघात ६० टक्क्यांच्यावर टक्का

तभा वृत्तसेवा । प्रशांत माने
सोलापूर, दि. ८ मे-

राज्यात बहुचर्चित ठरलेल्या माढा लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी कोणाला कौल दिल्याची चर्चा रंगली असतानाच मतदानाची अंतिम आकडेवारी पाहता माढा लोकसभा मतदारसंघात समाविष्ठ असलेल्या सहा विधानसभा मतदारसंघांपैकी सर्वाधिक ६६.१३ टक्के मतदान माढा विधानसभा मतदारसंघात तर सर्वात कमी ५५.८८ टक्के इतके मतदान करमाळा विधानसभा मतदारसंघात झाले आहे. १९ लाख ९१ हजार ४५४ इतके मतदान असून यापैकी १२ लाख ६७ हजार ५३० मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून याची टक्केवारी ६३.६५ टक्के इतकी आहे.

सहा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रनिहाय झालेल्या आकडेवारीवरून उमेदवारांच्या समर्थकांनी निकालाची अंदाजबांधणी सुरु केली आहे. माढा लोकसभा मतदारसंघात निवडणूक घोषित झाल्यानंतर घडलेल्या नाट्यमय घडामोडींमुळे महाराष्ट्रात माढा हा हॉट लोकसभा मतदारसंघ ठरल्याचे पहावयास मिळाले. भाजपा महायुतीचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांना भाजपकडून पुन्हा उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपातील नाराज मोहिते-पाटील गटाने बंड पुकारून थेट भाजपाला रामराम ठोकत शरद राष्ट्रवादीची तुतारी हाती घेतली. भाजपाला एकतर्फी वाटणारी निवडणूक अचानक अटीतटीची झाली. निवडणुकीच्या काळात या मतदारसंघात अनेक दिग्गजांच्या सभा तर झाल्याच पण मतांची जुळवणी करण्यासाठी अनेकांनी पक्षीय बदल करून नवीन समीकरणे जुळवली. माढा लोकसभा मतदारसंघातील निवडणुक ही मोठी चुरशीची पहावयास मिळाली. ७ मे रोजी झालेल्या मतदानाची अंतिम आकडेवारी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून जाहीर झाली आहे.

माढ्यात मतदानात पुरुष पुढे

माढा लोकसभा मतदारसंघात समावेश असलेल्या सहा विधानसभा मतदारसंघात चुरशीने मतदान झाल्याचे टक्केवारीवरून स्पष्ट होत आहे. माढा लोकसभा मतदारसंघात एकूण १९ लाख ९१ हजार ४५४ इतके मतदान असून यापैकी १२ लाख ६७ हजार ५३० मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून याची टक्केवारी ६३.६५ टक्के इतकी आहे. माढा लोकसभा मतदारसंघात १० लाख ३५ हजार ६७८ पुरुष तर ९ लाख ५५ हजार ७०६ स्त्री आणि इतर ७० मतदार आहेत. ६ लाख ९० हजार ५४ पुरुष तर ५ लाख ७७ हजार ४४६ स्त्री मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून महिलांपेक्षा पुरुष मतदार मतदानात पुढे आहेत.

सहा मतदारसंघनिहाय झालेले मतदान पुढीलप्रमाणे

करमाळा- एकूण मतदान ३ लाख १७ हजार ९२८ इतके असून यापैकी एक लाख ७७ हजार ६५३ मतदारांनी मतदान केले असून याची टक्केवारी ५५.८८ टक्के इतकी आहे. माढा- एकूण मतदान ३ लाख ३७ हजार ६३२ इतके असून यापैकी २ लाख २३ हजार २६४ मतदारांनी मतदान केले असून याची टक्केवारी ६६.१३ टक्के आहे. सांगोला-एकूण मतदान ३ लाख १२ हजार ४९८ इतके असून यापैकी २ लाख १०१ मतदारांनी मतदान केले असून याची टक्केवारी ६४.०३ टक्के इतकी आहे. माळशिरस- एकूण मतदान ३ लाख ३७ हजार ३८६ इतके असून यापैकी २ लाख ३ हजार ३७० मतदारांनी मतदान केले असून याची टक्केवारी ६०.२८ टक्के इतकी आहे. आहे. फलटण- एकूण मतदान ३ लाख ३५ हजार ९९९ इतके असून यापैकी २ लाख १५ हजार ८१५ मतदारांनी मतदान केले असून याची टक्केवारी ६४.२३ टक्के इतकी आहे. माण- एकूण मतदान ३ लाख ५० हजार ११ इतके असून यापैकी २ लाख १५ हजार ४५६ मतदारांनी मतदान केले असून याची टक्केवारी ६१.५६ टक्के इतकी आहे.

माळशिरस व फलटण लीड कोणाला देणार?

मतदारसंघात निवडणुकीस उभारलेल्या उमेदवारांच्या समर्थकांकडून विधानसभा आणि मतदान केंद्रनिहाय झालेल्या मतांच्या आकडेवारीवरून विजयाचे अंदाज बांधण्यास सुरुवात झाली आहे. आपल्या उमदेवारासाठी अनुकूल कोणत्या पट्ट्यात किती मतदान झाले याची चर्चा आता मतदारसंघात रंगू लागली आहे. माळशिरस आणि फलटण विधानसभा मतदारसंघ कोणाला लीड देणार त्यावर सर्वकाही अवलंबून आहे. सध्या चर्चा रंगल्या असल्या तरी गुलाल कोण उधळणार हे येत्या ४ जून रोजीच कळणार आहे.

Acne Clear Cream
Since 1954 DR. SAHEB
पूर्णत: आयुर्वेदिक, स्वदेशी व प्रामाणिक क्रीम म्हणजे
मुरमांसाठी वरदान
CLINICALLY TESTED
कॉलेजियन® क्रीम
६० वर्षांपासून युवकांची स्कीन केअर, १२ गुणांचे विशाल भांडार
MRP ₹124/- Now ₹99/- Only. (20 g)
AN ISO 9001 : 2008 Certified Company
मुरमे
काळी वर्तुळे
सुरकुत्या
पायाला भेगा पडणे
ताजी जखम
काळे डाग
HD ग्लो
NO SIDE EFFECTS
WOW! पार्लर जैसा GLOW... रोज़ाना
Ayurvedic Multipurpose
केवळ ट्युबच घ्या
तुम्ही आपल्या कुटुंबाकरिता केवळ १ ट्युब कॉलेजियन क्रीम अवश्यक घ्या. कारण अशा वस्तू बनवल्या जात नाहीत, परंतु वरदान स्वरूपात तयार होत असतात.
amazon.in Flipkart
थंडीमध्ये त्वचा कोमल बनवून उजळपणा वाढवी
An all purpose, all season cream for all ages with proven results (Men, Women & New Born)
Bliss for Acne Prone Skin
Get Dream Like Glow
Best for Pimples
Best Skin Care Partner
जगभरातील देशी वा विदेशी कंपन्यांच्या कित्येक क्रीम वा फेशियलची अनेक साधने वापरा किंवा मग एक वेळ एक ट्युब कॉलेजियन क्रीम कायमस्वरूपी वापरा.
लग्नाआधी केवळ तीन महिन्यांपर्यत कॉलेजियन क्रीमचा वापर सातत्याने करा व आपल्या आत एक सुंदर बदल पाहा. स्वत:हून फरक पाहा, तुम्ही फिदा होऊन जाल!
CUSTOMER CARE 9926054001
प्रतिनिधित्व नसलेल्या क्षेत्रांमध्ये एजन्सी द्यावयाची आहे.
केवळ होलसेल मेडिकल डिस्ट्रिब्युटर्सकरिता संपर्क :- 78708 33333

CMYK
www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लोकशाहीचा महाकुंभ

निवडणुकायन



हिशेबच समजेना!

निवडणूक म्हणजे आता एक सर्वोत्तम करीअर झाले आहे. लोकांचा पैसा असतो, त्यातून आपली कामे करायची आणि पुन्हा त्यातूनच पुढील निवडणूक लढवून पुढील काळातील करीअरच्या नव्या संधी शोधायच्या. पुन्हा नगरसेवक, आमदार, खासदार व्हायचे आणि पुन्हा 'पगार', भत्ते सुरू...! सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, टॅक्स कोणता भरला, किती भरला हे या बाहुबलींना कोण विचारणार? म्हणूनच प्रत्येक निवडणुकीच्या वेळी उमेदवाराच्या प्रतिज्ञापत्रात त्याच्या नावे असणारी संपत्ती आणि एकूणच विवरण हा मोठा आवडीने तसेच चवीने वाचण्याचा विषय असतो.

या विवरणाची आणखी एक खासियत म्हणजे कोणत्याच नेत्याच्या संपत्तीत मागील वेळेच्या तुलनेत घट झाल्याचे अजिबात दिसणार नाही. उलट, वाढच असते. ही वाढ अर्थातच, कोटींमध्येच असते. (हे पुन्हा दाखवायचेच दात असतात) प्रत्यक्षात झालेली वाढ कदाचित 'दाखवण्यासारखी' नसावी. म्हणून ते ही खबरदारी घेतात. अर्थात, या कामी त्यांचे सीए फारच महत्त्वाची भूमिका बजावतात. साहेबांचा पैसा कसा आणि कुठे 'मॅनेज' करायचा आणि 'किती' दाखवायचा, याचे गणित या आकडेमोड तसेच आयकर नियमांमध्येच खेळणाऱ्या खेळाडूंना चांगले माहिती असते. (म्हणूनच सीए परीक्षा कठीण असते आणि निकालही इतका कमी का लागतो हे आत्ता समजले) असो. आता तो सीए तरी बिच्चारा काय करणार? तोही हुकुमाचा ताबेदार. फक्त या सीए नावाच्या प्राण्यांनी नेत्यांच्या प्रतिज्ञापत्रात आकडेवारी देताना काही सुधारणा अवश्य कराव्या, असे सुचवावेसे वाटते.

आता वर आकडेवारी असते स्थावर, जंगम मालमत्ता इतकी आहे, रोख रक्कम इतकी आहे. जोडीदाराची संपत्ती इतकी आहे. सोन्या-चांदीचा हिशेब आपल्या भारतात असतोच. असे सगळे झाल्यानंतर शेवटी 'कर्ज' का लिहितात, हे आजवर कळलेले नाही. कर्जामध्ये बरीच रक्कम दडवता येते, असे म्हणतात. पण, यात फारच बेसिक प्रश्न आहे की, ज्याच्याकडे कोट्यवधींची मालमत्ता आहे, त्याने कर्ज घ्यायचेच कशाला? गाडगे महाराज म्हणायचे, ऋण काढून सण साजरे करू नये. मग ही शिकवण या शहाण्या लोकांना कोणी दिलेली दिसत नाही. त्यांना कर्जाची गरज का पडते, हा प्रश्नच आहे. विशेष म्हणजे, कोणतीही नोकरी किंवा राजकारणाशिवाय इतर कोणता धंदाही नसताना कोणती बँक यांना कर्ज देते, हे आश्चर्यच आहे. सामान्यांना तर साधे दुचाकीसाठी कर्ज घ्यायचे, तर पन्नास कागदांचा फॉर्म सबमिट करावा लागतो. तुम्ही म्हणाल, त्यांचे कारखाने असतात, व्यवसाय असतात वगैरे वगैरे. त्या आधारे त्यांना कर्ज मिळत असेल, तर ठीक आहे ना. कर्ज घेतले तर जवळ इतके पैसे, सोने, चांदी असताना ते कर्ज पोसायचे कशाला? फेडून टाकायचे ना? अर्थात, हा आपला सर्वसामान्य माणसाचा अल्पबुद्धीचा विचार झाला. या विचाराने नेतेमंडळी वागू शकत नाहीत. कारण ती मोठीच असतात. त्यांचे व्यवहार मोठे असतात. त्यांना निवडून देणारे छोटेच असतात आणि ते कायम त्यांच्यापुढे छोटेच राहतात. मानमरातब, प्रतिष्ठा, पैसा, मालमत्ता सर्वच बाबतीत...! आज दाराशी हात जोडत येणारे आणि नंतर हात जोडणारे या चेहऱ्यांची उलटापालट होतेच, हे आता या 'छोट्या' लोकांच्या चांगलेच अंगवळणी पडले आहे. ■

पाकिस्तानची भाषा वापरणाऱ्यांना तुरुंगात टाकू

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा इशारा

◆ **मुंबई, ८ मे**

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात देशभर पसरलेली देशभक्तीची लाट सहन होत नसल्याने काही पाकधार्जिणे अतिरेक्यांना पाठिंबा दर्शवणारी वक्तव्ये करीत आहेत. मात्र, महाराष्ट्रात हा प्रकार सहन केला जाणार नाही. पाकिस्तानची भाषा वापरणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तुरुंगात टाकू, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी कार्यकर्ता मेळाव्यात दिला.

लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी घेतलेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात बोलताना शिंदे म्हणाले, काँग्रेसचा हात पाकिस्तानसोबत अशी परिस्थिती सध्या दिसून येत आहे. काँग्रेसच्या नेत्याचे पाकिस्तानमधील माजी मंत्री कौतुक करतात. त्याला प्रतिसाद देत काँग्रेस नेते अतिरेक्यांना पाठिंबा देणारे वक्तव्य करतात. देशविरोधात वक्तव्य करणाऱ्यांना यापुढे मोकळे सोडले जाणार नाही.

शरद पवार राज्यात मुख्यमंत्री होते, तसेच त्यांनी केंद्रातही अनेक वर्षे पदावर होते, मात्र राज्याच्या विकासासाठी त्यांनी काहीही केलेले नाही. पाच दशके ते राज्यासह केंद्रातील राजकारणात सक्रिय होते. या काळात महाराष्ट्राची व्हावी तशी प्रगती झाली नाही. ते कृषिमंत्री असताना शेतकरी आत्महत्येत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर होते. मात्र, मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र आणि राज्य सरकारकडून आता शेतकऱ्यांच्या खात्यात वार्षिक बारा हजार रुपये जमा केले जातात. शेतकऱ्यांना पीकविमा मोफत दिला जातो. शेतकऱ्यांना प्राधान्य देणे आमच्या सरकारचे उद्दिष्ट आहे. ◂(*वृत्तसंस्था*)

मतदानाच्या अगोदरच रवाना होणार हाजी

◆ **भोपाळ, ८ मे**

मध्यप्रदेशातील हाजींचे विमान १२ मे रोजी इंदूरहून उड्डाण करेल, त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच १३ मे रोजी चौथ्या टप्प्यातील इंदूर आणि उज्जैन विभागातील ८ जागांवर मतदान होणार आहे. केंद्रीय हज समितीने राज्यातील हाजींचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार १२ मे रोजी इंदूरहून एकमेव विमान रवाना होणार आहे. सुमारे १५८ हाजींना हा प्रवास सुरू होण्यापूर्वी ४८ तास आधी सफर बाजार येथील तात्पुरत्या हज हाऊसमध्ये हजेरी लावावी लागणार आहे. आवश्यक तयारी आणि प्रशिक्षण इत्यादींमुळे ही व्यवस्था निश्चित आहे.

इस्लाम धर्मानुसार हज यात्रा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे हाजींना निरोप देण्यासाठी कुटुंबाव्यतिरिक्त नातेवाईक, मित्रमंडळी, ओळखीचे लोकही येतात. इंदूर हज हाऊसमध्ये व्यवस्था करण्यासाठी मोठ्या संख्येने लोक सक्रिय आहेत. ◂(*वृत्तसंस्था*)

शिरूरची जनता कोल्हेंना घरी बसवणार : फडणवीस

नाटकाप्रमाणे राजकीय कारकीर्द ठरली 'फ्लॉप'

◆ **पुणे, ८ मे**

जनतेने संधी देऊनही गेल्या पाच वर्षांत अमोल कोल्हे मतदारसंघात काहीही करू शकले नाहीत. शिरूरमध्ये खासदारकीच्या निधीतून त्यांनी कुठलेही काम केलेले नाही. त्यांनी चित्रपट, मालिकेतील कामालाच प्राधान्य दिले. त्यामुळे यावेळी शिरूरची जनता त्यांना घरी बसवल्याशिवाय राहणार नाही, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी प्रचारसभेतून लगावला.

महायुतीचे उमेदवार आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेला संबोधित करताना फडणवीस म्हणाले, नाटकाप्रमाणे कोल्हे यांची राजकीय कारकीर्द 'फ्लॉप' ठरली आहे. कोल्हे यांना मोठ्या अपेक्षेने येथील जनतेने त्यांना संधी दिली होती. मात्र, त्यांनी मतदारांचा अपेक्षाभंग केला. पाच वर्षांत ते कधीही मतदारसंघात फिरकले नाही, निवडणुका लागताच त्यांनी शिरूरमध्ये ठाण मांडले. येथील जनता हुशार आहे.

कोल्हे यांना यावेळेस धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. मोदी यांच्यासारखे दुसरे नेतृत्व देशात नाही. त्यामुळे त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला निवडून द्या, असे आवाहन यावेळी फडणवीस यांनी नागरिकांना केले. ◂(*वृत्तसंस्था*)

पंतप्रधान मोदींच्या कामाचे कौतुक

» ज्येष्ठ नागरिकांना आरोग्याच्या सेवा मोफत देण्याचे काम मोदींनी केले. दिव्यांगांसाठी फायद्याच्या योजना आणल्या. पारंपरिक व्यवसाय करण्याचा आर्थिक फायदा कसा होईल, यासाठी योजना आणली आणि अनेक उद्योजक त्यातून तयार झाले. शेतकरी सन्मान योजनेतून शेतकऱ्यांना फायदा झाला. पीक कर्ज मोदींनी दिले. संपुआ सरकार ऊस उत्पादकांवर आयकर लावायचे. मात्र, मोदी यांनी तो रद्द केला. 'जाणता राजा' उपाधी असलेले राज्यातील नेते शेतकऱ्यांना न्याय देण्यात अपयशी ठरल्याचा आरोप यावेळी फडणवीस यांनी नाव न घेता शरद पवार यांच्यावर केला. ■

काँग्रेसचे उमेदवार आणि भाऊ राहुल गांधी यांच्या प्रचारासाठी बुधवारी रायबरेली येथे आयोजित रोड शोमध्ये काँग्रेसच्या नेत्या प्रियांका वढेरा सहभागी झाल्या

निवडणुकीत पैशांचा पाऊस : संजय राऊत

◆ **मुंबई, ८ मे**

चोरलेल्या धनुष्याला विजयी करण्यासाठी शिंदे गट पैसे वाटप करीत आहे. निवडणुकीच्या काळात महायुतीकडून पैशांचा पाऊस पाडला जात आहे. जनतेने अशा उमेदवारांना धुडकावून प्रामाणिकपणे काम करणाऱ्यास निवडून देण्याचे आवाहन बुधवारी ठाणे येथील प्रचारसभेतून संजय राऊत यांनी केले.

ठाण्यात आयोजित सभेला संबोधित करताना ते म्हणाले, कोल्हापूरला शाहू महाराजांचा पराभव करण्यासाठी शंभर कोटी रुपये पाठविण्यात आले. ◂(*वृत्तसंस्था*)

नावात बदल झाल्याने पुन्हा छापली प्रचारपत्रके

गोडसे तीनवरून दोनवर, वाजे तिसऱ्या क्रमांकावर

◆ **नाशिक, ८ मे**

उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जानुसार मराठी वर्णमालेनुसार बॅलेट पेपरवरील नावात बदल करण्यात आला असल्याने गोडसे यांनी 'हेमंत तुकाराम गोडसे' ऐवजी 'गोडसे हेमंत तुकाराम' असा नावात बदल केला. त्यामुळे त्यांचे नाव तिसऱ्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावर आले आहे.

दुसऱ्या क्रमांकावर राजाभाऊ वाजे यांचे नाव आता तिसऱ्या क्रमांकावर गेले आहे. बॅलेट पेपरवरील उमेदवारांची यादी अंतिम केली जात असताना नावात बदल करण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे अर्ज सादर करण्यात आले होते.

उमेदवाराने अर्जावर नमूद केलेल्या नावाच्या आधारे मराठी वर्णमालेनुसार उमेदवारांची क्रमवारी करण्यात आली आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांनी पहिले आडनाव लावून 'गोडसे हेमंत तुकाराम असा अर्ज केल्याने तीनऐवजी दोन क्रमांकावर आले. 'आव्हाड झुंजार' यांनीही त्यांच्या नावात बदल सुचवला असून 'झुंजार आव्हाड' असा अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सोपवला. त्यामुळे पाचव्या क्रमाकांवरील त्यांचे नाव दहाव्या क्रमांकावर गेले आहे. सातव्या क्रमांकावर असलेले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार करण गायकर यांचे नाव सहा क्रमांकावर आले आहे. प्रकाश गिरधारी कनोजे यांनीही 'कनोजे प्रकाश गिरधारी' असा बदल सुचविला त्यामुळे त्यांचे नाव २५ व्या क्रमांकावरून १६ व्या क्रमांकावर आले आहे. ◂(*वृत्तसंस्था*)

प्रचारपत्रकांचा खर्च वाया

» निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचा बॅलेट पेपरवरील क्रम बदलल्यामुळे इतर उमेदवार

देखील सतर्क झाले. बहुजन आघाडीचे उमेदवार करण गायकर यांच्यासह इतर उमेदवारांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले आणि बॅलेट पेपरवर झालेल्या बदलाबाबत वेळीच माहिती जाणून घेतली. अनुक्रमांकातील बदलामुळे शेवटी उमेदवारांनी पुन्हा नव्याने प्रचारपत्रके छपाईसाठी ऑर्डर दिल्या आहेत. त्यांचा पूर्वीच्या प्रचारपत्रकाचा खर्च वाया जाणार आहे. ■

२८ वेळा रिंगणात, प्रत्येक वेळी अनामत जप्त

- मोदींपासून मुलायमसिंहांच्या विरोधात उभे
- कधीतरी निवडून येण्याचा विश्वास

◆ **गाझीपूर, ८ मे**

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकीय पक्षांकडे सर्वांचे लक्ष असते. पण अपक्ष उमेदवार म्हटला की तो उपेक्षितच असतो. मात्र, काही अपक्ष उमेदवार आपल्या कामांनी सतत निवडून येतात तर, काही अपक्ष उमेदवार त्यांच्या नानाविध गोष्टींनी केवळ चर्चेत असतात. असेच एक अपक्ष उमेदवार सत्यदेव यादव उत्तरप्रदेशातील गाझीपूर येथून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

नेहमीप्रमाणे अपक्ष उमेदवार सत्यदेव यादव यांनी गाझीपूर जागेसाठी पुन्हा एकदा अर्ज दाखल केला. प्रत्येक वेळी अनोख्या पद्धतीने उमेदवारी दाखल केल्याने चर्चेत असणारे सत्यदेव यावेळी नामांकनाच्या ठिकाणी धावत गेले.

सत्यदेव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुलायमसिंह यादव यांच्या विरोधात निवडणूक लढवली आहे. सत्यदेव यादव यांनी सांगितले की, त्यांनी २८ वेळा निवडणूक लढवली, पण प्रत्येक वेळी त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. असे असूनही त्यांची हिंमत कायम आहे. सत्यदेव यांना निवडणूक जिंकून जनतेची सेवा करायची आहे.

सत्यदेव यादव

गाव सराय पीर मोहम्मद पोस्ट-चौकिया येथे राहणारे सत्यदेव सांगतात की, त्यांनी अलाहाबाद विद्यापीठातून एमएचे शिक्षण घेतले आहे. ते बसपा आणि भाजपामध्येही राहिले आहेत आणि तीनदा सरपंच राहिले आहेत. ते प्रत्येक वेळी विधानसभा किंवा लोकसभा निवडणूक लढवतात आणि प्रत्येक वेळी त्यांची अनामत रक्कम जप्त होते ही बाब वेगळी. ◂(*वृत्तसंस्था*)

प्रत्येक वेळी हटके शैली

आझमगडमधून मुलायमसिंह यादव आणि वाराणसीमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातही अर्ज दाखल केल्याचे सत्यदेव सांगतात. गेल्या लोकसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ते घोड्यावरून जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले होते. त्यापूर्वी ते बैलगाडीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पोहोचले. त्यांच्याकडे आठ बिघा जमीन आणि कोट्यवधींचे घर आहे. त्यांच्यावर १.८० लाखांचे कर्जही आहे. ■

सुप्रिया सुळे म्हणतात, बारामतीला कुणाची तरी दृष्ट लागली!

◆ **पुणे, ८ मे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडल्यानंतर बारामती लोकसभा मतदारसंघात हायव्होल्टेज निवडणूक ७ मे रोजी पार पडली. बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार असा सामना रंगला. या दोघींचेही भवितव्य मशीनबंद झाले आहे. आता बाजी कोण मारणार, याचा फैसला ४ जून रोजी होणार आहे. अशात सुप्रिया सुळेंनी बारामती मतदारसंघाला कुणाची तरी दृष्ट लागली आहे, असे वक्तव्य केले आहे.

दत्ता भरणेंचा तो व्हिडीओ पाहून मला वाईट वाटले. एका गरीब कार्यकर्त्याला ते अशा प्रकारे धमक्या देत होते शिवीगाळ करत होते. मला फारच वेदना झाल्या. कारण मी आणि दत्तामामांनी अनेक वर्षे एकत्र काम केले आहे. आता ते अशी भाषा बोलत आहेत. मी त्या कार्यकर्त्याला आणि त्याच्या पत्नीला भेटले ते दोघेही खूप नाराज झाले होते. पैसे वाटप, दमदाटी, व्हिडीओ समोर येणे या गोष्टी घडल्या. आम्ही काही दमदाटी केली नाही, पैसे वाटले नाहीत. एका सशक्त लोकशाहीत अशा गोष्टी होणे दुर्दैवी आहे. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या इतिहासात स्वातंत्र्य मिळाल्यापासून असे कधीही घडले नाही. प्रचंड आणि दुःख आणि वेदना देणारा हा प्रकार आहे. ◂(*वृत्तसंस्था*)

काँग्रेसचे अधीररंजन चौधरी डबल हॅट्ट्रिक साधणार?

श्यामकांत जहागीरदार

◆ **नवी दिल्ली, ८ मे**

पश्चिम बंगालमधील बेहरामपूर लोकसभा मतदारसंघात लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते आणि पश्चिम बंगाल प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अधीररंजन चौधरी दुहेरी हॅट्ट्रिक करण्याच्या प्रयत्नात आहे. पण, यावेळची निवडणूक त्यांना वाटते तितकी सोपी नाही.

मुस्लिमबहुल बेहरामपूर मतदारसंघात तृणमूल काँग्रेसने क्रिकेटपटू युसुफ पठाणला, तर भाजपाने निर्मल साहा यांना उमेदवारी दिली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत चौधरी यांनी तृणमूल काँग्रेसचे अपूर्ब सरकार यांचा ८१ हजार मतांनी पराभव केला होता.

अधीररंजन चौधरी यांनी या मतदारसंघातून आतापर्यंत पाच निवडणुका जिंकल्या आहेत, यावेळी सहावी जिंकण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. १९९९ मध्ये चौधरी यांनी या मतदारसंघातून पहिल्यांदा निवडणूक लढवली आणि जिंकली. त्यानंतर २००४, २००९, २०१४ आणि २०१९ अशा सलग पाच निवडणुकीत ते विजयी झाले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात चौधरी यांनी काँग्रेस आणि डावे पक्ष जिंकणे आवश्यक आहे, असे न झाल्यास धर्मनिरपेक्षता धोक्यात येईल, असे म्हटले. तृणमूल काँग्रेसला मत देणे म्हणजे भाजपाला मत देण्यासारखे आहे. त्यापेक्षा तुम्ही भाजपालाच मत द्या, असे आवाहन त्यांनी बोलण्याच्या ओघात केले होते. आपण काय बोललो हे लक्षात आल्यानंतर त्यांनी, भाजपालाही मत देऊ नको आणि तृणमूल काँग्रेसलाही मत देऊ नका, अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.

या मुद्यावरून तृणमूल काँग्रेसने चौधरी आणि काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. त्यामुळे चौधरी यांच्या व्हिडीओत छेडछाड करण्यात आल्याचा दावा काँग्रेसने केला. मात्र, तोपर्यंत व्हायचा तो घोळ झाला. त्यामुळेच काँग्रेस ही भाजपाची 'बी' टीम असल्याचा आरोप तृणमूल, तर तृणमूल काँग्रेस भाजपाची बी टीम असल्याचा आरोप काँग्रेस करीत आहे. यात फायदा भाजपाचा होत आहे.

वक्तव्यांनी पक्षाला आणतात अडचणीत

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे लोकसभेतील तत्कालीन गटनेते मल्लिकार्जुन खडगे यांचा पराभव झाल्यानंतर अधीररंजन चौधरी यांच्याकडे गटनेतेपदाची जबाबदारी आली. ती त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली. कधीकधी चौधरी लोकसभेत सरकारविरुद्ध अनावश्यक आक्रमक होऊन जातात, परिणामी त्यांना निलंबितही व्हावे लागले होते. अनेकवेळा आपल्या विधानांनी चौधरी स्वतःही अडचणीत येतात आणि आपल्या पक्षालाही अडचणीत आणतात. ■

ममता बॅनर्जींसोबत छत्तीसचा आकडा

◆ **नवी दिल्ली, ८ मे**

अधीररंजन चौधरी लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे गटनेतेच नाही तर पश्चिम बंगाल प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षही आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी त्यांचा छत्तीसचा आकडा आहे.

चौधरी भाजपावर जेवढी टीका करतात, त्यापेक्षा जास्त हल्ला ममता बॅनर्जी यांच्यावर चढवतात. लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात आघाडीची चर्चा होती. पण, अधीररंजन चौधरी यांच्यामुळे ती होऊ शकली नाही. विशेष म्हणजे, ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेस 'इंडिया' आघाडीचा भाग आहे.

ममता बॅनर्जी यांनी यावेळी अधीररंजन चौधरी यांना पराभूत करण्यासाठी पूर्ण ताकद पणाला लावली. बेहरामपूर या मुस्लिमबहुल मतदारसंघात क्रिकेटपटू युसुफ पठाण याला उमेदवारी दिली. या मतदारसंघात ५२ टक्के मतदार हे मुस्लिम आहे. चौधरी हे भाजपाचे एजंट असून, 'इंडिया' आघाडीतील गद्दार नेते असल्याचा आरोप करायलाही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. एकवेळ या मतदारसंघात भाजपाचा उमेदवार जिंकला तरी ममता बॅनर्जी यांना चालेल, पण चौधरी यांना त्या विजयी होऊ देणार नाही, हे निश्चित.

बेहरामपूर मतदारसंघात १९५२ पासून आतापर्यंतच्या निवडणुकांचा आढावा घेतला, तर यात रिव्होल्युशनरी सोशालिस्ट पार्टी (आरएसपी) आणि काँग्रेस हे दोनच पक्ष जिंकले आहेत. १९५२ पासून १९८० पर्यंतच्या सात निवडणुकीत आरएसपीचे त्रिदिब चौधरी विजयी झाले. या मतदरसंघाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या मतदारसंघातील १७ पैकी १२ निवडणुका चौधरी आडनावाच्या दोन उमेदवारांनी जिंकल्या आहेत. यात आरएसपीचे त्रिदिब चौधरी सात वेळा आणि काँग्रेसचे अधीररंजन चौधरी पाचवेळा जिंकले. बेहरामपूर मतदारसंघात आतापर्यंत कधीच तृणमूलला विजय मिळाला नाही. त्यामुळे यावेळी हा मतदारसंघ काँग्रेसकडून हिसकण्यासाठी ममता बॅनर्जी जिद्दीने भिडल्या आहेत. काँग्रेस आणि तृणमूलमधील लढाईचा फायदा मतदारसंघात तसेच राज्यातही भाजपाला मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. ◂(*तभा वृत्तसेवा*)

समस्याग्रस्त गावकऱ्यांचे नदी पार करून मतदान

स्वातंत्र्यानंतरही पुलाची मागणी अपूर्ण

◆ **भोपाळ, ८ मे**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानादरम्यान एकीकडे काही ठिकाणांहून रस्ते, वीज, पाणी आदी समस्यांमुळे गावागावांतून मतदानावर बहिष्कार टाकण्यात आल्याच्या बातम्या येत आहेत. दुसरीकडे, मध्यप्रदेशातील श्योपूर जिल्ह्यात समस्यांचा सामना करूनही एका गावातील लोक खोल नदी पार करून मतदान केंद्रावर पोहोचले. आता सर्व जण मतदानाबाबत ग्रामस्थांच्या जागरूकतेचे कौतुक करीत आहेत.

७ मे रोजी लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या मतदानादरम्यान ही घटना समोर आली. श्योपूर जिल्ह्यातील विजयपूर भागातील अनिडा गावातील लोकांनी उत्स्फूर्तपणे मतदान केले. अनिडा ते सुनवई गावादरम्यान वाहणाऱ्या कावारी नदीवर छोटा पूल बांधण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थ करीत आहेत. मात्र, त्यांच्या मागणीकडे कोणीही लक्ष दिले नाही. सुनवाई गावात जाण्यासाठी त्यांना धोका पत्करावा लागतो. मात्र असे असतानाही ग्रामस्थांनी लोकशाहीच्या उत्सवात मतदान करणे हे आपले कर्तव्य समजून, प्रसंगी धोका पत्करून कंबरभर पाण्यातून जाऊन सुनवई गावातील मतदान केंद्र गाठले. ◂(*वृत्तसंस्था*)

लोकांच्या सहनशक्तीला सलाम

» एकीकडे एखाद्या छोट्याशा समस्येवरून मतदानावर बहिष्कार टाकणारे मतदार असताना दुसरीकडे अनिडा गावातील लोकांनी समस्येच्या पूर्ततेसाठी नदी पार करून मतदान केले. त्यांचे म्हणणे असे की, समस्या आहे हे मान्य. ती कधीतरी दूर होईलच. पण मतदान आवश्यक आहे, म्हणून आम्ही नदी पार करून मतदानासाठी आलो. मतदानाच्या दिवशी मतदान न करता घरात बसणाऱ्या किंवा फिरायला जाणाऱ्या लोकांना ही सणसणीत चपराक आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

बंजारा समाज

मतदानाबाबतच्या वक्तव्यावरून बीड मतदारसंघात रंगली चर्चा

बीड, दि. ८ मे-

माझ्या विरोधातील उमेदवारी माग घ्या, तुम्ही केलेले सहकार्य मी भविष्यात लक्षात ठेवेल आणि त्या दृष्टीकोनातून वाटचाल करेल, अशा प्रकारचे आश्वासन बीड लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी रविकांत राठोड यांना दिले आहे. त्यांच्या या संभाषणाची ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून पंकजा मुंडे या रविकांत राठोड यांना उमेदवारी मागे घेण्याबाबत सांगत असून भविष्यात सहकार्य करण्याचे आश्वासन देखील देत आहेत. या संदर्भात पंकजा मुंडे यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नसले तरी सध्या बीड लोकसभा मतदारसंघात या क्लिपची चांगलीच चर्चा रंगली आहे.

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या आणि बीड लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे या आपल्या विरोधातील उमेदवाराशी अर्ज परत घेण्याबाबत चर्चा करताना या ऑडिओ क्लिप मध्ये ऐकू येत आहे. या मध्ये बंजारा समाजाची मते हे मला मिळणार आहे. मात्र, रविकांत राठोड यांनी पाच-सहा हजार मते घेऊन त्याचा काही परिणाम होणार नसल्याचे पंकजा मुंडे म्हणत आहेत. त्यामुळे राठोड यांनी उमेदवारी मागे घ्यावी, असे पंकजा मुंडे त्यांना सांगत आहे. मात्र, ही ऑडिओ क्लिप खरी आहे की, खोटी या बाबत खुलासा झालेला नाही. बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये बंजारा समाजाचे एक लाखांपेक्षा जास्त मतदार आहेत. त्यामुळे या समाजाची मते लोकसभा निवडणुकीत महत्त्वाची मानली जात आहे. रविकांत राठोड यांनी देखील बीड लोकसभा मतदारसंघातून उमेदरी अर्ज दाखल केला होता. मात्र पंकजा मुंडे यांच्या या फोन कॉल नंतर त्यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. तसेच त्यांनी शरद चंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आहे. आपण आता धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात काम करणार असल्याचे रविकांत राठोड यांनी म्हटले आहे.

बीड लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बजरंग सोनवणे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. बीड लोकसभा मतदारसंघासाठी येत्या १३ मे रोजी मतदान होणार असून बीडमध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच गाजत आहे. पंकजा मुंडे यांच्या ताफ्याला अडवण्याचे प्रकार दोन ते तीन वेळेस समोर आले होते. त्यामुळे मराठा समाज पंकजा मुंडे यांना मतदान करेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शिखर बँकप्रकरणी एसआयटी चौकशी करा

मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल; उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अडचणी वाढणार?

मुंबई, दि. ८ मे-

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अर्थात शिखर बँक घोटाळा प्रकरणी आता एसआयटी चौकशी केली जावी, अशी मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आली आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे शिखर बँक प्रकरण अजित पवारांचा पिच्छा काही सोडत नाही, असे चित्र तरी पाहायला मिळत आहे.

दरम्यान, सदर याचिका दाखल झाल्यानंतर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या याचिकेवर सुनावणी करण्यास नकार दिलेला असला तरी दुसऱ्या खंडपीठापुढे दाद मागण्याचे याचिकाकर्त्यांना निर्देश दिले आहेत. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून दाखल करण्यात आलेल्या क्लोजर रिपोर्टनुसार बँकेच्या कामकाजाची नाबार्डनं साल २००७ ते २०११ दरम्यान तपासणी करण्यात आली. बँकेने उपलब्ध केलेल्या अहवालातील तपशीलाच्या पार्श्वभूमीवर जानेवारी २०१३ मध्ये बँकेच्या कामकाजाची चौकशी सुरू करण्यात आली. जानेवारी २०१४ मध्ये सहकार आयुक्तांना सादर केलेल्या चौकशीमध्ये दिलेल्या अहवालात बँकेचे नुकसान झाले असल्याचे म्हटले होते. जानेवारी २०२४ मध्ये हा क्लोजर रिपोर्ट दाखल करण्यात आला असला, तरी अद्याप मुंबई सत्र न्यायालयातील विशेष कोर्टानं स्वीकारलेला नाही. या क्लोजर रिपोर्टला अण्णा हजारे, शालिनीताई पाटील तसेच अन्य तक्रारदारांनी विरोध करत याचिका कोर्टात सादर केली होती. मात्र, मूळ तक्रारदार सुरेंद्र मोहन अरोरा यांच्याशिवाय अन्य कुणाचीही विरोध याचिका स्वीकारण्यास नकार दिला होता. शिखर बँकेकडून सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या आणि राज्यातील इतर सहकारी संस्थांना हजारो कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आलं होते. सहकार आयुक्तांनी शिखर बँकेची चौकशी करण्यासाठी माजी न्यायाधीशांची विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती देखील केली होती.

प्राथमिक आरोपपत्रात ७० जणांचे नाव

शिखर बँकेचे संचालक असलेल्या अजित पवार यांच्यासह अन्य ७० जणांचे प्राथमिक आरोपपत्रात नाव होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २०१९ मध्ये हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिखर बँकेतील अनियमिततेमुळे १ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत बँकेचे २५ हजार कोटींचे नुकसान झाल्याचं आरोपपत्रात म्हटलं आहे. साखर कारखान्यांना कर्जवाटप करताना बँकिंगसह आरबीआयच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आलेले होते. कमी व्याजदरात कर्जवाटप करणे आणि मालमत्ता कमी दरात विकणे याचा देखील आरोपपत्रात उल्लेख करण्यात आलेला होता.

साखर कारखान्यांचा शेतकऱ्यांना दिलासा

पुणे : राज्यातील कारखान्यांकडून शेतकऱ्यांना ९७.४२ टक्के रास्त आणि किफायतशीर दर अर्थात 'एफआरपी' देण्यात आली आहे. साखर निर्यातबंदी आणि इथेनॉल उत्पादनावर निर्बंध असल्याने साखर कारखाने अडचणीत होते. तरीही एफआरपी देण्यात मात्र राज्यातील कारखान्यांनी हात आखडता घेतलेला नाही.

यंदाच्या गाळप हंगामात राज्यातील एकूण २०७ कारखान्यांनी सुमारे १०७२.१७ लाख टनांचे गाळप केले आहे. त्यापोटी एकूण देय 'एफआरपी'ची रक्कम ३३,१९८ कोटी रुपयांवर गेली होती. त्यापैकी एप्रिलअखेर ३२,३४० कोटी रुपयांची एफआरपी शेतकऱ्यांना देण्यात आली, अशी माहिती विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी दिली.

भारतीय निवडणूक प्रक्रियेचे परदेशी शिष्टमंडळाकडून कौतुक

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि.८ मे-

भारतासारख्या लोकशाही देशात निवडणूक प्रक्रिया ही महत्त्वपूर्ण बाब आहे. मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक आयोगाने उत्कृष्ट नियोजन केल्याचे मत निवडणूक प्रक्रियेच्या पाहणीसाठी आलेल्या परदेशी शिष्टमंडळांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले.

भारत निवडणूक आयोगाने इतर देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सहभागासाठी आइव्हीपी कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याअंतर्गत परदेशी शिष्टमंडळ प्रतिनिधी निवडणूक प्रक्रियेच्या पाहणीसाठी महाराष्ट्रात आलेले आहेत. रायगड येथील मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रियेची पाहणी केल्यानंतर या शिष्टमंडळाने आज राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांची भेट घेऊन भारतातील निवडणूक प्रक्रियेविषयी माहिती जाणून घेतली. त्यावेळी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या शिष्टमंडळात बांगलादेश, श्रीलंका, कझाकिस्तान आणि झिम्बाबाब्वे या देशातील प्रतिनिधींचा समावेश आहे. यात बांगलादेशमधील निवडणूक आयोगातील अधिकारी महम्मद मोनिरुइझमन टी, जी एम शाहताबुद्दीन, कझाकिस्तान केंद्रीय निवडणूक आयोगातील नुरलान आब्दीरोव, आयबक झिकन, श्रीलंकेच्या निवडणूक आयोगाच्या सिलया हिलक्का पासिलिना आणि झिम्बाब्वे निवडणूक आयोगाच्या सिम्बराशे तोंगाई आणि न्यायमूर्ती प्रशिला चिगुम्बा यांचा शिष्टमंडळात समावेश आहे.

यावेळी राज्याचे विशेष निवडणूक निरीक्षक धर्मेंद्र एस. गंगवार, विशेष निवडणूक पोलीस निरीक्षक एम.के.मिश्रा, सहसचिव मनोहर पारकर, अवर सचिव भास्कर बनसोडे, योगेश गोसावी उपस्थित होते.

एस.चोक्कलिंगम यांनी भारतातील निवडणूक प्रकिया पारदर्शक, निर्भय वातावरणात पार पाडण्याला निवडणूक आयोगाचे प्रथम प्राधान्य आहे. त्यादृष्टीने सर्व संबंधित यंत्रणा कार्यरत असून महाराष्ट्रात आतापर्यंत तीन टप्प्यात झालेली मतदान प्रक्रिया सुव्यवस्थित, शांततापूर्ण पद्धतीने यशस्वीरित्या पार पडली.

दक्षिण मुंबईत प्रचार यात्रांना वेग

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ मे-

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महानगरात आता प्रचार यात्रा व सभांना वेग आला आहे.

दक्षिण मुंबईमतदारसंघातील महायुती शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार यामिनी जाधव यांच्या प्रचारार्थ मंगळवारी भायखळा विभागात रॅली काढण्यात आली. महायुतीतील नेते मिलिंद देवरा, रोहिदास लोखंडे उपस्थित होते. तसेच मनसेचे संजय नाईक आणि शलाका हरयान, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रसंगी परिसरातील मंदिरात दर्शन घेतले. अफाट गर्दी, लोकांच्या उत्साहात रॅली झाली. रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यावेळी म्हणाले, ‘माझी तुरुंगात जायची इच्छा नाही’

संजय राऊतांचा गौप्यस्फोट

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि.८ मे-

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना आम्ही शिवसेनेच्या सर्व आमदार खासदारसह आयोध्येला गेलो होतो. त्यावेळी एकनाथ शिंदे माझ्या रूमवर येऊन म्हणाले होते. माझ्यामागे ईडी, सीबीआयवाले लागले आहेत. या वयात मला तुरुंगात जायचे नाही, आपण मोदी समवेत जाऊ या, असा गौप्यस्फोट उद्धव ठाकरे गटाचे नेते खा.संजय राऊत यांनी केला.

ठाण्यात महायुतीचे उमेदवार राजन विचारे यांच्या प्रचारसभेत बोलताना त्यांनी हा गौप्यस्फोट केला. एकनाथ शिंदे यांच्यासारखा डरपोक शिवसैनिक मी माझ्या आयुष्यात पाहिलेला नाही, असा टोलाही त्यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांना लगावला.

राऊत यांनी शिवसेना फुटण्यापूर्वी त्यांच्यात आणि एकनाथ शिंदेंमध्ये झालेले संभाषण सांगितले. ते म्हणाले, आम्ही सर्वजण १५ जून २०२२ रोजी अयोध्या दौऱ्यावर गेलो होतो. तेव्हा राजन विचारे, एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मंत्री, शिवसेनेचे आमदार, खासदार आमच्याबरोबर होते. आम्ही अयोध्या दौऱ्यावर असताना १४ जूनच्या रात्री हे महाशय (एकनाथ शिंदे) माझ्या खोलीत आले आणि मला म्हणाले, आपण आता काहीतरी निर्णय घ्यायला पाहिजे. त्यावर मी त्यांना विचारले, काय निर्णय घ्यायचा? ते म्हणाले, मला भीती वाटते, मी तुरुंगात जाऊ शकत नाही. आमचा हा संवाद अयोध्येत रामाच्या साक्षीने चालला होता. ज्या रामाच्या प्राणप्रतिष्ठेला हे महाशय पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबर गेले होते, त्या श्रीरामाच्या साक्षीने हा संवाद चालू होता. एकनाथ शिंदे मला म्हणाले, तुम्ही काहीतरी करा त्यावर मी त्यांना विचारले, काय करायचं? तर ते मला म्हणाले, आपण मोदींबरोबर जायला पाहिजे. मी त्यांना म्हटलं, मोदींबरोबर का जायचं? इथे आपलं सगळं चांगलं चाललंय. आपल्या शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे हे या राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी उभा आहे. राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे सरकार उत्तमपणे चाललं आहे. उद्धव ठाकरे यांच्या राज्यकारभाराने गती पकडली आहे आणि तुम्ही म्हणताय हा निर्णय बदलायला हवा, कशासाठी बदलायचा? त्यावर ते मला एवढंच म्हणाले, माझ्या मागे ईडी आणि सीबीआयवाले लागले आहेत. मी त्यांना लगेच म्हटले, ईडी आणि सीबीआयवाले उगाच कोणाच्या मागे लागत नाहीत. ते माझ्याही मागे लागले होते, मात्र त्यांना मला सोडावे लागले. त्यावर ते म्हणाले आता आपल्याला निर्णय घ्यावा लागेल, मी काही तुरुंगात जाणार नाही. याचा अर्थ हे महाशय घाबरून पळून गेले आहेत. म्हणजेच यांच्याकडे निष्ठा, नैतिकता, विचार असं काहीच नाही. अशी टीका करुन राऊत म्हणाले, यांच्याकडे शिवसेनेच्या नावावर यांनी वाममार्गाने कोट्यवधी रुपये कमावले आणि त्या लुटीला संरक्षण मिळावे म्हणून यांनी मोदींचा मार्ग स्वीकारला. ते भाजपाच्या वॉशिंग मशिनमध्ये गेले. जाताना शिवसेनेच्या ४० लोकांना बरोबर घेऊन गेले. मला आता त्यांना एकच प्रश्न विचारायचा आहे की हे सगळे केल्यानंतर तुम्ही बाळासाहेबांना तोंड कसं दाखवणार? बाळासाहेबांचं राहू द्या, आनंद दिघे यांना तरी तोंड दाखवू शकता का? त्यांच्या स्मारकावर जाऊन नतमस्तक व्हायची तुमची लायकी नाही. असेही त्यांनी सांगितले.



विधान परिषद शिक्षक, पदवीधर मतदारसंघाची १० जूनला द्वैवार्षिक निवडणूक

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ मे-

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरिता निवडणूक होत असून यासाठी सोमवार, १० जूनला मतदान होणार आहे.

विलास पोतनीस (मुंबई पदवीधर मतदारसंघ), निरंजन डावखरे (कोकण पदवीधर मतदारसंघ), किशोर दराडे (नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ) आणि कपिल पाटील (मुंबई शिक्षक मतदारसंघ) हे ७ जुलैला महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे आयोगाने २ शिक्षक मतदारसंघ आणि २ पदवीधर मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी बुधवार, १५ मे रोजी अधिसूचना जारी केली जाईल. या निवडणुकीकरिता बुधवार, २२ मे पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येईल. अर्जांची छाननी शुक्रवार, २४ मे रोजी केली जाईल तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत सोमवार, २७ मे अशी आहे. सोमवार, १० जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत या चारही मतदारसंघाकरिता मतदान होईल. गुरूवार, १३ जून रोजी मतमोजणी होईल. ही संपूर्ण प्रक्रिया दिनांक १८ जून रोजी पूर्ण होईल.

मुंडे गडाचे साम्राज्य शरद पवार भेदणार का?

तभा वृत्तसेवा । जमीर काझी
बीड, दि.८ मे-

मराठवाड्यातील राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या बीड जिल्ह्यात यंदाच्या लोकसभा निवडणुकीने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. जवळपास दीड दशकानंतर बहिण-भावांचा एकत्रित प्रचार आणि राष्ट्रवादीतील फूट, मराठा आरक्षणाचासाठीचे आंदोलन आणि भाजपाचा उमेदवारातील बदलामुळे प्रचाराची रणनीती व समीकरणे बदललेली आहेत. त्यामुळे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडेंचा गड काबीज करण्यासाठी शरद पवारांनी मुरब्बीपणे व्यूहरचना केली आहे.

गेल्या साडेचार वर्षापासून राजकीय विजयसन वासात असलेल्या मुंडे घरातील उमेदवार असूनही लढत अटीतटीची होत आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांना सभा घ्यावी लागली आहे.

बीड मतदारसंघावर २००९ पासून भाजपाचे वर्चस्व आहे. भाजपाचे झुंजारू नेते गोपीनाराव मुंडे यांच्या निधनानंतर डॉ.प्रीतम मुंडे यांनी राजकारणात पदार्पण करीत थेट संसदेत पाऊल टाकले. २०१९ मध्ये त्यांनी बजरंग सोनवणे यांना जवळपास सव्वा लाखावर मतांनी पराभूत केले होते. पण यावेळेस भाजपाने केलेल्या अंतर्गत सर्वे त्यांच्याबद्दल मतदारांमध्ये मोठी नाराजी असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी त्यांच्याऐवजी गेल्या जवळपास साडेचार वर्षापासून राजकीय विजनवासात गेलेल्या त्यांची मोठी बहीण पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली. त्यांचे राजकीय विरोधक असलेले चुलत बंधू धनंजय मुंडे यांनी अजित पवार समवेत भाजपाच्या सरकारात सामील झाल्याने त्यांना आपल्या बहिणीला निवडून देण्याची जबाबदारी पार पाडावी लागणे अर्थात पंकजा दिल्लीत गेल्यास त्यांना विधानसभेवेळी कसलाही त्रास होणार नसल्याने त्यांच्यासाठी ते सोयीस्करच ठरत आहे. त्यांच्यासह या मतदारसंघांतर्गत केज विधानसभेतून भाजपाच्या नमिता मुंदडा, माजलगावमधून अजित पवार गटाचे प्रकाश सोळंके, गेवराईतून भाजापाचे लक्ष्मण पवार व आष्टीतून बाळासाहेब आजबे त्यांच्या प्रचारासाठी सज्ज आहेत. त्याचबरोबर विधान परिषदेचे सुरेश धस यांची साथ आहे. तर सोनवणे आमच्याकडे पवार गटाचे आमदार व जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर एकमेव त्यांच्यासोबत आहेत.

मात्र सरकार बद्दलची नाराजी, मराठा आंदोलन शिवसेना व राष्ट्रवादीच्या फुटीबद्दल सर्वसामान्यांतील नाराजी विधानसभेतील पराभवानंतर पंकजा मुंडेंचा जिल्ह्याशी कमी झालेला संपर्क, बंद पडलेला बैद्यनाथ कारखाना हे मुद्दे पंकजा यांच्यासाठी अडचणीचे ठरणारे आहेत.

एकवीस लाखांवर मतदार असलेल्या बीड जिल्ह्यात मराठा समाज सर्वाधिक आहे. त्यामुळे अंतरवाली सराटी येथील आंदोलनाचे सर्वाधिक पडसाद जिल्ह्यात उमटले आहेत. आंदोलनाचे २०० पेक्षा जास्त गुन्हे नोंद झाल्याने सकल मराठा समाज नाराज आहे.

याबाबी महाविकास आघाडीचे सोनवणे यांच्या पथ्यावर पडणाऱ्या असल्यातरी शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे यांची भूमिका ही महत्त्वाची ठरणार आहे. त्यांनी शासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेत निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्याबाबत पवार यांच्याशी दोनवेळा भेटी घेतली. मात्र त्यांच्याकडून सोनवणे यांच्या नावाला पसंती देण्यात आल्याने ज्योती मेटे या 'वंचित' कडून किंवा अपक्ष उमेदवार अपक्ष म्हणून रिंगणात असतील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र त्यांनी शेवटच्याक्षणी निवडणुकीत न उभे राहता कोणालाही पाठिंबा न देण्याचे जाहीर केले आहे.

बीड जिल्ह्याच्या विकासाचा विचार केला, तर चिंताजनक परिस्थिती आहे. मागील २० वर्षात एकही औद्योगीक वसाहत स्थापन करण्यात आली नाही. अनेक उद्योग बंद पडले आहेत आणि बंद पडत आहेत. नगर-बीड-परळी रेल्वेमार्गही पूर्ण झाले नाही. अनेक खेडे गावात रस्ते नाहीत, जिल्ह्यात झालेले महामार्ग अरुंद झाल्याने आपघाताचे प्रमाण वाढले आहेत. त्यामुळे निवडणूक प्रचारात विकासाच्या मुद्द्याऐवजी भावनिक मुद्दाच महायुतीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

रणसंग्राम लोकसभेचा; लक्षवेधी लढत

बीड मतदार संघ

पंकजा मुंडे यांच्यासाठी सकारात्मक बाबी

- ✻ केंद्र व राज्य सरकारातील दिग्गज नेते प्रचार यंत्रणेत सक्रिय
- ✻ धनंजय मुंडे यांच्या गटाची साथ

✻ नकारात्मक बाबी

- ✻ दोन टर्म खासदार असलेल्या बहीण प्रीतम मुंडे यांच्याबद्दल मतदारातील नाराजी
- ✻ विधानसभेतील पराभवानंतर जनतेशी संपर्काचा अभाव व राज्यातील नेतृत्वाशी असलेले मतभेद

बजरंग सोनवणे यांच्यासाठी सकारात्मक बाबी

- ✻ राष्ट्रवादीच्या फुटीमुळे शरद पवार यांना मिळणाऱ्या सहानुभूतीचा फायदा
- ✻ मराठा आरक्षण आंदोलन, ज्योती मेटे यांची निवडणुकीतून माघार

✻ नकारात्मक बाबी

- ✻ मुंडे बंधू-भगिनीं एकत्र असल्याने वंजारी समाजाची मते
- ✻ मराठा समाजातील काही नेत्यांचा महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

अग्रलेख...

इंडिया आघाडीची शकलेच होणार!

निवडणूक प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी 'चारसौ पार'चे लक्ष्य पूर्ण करेल तसेच निवडणुकीनंतर इंडिया आघाडीचे अस्तित्व संपुष्टात येईल, या भाकिताचा पुनरुच्चार केला आहे. या भाकितामागे पंतप्रधानांचा प्रदीर्घ राजकारणाचा अनुभव आहे. 'उचलली जीभ आणि लावली टाळूला' हा सर्वसामान्य राजकारण्यांचा जुमला त्यात नाही. एकीकडे इंडिया आघाडी दिवसेंदिवस कमकुवत होत असताना मोदींसह भाजपाचे स्टार प्रचारक 'चारसौ पार'चा जो नारा देत आहेत, तो पूर्णत्वास जात असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. इंडिया आघाडी दिवसागणीक कमकुवत होत आहे. आघाडीमधील नेते आपल्या नेत्यांची साथ सोडून राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कॅम्पमध्ये खासकरून भाजपामध्ये डेरेदाखल होत आहेत. या नेत्यांना आपला पक्ष भविष्यात सत्तेवर येणार नाही, याची जणू खात्रीच पटली आहे. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी मात्र भाजपाविरोधात रान पेटवण्याचाच विडा उचलला असून भाजपा विशेषतः मोदी सत्तेत आल्यास राज्यघटनेत आमूलाग्र बदल होईल, असे पालुपदच त्यांनी लावलेले आहे. मतदारांना मोदी सरकारची भीती दाखवणे सुरू आहे. निवडणुकीचे हे तंत्रच आहे, जेव्हा तुम्ही मतदारांना आपली धोरणे पटवून देऊ शकत नाही, तेव्हा तुम्ही त्यांच्यात संभ्रम निर्माण करा; ही ती मानसिकता आहे. त्याच मतदारांच्या मानसिकतेला कुरवाळण्याचे धोरण विरोधकांनी अवलंबिले आहे. मोदी सत्तेत आले तर राज्यघटना बदलून टाकणार, असा जो दावा विरोधकांकडून केला जातोय्, त्यात खरेच तथ्य आहे का? असे घडवून आणणे राजकीय व कायदेशीरदृष्ट्या शक्य तरी आहे का? भारतीय मतदारांना संविधान बदलासंदर्भात असे महत्त्वाचे प्रश्न देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे ओलांडल्यानंतर तर पडायलाच हवेत.

मोदी म्हणतात, भारतीय राज्यघटना पवित्र असून तिने लोकशाहीच्या भावनेचे जतन करताना, देशाच्या लक्षावधी नागरिकांना एकत्र आणले आहे. असा विचार करणारी व्यक्ती खरोखरीच संविधान बदलेल, अशी कल्पना तरी करता येईल का? मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून विरोधक घटना बदलाची भीती दाखवून मोदींना व्हिलन ठरविण्याच्या प्रयत्नात आहेत. मोदींनी गेल्या १० वर्षांत दलित, शोषित, पीडितांसाठी केलेली कामे बोलकी असून त्यांचे होणारे प्रतिमाभंजन लोक खपवून घेण्याच्या तयारीत नाहीत. उलट मोदींवर विनाकारण शरसंधान करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी मतदार तयार झालेले दिसत आहेत. आजवर राज्यघटनेत १०४ वेळा बदल करण्यात आले. त्यातील सर्वात जास्त बदल काँग्रेस पक्षाच्याच म्हणजे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या राजवटीत झालेले आहेत. मग काँग्रेस पक्षाला संविधान बदलाबाबत विनाकारण मोदींकडे बोट दाखवण्याचा अधिकार उरतो का, हा प्रश्न उपस्थित होतो. आता निवडणुका सुरू असतानाच्या काळातच कर्नाटकातील काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्य घटनेतील तरतुदींना वाटाण्याच्या अक्षता लावून मुस्लिमांचा ओबीसी प्रवर्गात समावेश करण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे राज्य घटनेनुसार एससी, एसटी, ओबीसींसाठी राखीव असलेल्या जागांवर मुस्लिमांकडून डल्ला मारला जाणार, हे सुनिश्चित झाले आहे. आणिबाणी काळात लोकशाही धोक्यात नव्हती का? एक चहावाला गरिबाचा मुलगा देशाचा पंतप्रधान झाला; त्यानंतरच इंडियावाल्यांना लोकतंत्र आणि संविधान धोक्यात दिसायला लागले का, असेही प्रश्न उपस्थित होतातच. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान कुठे सनातन धर्मावर टीका तर कुठे सीएएचा मुद्दा उपस्थित करून भारतीयांचे नागरिकत्व धोक्यात आल्याचा बागुलबुवा उभा करण्याचा इंडिया आघाडीचा प्रयत्न सुरू आहे. अयोध्येतील रामललाच्या मंदिराच्या दर्शनाला गेलेल्या आपल्या पक्षातील नेत्यांना एकटे पाडण्यात आणि प्रसंगी त्यांना पक्षाबाहेर पडण्यासाठी बाध्य करण्याचा कटही काँग्रेस श्रेष्ठींच्या कोंडाळ्यातील नेत्यांनी रचला. सनातनचा अपमान सहन न झाल्याने पक्षाबाहेर पडणाऱ्या आपल्याच वरिष्ठ नेत्यांवर काँग्रेसने ते भाजपाचा अजेंडा राबवत असल्याची टीका करून आपला संकुचितपणा सिद्ध केलेला आहे.

निवडणुकीत सर्वच जाती-धर्माच्या लोकांसाठी काय केले, हे राजकीय पक्षाच्या नेत्यांना सांगावे लागते, विकास कामांचा लेखाजोखा त्यांच्यापुढे मांडावा लागतो. पण काँग्रेस आणि त्यांच्या इंडिया आघाडीकडे विकासात्मक दृष्टिकोनाचाच अभाव असल्याने मोदींवर टीका करण्याशिवाय त्यांच्याजवळ दुसरे मुद्दे नाहीत. काँग्रेसचे महाराष्ट्रातील नेते विजय वडेट्टीवार यांनी तर अकलेचे तारेच तोडले आहेत. राज्यातील कणखर आणि धाडसी पोलिस अधिकारी हेमंत करकरे यांची हत्या अजमल कसाब या अतिरेक्याने केल्याचे न्यायालयात सिद्ध झाले असताना, केवळ व्होट बँकेच्या राजकारणापायी, त्यांची हत्या अजमलने केलीच नाही, असे पाकधार्जिणे वक्तव्य त्यांनी केले आहे. २६/११ चा दहशतवादी हल्ला हा पाकिस्ताननेच घडवून आणला होता, हे न्यायालयात सिद्ध झाल्याने, तो हल्ला नाकारणारा पाकिस्तानसुद्धा तोंडघशी पडला होता, ही बाब कशी नाकारता येईल? राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा तर अंबानी, अडाणी या उद्योगपतींच्या नावे अक्षरशः बोंबा ठोकून राहिले आहेत. कितीही झाले तरी ही मंडळी काय आणि टाटा-बिर्ला काय, ते संपत्ती निर्माते आहेत, रोजगाराचे सृजन करणारे आहेत. त्यांचा सन्मान करण्याचे सोडून त्यांच्यावर शरसंधान करणे कितपत योग्य आहे? उद्योजक तयार करणे हे येरागबाळ्याचे काम नाही. नोकरी कुणीही करू शकतो, पण एखाद्या कंपनीने व्यवसायाच्या संधी ओळखून कोट्यवधींची गुंतवणूक करायची आणि संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार लाभ कमवायचा, यात जी जोखीम आहे, ती कोणीही स्वीकारू शकत नाही. त्यासाठी उद्योजकतेची मानसिकताच विकसित व्हावी लागते. ती असल्यानेच आपल्या देशातील काही उद्योगपती विदेशी उद्योगांशी स्पर्धा करताना दिसत आहेत. पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांना हवाई दलाच्या अधिकाऱ्यांवर पुंछ क्षेत्रात निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर झालेल्या हल्ल्यात कटकारस्थान दिसते; याला इंडिया आघाडीचा नतद्रष्टपणाच म्हणावा लागेल. आधी प्रश्न उपस्थित करायचा आणि मग आम्हाला भारतीय हवाई दलाचा गौरवच आहे, असे सांगून केल्या वक्तव्याबद्दल माफी मागायची, यात काय हशील? 'बूंद से गयी वह हौद से नही आती' असाच हा प्रकार आहे. भारतात पूर्वेकडील लोक चिनी आणि दक्षिणेकडील लोक आफ्रिकन दिसतात, असे वक्तव्य करून ओव्हरसीज काँग्रेसचे नेते सॅम पित्रोदा भारतीय समाजात फूट पाडण्याचे कारस्थान करीत आहेत. याच सॅम पित्रोदांनी निवडणुकीच्या आरंभी भारतात वारसा कर लागू करण्याबाबत वक्तव्य करून, वारसा करांतर्गत ५५ टक्के संपत्ती अमेरिकेप्रमाणे सरकारजमा व्हायला हवी, असे मत प्रकट केले होते. मोदींनी यावर जोरदार टीका करून पित्रोदांची आणि पर्यायाने काँग्रेसची मनीषा जगजाहीर केल्याने, काँग्रेसला पित्रोदांच्या विधानाशी आमचा काही संबंध नाही, अशी भूमिका घ्यावी लागली होती. तामिळनाडूतील मंत्री उदयनिधी यांचे सनातनविरोधी वक्तव्यसुद्धा विशिष्ट समुदायाला पक्षाकडे आकर्षित करणारे होते. लालू काय आणि अखिलेश काय, तसेच ममता काय आणि सुप्रिया काय सारेच एका माळ्यातील मणी आहेत. इंडिया आघाडीतील ममता पश्चिम बंगालमध्ये डाव्यांस काँग्रेसपुढे उभ्या ठाकल्या आहेत तर केरळमध्ये डाव्यांनी राहुल गांधींना आव्हान दिले आहे. आम आदमी पार्टी आणि काँग्रेस गठबंधन पंजाबमध्ये तुटले असून अखिलेशने काँग्रेसला उत्तरप्रदेशात फाट्यावर ठेवले आहे. आज ही सारी मंडळी इंडिया आघाडीचा झेंडा खांद्यावर बाळगत असली, तरी पराभव झाल्यास तो कोणाच्या माथी मारायचा, यावरून संघर्ष होऊन इंडिया आघाडीची शकले पडणार, हे भविष्यातील वास्तव आजच दिसू लागले आहे. ▮▮

कटाक्ष

गजानन निमदेव

होरपळून काढतोय् आरोपांचा ताप!

१८व्या लोकसभेसाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. मतदानाचे तीन टप्पे पार पडले आहेत. चौथा टप्पा १३ मे रोजी पार पडेल. लोकशाहीत निवडणुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा लोकशाहीचा आत्मा आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने मतदान केले पाहिजे. आपल्याला आवडणाऱ्या आणि देशहिताला प्राधान्य देणाऱ्या उमेदवाराला निवडून देण्यासाठी प्रत्येकाने प्रक्रियेत सक्रिय सहभागी झाले पाहिजे. दुर्दैवाने मतदार मतदानाच्या प्रक्रियेत शंभर टक्के सहभागी होत नाहीत. मतदानाची टक्केवारी लक्षात घेतली तर निराशा पदरी पडते. पाच वर्षांतून एकदाच येणारी निवडणूक देशाचे भविष्य कुणाच्या हाती सोपवायचे, याचा फैसला करणारी असते. त्यामुळे हा फैसला योग्य झाला पाहिजे यादृष्टीने मतदान प्रत्येकाने करायलाच हवे. निवडणुकीत उभा असलेल्या उमेदवाराची पृष्ठभूमी काय आहे, तो ज्या पक्षाकडून उभा आहे त्या पक्षाची विचारधारा काय आहे, देशाला प्रगतिपथावर नेण्याची क्षमता त्याच्या पक्षनेतृत्वाकडे आहे का, या सर्व बाबींचा विचार करून अपवाद वगळता सर्व मतदारांनी मतदान करायलाच हवे. मात्र, असे होताना दिसत नाही. याच्या परिणामी अनेकदा पात्रता नसलेले लोक संसदेत निवडून जातात.

२०१४ आणि २०१९ अशा सलग दोन निवडणुका भारतीय जनता पार्टीने जिंकल्या आहेत. दोन्ही वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रात भाजपाप्रणीत रालोआचे सरकार सत्तेत आले आहे आणि आता २०२४ मध्ये तिसऱ्यांदा मोदींच्याच नेतृत्वातील सरकार सत्तेत येऊ घातले आहे. जनतेचा मूड हा भाजपा आणि मोदींच्या बाजूने दिसतो आहे. त्यामुळे निराश झालेल्या विरोधकांनी भाजपाविरुद्ध आघाडी उघडताना आरोपांची राळ उडवून दिली आहे. निवडणुका म्हटल्या की आरोप-प्रत्यारोप हे होणारच. पण, आरोप करताना आणि आरोपांना उत्तर देताना सगळ्यांनीच मर्यादाभंग होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. आपली लोकशाही ही ७६ वर्षांची झाली आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवही आपल्या लोकशाहीने साजरा केला आहे. त्यामुळे खरे तर लोकशाहीला प्रगल्भता यायला हवी होती. पण, दुर्दैवाने लोकशाही प्रगल्भ होण्याऐवजी अधोगतीकडे वाटचाल करते आहे की काय, अशी भीती वाटावी, असे वातावरण आणि नेत्यांची वागणूक दिसते आहे. ज्या प्रकारचे आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षातील अन्य नेते करीत आहेत, ते पाहता आरोपांच्या चटक्यांनी ताप वाढतो आहे आणि हा ताप मतदारांना व लोकशाहीलाही होरपळून काढतो आहे. यातून मार्ग काढणे हे सर्वस्वी मतदारांच्याच हाती आहे. लोकशाही कुणाच्या हाती सुरक्षित आहे, याचा विचार करून मतदान करायला हवे.

मताधिकार वापरल्यानेच जनतेला केंद्रात सरकार मिळते. निवडणुकीत मतदान केल्याने संसदीय क्षेत्राला लोकप्रतिनिधी मिळतो आणि निवडून आलेल्या प्रतिनिधीने जनतेप्रती निष्ठा ठेवून सेवा करावी, अशी अपेक्षा असते. निवडणुकीच्या निमित्ताने प्रत्येक राजकीय पक्षाला त्याची विचारधारा जनतेपुढे मांडण्याची सुवर्ण संधी लाभते. यानिमित्ताने मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्ष कसोशीने प्रयत्नही करतो. मात्र, आपली विचारधारा पुढे करताना जे आरोप यंदाच्या निवडणुकीत केले जात आहेत, त्यामुळे लोकशाही घायाळ झाली आहे. निवडणुकीच्या निमित्ताने मतदारांना प्रभावित करण्यासाठी आपली विचारधारा प्रभावीरीत्या त्यांच्यापुढे मांडण्याची एक सुवर्ण संधी उमेदवार आणि त्यांच्या पक्षांना मिळते. या संधीचे सोने करण्याऐवजी नेते आणि पक्ष मातेरे करणार असतील तर त्याला कोण काय करणार? आरोप-प्रत्यारोपांनी प्रत्येकच निवडणूक गाजत असते. यापूर्वी झालेल्या सगळ्याच निवडणुका गाजल्या आहेत. पण, यंदाची निवडणूक अपवाद ठरते आहे. आरोपांचा स्तर पार घसरला आहे. लोकशाहीला लाज आणणारे प्रसंग घडत आहेत. सध्याच्या निवडणूक प्रचारात आरोप आणि प्रत्यारोप ज्या स्तरावर होत असल्याचे आपण पाहतो, त्याने सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. गोंधळाची जागा कलहाने घेतली आहे. आरोप-प्रत्यारोपांची प्रकृती गंभीर झाली आहेत. आक्रमकता वाढली आहे. स्तर घसरला आहे. मे महिना सुरू आहे. वातावरणात ताप असताना राजकीय आरोपांनीही ताप वाढवला आहे. एकीकडे लोक उष्म्याने होरपळून निघत आहेत; दुसरीकडे आक्रमक आरोपांनी लोकशाही होरपळून निघते आहे. काय चांगले, काय वाईट याचा विचार न करता जे काही बोलले जात आहे, त्याचे गंभीर आणि अतिशय वाईट परिणाम आपल्यालाच भोगावे लागणार आहेत. वैचारिक मतभेदांची जागा मनभेदाने घेतली आहे. वैरभाव वाढीस लागला आहे. आरोप करताना समोर कट्टर शत्रू असल्याप्रमाणे बोलले जात आहे. वैचारिक असहमती दर्शवताना जी भाषा वापरली जात आहे, ती लोकशाहीला मारक आहे. सर्वत्र खोटे आरोप केले जात आहेत. बनावट व्हिडीओ प्रसारित केले जात आहेत. छेडछाड करून व्हायरल केलेल्या व्हिडीओतून अर्धसत्यच समाजापुढे आणले जात आहे. अर्धसत्याचा प्रयोग देशभर सुरू आहे. बिनबुडाच्या आरोपांनी आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या प्रत्यारोपांनी लोकशाहीच्या उत्सवाला गालबोट लागत आहे. पंजाबचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते चरणजित चन्नी यांनी हवाई दलाच्या पथकावर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याला भाजपाचा 'निवडणूक स्टंट' संबोधून विनाकारण वाद उत्पन्न केला. सुरक्षा दलाच्या बाबतीत आपण काय बोलतो आहोत, आरोप करतो आहोत, याचे काय परिणाम होतील, याची कसलीही तमा न बाळगता चन्नीसारखे चवन्नीछाप नेते बरळत असल्याने जनमानसही क्षुब्ध होते. निवडणुकीत धनबळाचा उपयोग घातक सिद्ध ठरत आहे. झारखंडमध्ये मंत्री आलमगीर आलम यांच्या खाजगी सचिवाच्या नोकराच्या घरी कोट्यवधी रुपयांची रोकड सापडली आहे. ५०० रुपयांच्या नोटांचा ढिग १५ हजार रुपये पगार असलेल्या नोकराच्या घरी सापडलेला पाहून कारवाई करणारे अधिकारीही अचंबित झाले. नोटा वाटून मते मिळविण्याची काँग्रेसची जुनीच परंपरा आहे. मतदारांची मने जिंकून निवडणुकीत विजय प्राप्त करता येत नाही, हे लक्षात येताच तणाव आणि कलह निर्माण करत मतदारांच्या मनात संभ्रम पसरवायचा उद्योग काँग्रेस आणि अन्य विरोधकांनी सुरू केला आहे. तणाव आणि कलहाने भरलेले राजकीय वातावरण देशापुढचे मोठे आव्हान आहे. हे आव्हान आता जनतेलाच पेलायचे आहे. काय चूक आणि काय बरोबर, याचा फैसला जनतेलाच करायचा आहे.

पैसे देऊन मते विकत घेण्याचा मूळ फंडा काँग्रेसचाच आहे. कारण, देशात सर्वाधिक काळ सत्ता काँग्रेसचीच होती. सत्तेसाठी पैसा आणि पैशांतून पुन्हा सत्ता हा खेळ काँग्रेसनेच खेळला आहे. त्याचा दुष्प्रभाव आज प्रकर्षाने जाणवतो आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मताधिकार हा लोकशाहीचा मूळ आधार असल्याचे म्हटले होते. संविधान सभेत स्वतंत्र निवडणूक आयोग बनविण्याचा प्रस्ताव आंबेडकरांनी ठेवला होता, त्याचवेळी त्यांनी हे भाष्य केले होते. 'निवडणुका या निष्पक्ष झाल्या पाहिजेत' हा स्वतंत्र निवडणूक आयोग निर्माण करण्यामागचा हेतू. हेतू उदात्तच होता. घटनाकारांकडे दूरदृष्टी होती. पण, आज निवडणुकांच्या आधी आणि आता निवडणूक काळात जे तापदायक वातावरण अनुभवास येत आहे, ते पाहता तो हेतू साध्य होतो का, याबाबत शंकाच वाटते. काँग्रेसने कायम तुष्टीकरणाचे धोरण राबवून निवडणुका जिंकल्या. देशाला विभाजित ठेवण्याचा प्रयत्न केला. मुस्लिमांच्या मनात हिंदूंबाबत दहशत निर्माण केली आणि ती कायम कशी राहील, यासाठी प्रयत्न केले. आजही काँग्रेसकडून तेच प्रयत्न सुरू आहेत. हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करण्यास पोषक वातावरण तयार करायचे आणि आपली राजकीय पोळी शेकायची, हा जुनाच उद्योग काँग्रेसने भरभराटीस आणला आहे. आक्रमक झालेले वातावरण, निर्माण केला गेलेला द्वेष, कटुता हे सगळे संपविण्याची क्षमता मतदारांमध्ये आहे. 'आज नाही तर कधीच नाही,' हे वाक्य लक्षात ठेवत मतदारांनी मताधिकार बजावला पाहिजे आणि निर्माण झालेले गढूळ वातावरण संपुष्टात आणले पाहिजे. ▮▮

वेध

नंदकिशोर काथवटे

लाचखोरी

सामान्य नागरिक रक्ताचे पाणी करून, आपल्या अडचणी बाजूला ठेवत आयकर व इतरही कर प्रामाणिकपणे भरतात. त्यांनी भरलेल्या करातूनच देशातील विकास कामे होतात आणि शासकीय नोकरदाराला पगार दिला जातो. दर महिन्याला शासनाकडून लठ्ठ पगार मिळत असतानाही प्रशासनात दिवसागणीक लाचखोरी वाढतच आहे. रोज कुठे ना कुठे पैशासाठी सामान्य माणसांची पिळवणूक केली जाते. इच्छा नसतानाही काम करवून घ्यायचे असल्यामुळे काही जण पैसे देतात. त्याची कुठेच वाच्यता करीत नाहीत. त्यामुळेच अनेक शासकीय अधिकारी व कर्मचारी निर्ढावले आहेत. लाच घेताना रंगेहात पकडल्यानंतरही फारशी काही कठोर शिक्षा होत नसल्याने शासकीय नोकरदार भ्रष्टाचाराला शिष्टाचाराच्या रूपाने पुढे आणत आहेत. लाच घेणे, लाच देणे हे शब्द सामान्यांसाठी आता नवीन राहिलेले नाहीत. एखादा शासकीय अधिकारी, कर्मचारी लाच घेताना सापडल्यानंतरही त्याला कुठलीच लाज वाटत नाही. उलट दुसऱ्याच दिवशी उजळमाथ्याने तो बाहेर फिरायला मोकळा असतो. एखाद्या कारवाईत निलंबन झाल्यानंतर याच लाचखोरांना परत सेवेत सामावून घेण्यासाठी दुसरे लाचखोर अधिकारी तयारच असतात. यावेळी अचानक लाचखोरांचा मुद्दा मांडण्याचे कारण म्हणजे, पूर्व विदर्भात मंगळवारी एकाच दिवशी सहा जणांवर लाचखोरीचा गुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नोंदविला आहे. पाच अधिकारी लाच घेताना सापडले. ही बाब खरंच समाजासाठी आणि प्रशासनासाठी चिंताजनक आहे. चंद्रपुरातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक संजय पाटील, दुय्यम निरीक्षक चेतन खारोडे व कार्यालय अधीक्षक अभय थाताड या तिघांना एक लाख रुपयांची लाच घेताना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या जाळ्यात अडकविले आहे. बीअर शॉपीच्या परवान्यासाठी या तिघांनी ही लाच स्वीकारली. शासनाचा पगार घ्यायचा आणि शासकीय कामे करण्यासाठीच सामान्यांकडून लाच मागायची, यापेक्षा दुसरे दुर्दैव कुठले असेल. चंद्रपुरात एकीकडे ही घटना घडत असतानाच गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव येथील तहसीलदार किसन भदाने यांच्यासह नायब तहसीलदार नागापुरे व अन्य एका व्यक्तीला एक लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आणि या तिघांवरही गुन्हा नोंदविण्यात आला. गोरेगाव तालुक्यातील वाळू वाहतुकीच्या संदर्भात तहसीलदार किसन भदाने यांनी या लाचेची मागणी केली. अनेक जण अवैध काम करण्यासाठी लाच देतात, हे आता लपून राहिलेले नाही. अवैध काम करणाऱ्यांकडून लाच घेणे एकवेळचे समजू शकते. मात्र, जो प्रामाणिक काम करणारा आहे, ज्याचे कुठलेही काम अवैध नाही अशा निष्पाप लोकांनाही शासकीय नोकरदार जर त्रास देत पैशासाठी सामान्यांची पिळवणूक करीत असतील तर अशा लाचखोरांना अद्दल घडविणे आवश्यक आहे. एकाच दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी तीन बड्या अधिकाऱ्यांना लाच घेताना अटक करून पूर्व विदर्भात खळबळ उडवून दिली आहे. या लाचखोरांवर कठोर कारवाई करण्यासाठी शासनाने आता त्याच ताकदीने पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा लाचखोर निर्ढावत जातील आणि सामान्य व गरजू लोकांची पैशासाठी पिळवणूक करतील. लाचखोरी ही आता विकृतीच्या रूपाने पुढे येऊ लागली आहेत. पैसे नाही तर सामान्यांची कामे नाही असेच धोरण अनेक शासकीय कार्यालयात बघायला मिळते. म्हणूनच शासकीय नोकरदाराच्या घरात कोट्यवधींच्या रकमा सापडतात. भ्रष्टाचाराने देश किती बरबटत चालला आहे, हे आता स्पष्टपणे जाणवू लागले आहे. लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, मंत्रालयातील नोकरदार, तहसील, जिल्हा स्थानावरील शासकीय कर्मचारी यातील बहुतांश जण भ्रष्टाचाराने न्हाऊन निघाले आहेत. परवा झारखंडमध्ये ग्रामीण विकासमंत्री आलमगीर आलम यांच्या पीएसह त्याच्या नोकराला अटक करण्यात आली आहे. ईडीने टाकलेल्या धाडीत पीएच्या घरगड्याच्या घरात ३३ कोटी रुपयांची रोकड सापडली. इतका पैसा एका घरगड्याच्या घरात सापडतो याचाच अर्थ भ्रष्टाचाराचे हे कुरण देशात कुठपर्यंत पसरले आहे, याची प्रचीती येईल. भ्रष्टाचार करून कमाविलेल्या या पैशाचे हे लोकप्रतिनिधी, शासकीय नोकरदार नेमके काय करतात? केवळ पैसाच त्यांची भूक झाली आहे का? या भुकेपायी त्यांच्यातील माणुसकी हरविली आहे का? त्यांच्या संवेदनासुद्धा बोथट झाल्या आहेत का? सामान्य व गरिबांकडून पैसे घेताना या नोकरदाराचे जराही हात थरथरत नाहीत! हे समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने खरंच घातक आहे. लाचखोरी ही कीड आहे, यावर आता सरकारने कठोर निर्णय घेण्याची गरज आहे. ▮▮

९९२२९९९५८८

दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवावी का?

काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यावेळी केरळमधील वायनाड आणि उत्तरप्रदेशातील रायबरेली अशा दोन लोकसभा मतदारसंघांतून निवडणूक लढवत आहेत. यापैकी वायनाडमध्ये मतदान झाले असून रायबरेलीत २० मे रोजी मतदान होत आहे. दोन लोकसभा मतदारसंघांतून निवडणूक लढवणारे राहुल गांधी यावेळचे देशातील बहुधा एकमेव उमेदवार असावेत. विशेष म्हणजे २०१९ मध्येही राहुल गांधी यांनी अमेठी आणि वायनाड अशा दोन मतदारसंघांतून लोकसभेची निवडणूक लढवली होती. त्यावेळी अमेठीत राहुल गांधी यांचा पराभव झाला, तर वायनाडमध्ये ते विजयी झाले होते. त्यामुळे दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवण्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेला आला आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ३३ नुसार कोणतीही व्यक्ती दोन मतदारसंघांतून विधानसभेची वा लोकसभेची निवडणूक लढवू शकते. १९९६ च्या आधी तर दोनपेक्षा जास्त मतदारसंघांतूनही निवडणूक लढवण्याचा अधिकार होता. १९९६ मध्ये लोकप्रतिनिधी कायद्यात करण्यात आलेल्या घटनादुरुस्तीने एकावेळी जास्तीत जास्त दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवण्याचा नेत्यांना अधिकार देण्यात आला.

याआधी देशातील अनेक नेत्यांनी एकापेक्षा जास्त मतदारसंघांतून निवडणूक लढवली आहे. २०१४ मध्ये भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या वडोदरा आणि उत्तरप्रदेशच्या वाराणसी मतदारसंघांतून निवडणूक लढवली होती. त्यावेळी ते दोन्ही मतदारसंघांतून जिंकले होते, नंतर वाराणसी कायम ठेवत त्यांनी वडोदराच्या जागेचा राजीनामा दिला होता. २०१९ मध्ये मात्र मोदी यांनी वाराणसी या एकाच मतदारसंघातून निवडणूक लढवली; यावेळीही ते याच मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. १९५६ मध्ये तत्कालीन जनसंघाचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी उत्तरप्रदेशच्या लखनौ, मथुरा आणि बलरामपूर अशा तीन मतदारसंघांतून एकाच वेळी निवडणूक लढवली होती. यापैकी लखनौ आणि मथुरेत वाजपेयी यांचा पराभव झाला, तर बलरामपूरमध्ये ते विजयी झाले. आणखी एक लोकसभा निवडणूक वाजपेयी यांनी लखनौ आणि गुजरातच्या गांधीनगर लोकसभा मतदारसंघांतून लढवत जिंकली होती. नंतर त्यांनी लखनौची जागा कायम ठेवत गांधीनगरचा राजीनामा दिला होता. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनीही १९८० मध्ये रायबरेलीसोबत आताच्या तेलंगणातील मेडक मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली होती. दोन्ही ठिकाणी विजयी झाल्यानंतर त्यांनी रायबरेलीची जागा कायम ठेवत मेडकचा राजीनामा दिला होता. मुलायमसिंह यादव, लालकृष्ण अडवाणी, लालूप्रसाद यादव, मायावती यांच्यासह अनेक नेत्यांनीही एकापेक्षा जास्त मतदारसंघांतून निवडणूक लढवली आहे.

दोन्ही ठिकाणी निवडून आल्यानंतर नेत्याला एका मतदारसंघाचा राजीनामा द्यावा लागतो, त्यामुळे त्या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागते. या पोटनिवडणुकीचा भुर्दंड करदात्यांवर बसतो. निवडणूक आयोग आणि अन्य शासकीय यंत्रणांवर यामुळे जो ताण येतो तो वेगळाच! राजकीय पक्षांच्या पैशाची उधळपट्टी होते, हा आणखी एक मुद्दा. त्यामुळे नेत्याने एकापेक्षा जास्त मतदारसंघांतून निवडणूक लढवावी का, हा मुद्दा चर्चेत आला आहे. त्यामुळेच नेत्यांना एकापेक्षा जास्त मतदारसंघांतून निवडणूक लढवण्यावर बंदी घालावी, अशी मागणी जोर धरत आहे. मतदारांना जर दोन मतदारसंघांत मतदान करता येत नाही, त्यांना एकाच मतदारसंघात मतदान करावे लागते, तर नेत्यांनाही दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवण्यावर बंदी घातली पाहिजे, असाही एक विचारप्रवाह आहे. काही वेळेला पराभवाच्या भीतीने तर काही वेळा राजकीय कारणाने नेतेमंडळी एकापेक्षा जास्त मतदारसंघांतून निवडणुकीच्या रिंगणात उतरतात. २०१९ आणि यावेळी राहुल गांधी यांनी दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवली ती पराभवाच्या भीतीने. तर, २०१४ मध्ये मोदी यांनी वडोदरासोबत वाराणसीतून जी निवडणूक लढवली, ती भाजपाच्या राजकीय व्यूहरचनेचा भाग म्हणून. उत्तरप्रदेशच्या ८० लोकसभा मतदारसंघांसोबत संपूर्ण उत्तर भारतात एक संदेश देण्यासाठी मोदी यांनी वाराणसीतून निवडणूक लढवली होती. राजकीय पक्षांच्या नेत्यांवर एकापेक्षा जास्त मतदारसंघांतून निवडणूक लढवण्यावर बंदी आणण्याची शिफारस निवडणूक आयोगाने २००४, २०१०, २०१६ आणि २०१८ मध्ये केली होती. याशिवाय विधि आयोगानेही अशी शिफारस केली होती. निवडणूक आयोग आणि विधि आयोगाच्या या शिफारसींवर काहीच झाले नाही, हे उघड आहे. अन्यथा यावेळी राहुल गांधी दोन मतदारसंघांतून निवडणुकीच्या रिंगणात उतरू शकले नसते.

'वन नेशन वन इलेक्शन'वर केंद्र सरकार गंभीर आहे, त्यामुळे 'वन कॉन्स्टिट्युअन्सी वन कँडिडेट' असा निर्णय सरकारने घेतला पाहिजे. दोन मतदारसंघांतून जिंकलेल्या आणि एका मतदारसंघाचा राजीनामा दिलेल्या उमेदवाराकडून त्या मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीचा सगळा खर्च वसूल केला पाहिजे, अशीही मागणी केली जात आहे. निवडणूक आयोगाने लोकसभेसाठी १० लाख रुपये तर विधानसभेसाठी ५ लाख रुपये दंड आकारण्याचा प्रस्ताव दिला आहे. मात्र, यावरही निर्णय झाला नाही. मुळात हा प्रस्तावच चुकीचा आहे. कारण लोकसभेच्या एका मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी १० कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रशासकीय खर्च येत असतो. त्यात १० लाखाचा मामुली दंड म्हणजे काहीच नाही. एवढी रक्कम तर राजकीय पक्षांचे उमेदवार सहज भरून टाकतील. एकापेक्षा जास्त म्हणजे दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवून दोन्ही मतदारसंघांत पराभूत झाले तर पोटनिवडणुकीची वेळ येत नाही. दोनपैकी एका मतदारसंघात विजयी झाल्यावरही पोटनिवडणूक घ्यावी लागत नाही. मात्र, उमेदवार दोन्ही मतदारसंघांत जिंकला तर त्याला एका मतदारसंघाचा राजीनामा द्यावा लागतो, त्यामुळे त्या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागते. अशा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्याऐवजी दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या उमेदवाराला विजयी घोषित करण्याची घटनादुरुस्ती केली पाहिजे. अशी दुरुस्ती केली तर राजकीय नेते दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवण्याचा हट्ट सोडून देतील, असे वाटते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदारसंघातील ज्या मतदारांनी तुम्हाला निवडून दिले, त्या मतदारसंघाचा राजीनामा देणे म्हणजे त्या मतदारांची प्रतारणा करण्यासारखे आहे. मतदारांचा हा एकप्रकारे विश्वासघातही म्हणायला हरकत नाही. त्यामुळे मतदारांनीच दोन मतदारसंघांतून निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवाराला धडा शिकवायला पाहिजे. हा उमेदवार दुसऱ्या मतदारसंघातून विजयी होईलच म्हणत, त्याला मत देऊ नये. असाच विचार पहिल्या मतदारसंघातील जनतेनेही करायला पाहिजे. 'दोन्ही घरचा पाहुणा उपाशी,' अशी वेळ दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारावर आली पाहिजे. ▮▮

९८८१७१७८१७

अक्षय्य तृतीया आणि परशुराम जयंती

हिंदू समाजात अक्षय्य तृतीयेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज याचा अपूर्व संगम झालेल्या भगवान परशुरामाचा जन्म याच दिवशी झाला. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी तो सर्वत्र साजरा केला जातो. परशुराम हा विष्णूचा सहावा अवतार. परशुरामाच्या वडिलांचे नाव जमदग्नी आणि आईचे नाव रेणुका. जमदग्नी अवतार म्हणून आजदेखील शीघ्रकोपी माणसाची ओळख करून दिली जाते. जमदग्नीला असाच एकदा राग अनावर झाला. त्यांनी परशुरामाला आईला मारण्याचे फर्मान सोडले. परशुराम आज्ञाधारक होता. जमदग्नी खूश झाले. रेणुकाला मारण्याबद्दल काय हवे ते माग, असे त्यांनी परशुरामाला वचन दिले. 'आईला जिवंत करावे,' असा वर त्याने मागितला. रेणुका जिवंत झाली. परशुराम हा अत्यंत शूर आणि पराक्रमी होता. आपल्या आई-वडिलांबरोबरच आपल्या गुरुजनांचे आज्ञापालन तो तितक्याच आदराने करीत असे. परशुराम जन्माने ब्राह्मण परंतु कर्माने क्षत्रिय होता. जनावरांच्या बरोबर त्याचे संभाषण होत, असे सर्वत्र मानले जाते. कोकण आणि मलबारच्या समुद्र पट्टीतील समुद्र हटविण्याची कामगिरी परशुरामाने केली. केरळमधील किनारपट्टीचा काही भाग हटविण्यात त्याला यश मिळाले. या भागाला 'कोल्लम इरा' असे म्हटले जाते. गोकर्ण, उडिपी, चिपळूण, कुम्बाशी, कोटेश्वर, शंकरनारायण, कोल्लूर, सुब्रह्मन्य इत्यादी भागाला परशुराम क्षेत्र म्हणून ओळखले जाते. जानापाव हे ठिकाण इंदूरजवळ असून विंध्याचल पर्वतावर शंकराचे पुरातन मंदिर असून मंदिरासमोरच भगवान परशुरामाचे मंदिर आहे. परशुरामाची शौर्यगाथा नव्या पिढीला मार्गदर्शक ठरेल, हाच या अक्षय्य तृतीयेचा सण साजरा करण्यामागील मूळ हेतू आहे.

बळवंत रानडे/९८८१४७३५८०

● ● ● ●

अक्षय्य तृतीयेचे आध्यात्मिक महत्त्व

अक्षय्य तृतीयेला काही धार्मिक कृत्ये केली जातात. या तिथीला विष्णुपूजा, होमहवन, दानधर्म केल्यास अधिक आध्यात्मिक लाभ होतो. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी ज्या देवतांमुळे आपल्याला सातत्याने सुख व समृद्धी मिळते, त्या देवतांविषयी मनात कृतज्ञता भाव ठेवून त्या देवतेची उपासना केल्यास आपल्यावर होणाऱ्या त्या देवतेच्या कृपादृष्टीचा कधीही क्षय होत नाही म्हणजेच त्या देवतेची अखंड कृपादृष्टी आपल्यावर राहते. त्याचप्रमाणे या दिवशी विष्णूसहित वैभवलक्ष्मीच्या प्रतिमेचे भावपूर्ण आणि भक्तिभावाने पूजन करावे. अक्षय्य तृतीया या तिथीची मुख्य देवता श्री विष्णू आहे. भगवान श्रीकृष्ण हा श्रीविष्णूचा अवतार असल्याने या दिवशी भगवान श्रीकृष्णाचा 'ॐ नमो भगवते वासुदेवाय...' हा जप करावा.

दीपाली गीते/९८२२००४०५४

वाचक पत्रे

महाराष्ट्र पाणीटंचाई मुक्त होईल?

महाराष्ट्रातल्या दर उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची बेसूर समस्या कायमची संपवण्यासाठी राज्याने, केंद्र सरकारने गेल्या ५० वर्षांत भरमसाट खर्च करूनही महाराष्ट्रातल्या शहरी आणि ग्रामीण भागातली पिण्याच्या पाण्याची समस्या दरवर्षी अधिकच बिकट होत आहे. यावर्षी तर सोलापूर, मुंबई, पुणे, संभाजीनगर, धाराशिव, लातूर या मोठ्या शहरांमध्ये आणि अन्य धरणातला पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत आहे. शहरी भागाला १५ दिवसांतून नळाने पाण्याचा पुरवठा सुरू आहे. धरणावर अवलंबून असलेल्या लाखो हेक्टर ऊसाला पाणी मिळणे अवघड झाले आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर जात असताना राज्यातली बहुतांश धरणे २५ टक्क्यांपेक्षा अधिक गाळाने भरल्याने पाण्याचा साठा दरवर्षी कमीच होतो. पावसाळ्यात धरणे पूर्ण क्षमतेने भरतात, पण प्रत्यक्षात धरणाच्या घडामोडी २५ टक्के पाणीसाठा कमीच असतो. परिणामी शेती आणि पिण्यासाठी उन्हाळ्यात धरणाच्या पाण्यावर अवलंबून असलेली शहरे आणि गावांवर दरवर्षीच्या उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट कोसळते. टँकरमुक्त महाराष्ट्राच्या घोषणा झाल्या; प्रत्यक्षात मात्र राज्यात टँकरवरच अवलंबून असलेल्या गावची व टँकरची संख्या वाढत गेली.

गेल्या ५० वर्षांत पाणीपुरवठा करण्यासाठी झालेल्या लाखो-कोटी रुपयांच्या खर्चात नियोजनपूर्वक पाणीटंचाईवर मात करण्यासाठी योजना विकेंद्रित स्वरूपात म्हणजेच प्रत्येक गावासाठी वेगळी योजना अंमलात आणल्या असल्या, तर पाणीटंचाईवर मात करता आली असती. पाणी फाऊंडेशन राज्यातील हजारो गावांत सामूहिक श्रमदानाद्वारे जलसंधारणाच्या शासकीय योजना पूर्ण केल्या. ही गावी पाणीटंचाईमुक्त झाली आहेत. राज्य सरकारने अशाच योजनांची कास धरायला हवी. तरच महाराष्ट्र पाणीटंचाईमुक्त होईल. ▮▮

जयश्री पुजारी/९४२१०२६२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

संक्षिप्त वृत्त

आस्था रोटी बँकेच्या वतीने आमरस बाटलीचे वाटप

सोलापूर, दि. ८ मे-

आस्था रोटी बँकेच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त २००० भक्तांना आमरस (माझा) बाटलीचे वाटप करण्यात आले. अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीतील सर्व भक्तांना देवस्थान चेअरमन महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ मंदिराचे पुजारी मंदार कुलकर्णी, आनंद तालिकोटी यांच्या हस्ते करण्यात आले. रोटी बँक गेल्या सहा वर्षांपासून अन्नदानाबरोबर अनेक सामाजिक उपक्रम राबवत असते सामाजिक बांधिलकी जोपासत समाजाचे ऋण फेडण्यासाठी समाजाचा पण काहीतरी देणे लागतो या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. या प्रसंगी आस्था रोटी बँकेचे उपाध्यक्ष आनंद तालिकोटी, वेंदात तालिकोटी, सिद्धू बेऊर, पिंटू कस्तुरे, महेश नागणसुरे, अनिल कपाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रिक्षावर कमळ चिन्ह लावून फिरणाऱ्या रिक्षा चालकावर गुन्हा दाखल

सोलापूर, दि.८ मे-

प्रचार संपल्यानंतर रिक्षावर कमळ चिन्ह लावून आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्या रिक्षाचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुरुषोत्तम सुदाम हरिसंगम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विकास मल्लिकार्जुन बिराजदार (वय ३०, रा. रेवणसिध्देश्वर नगर, विजापूर रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा कालावध संपल्यानंतर ६ मे रोजी लकी चौक ते नवी पेठ या रस्त्यावर विकास बिराजदार हा त्याच्या रिक्षावर भारतीय जनता पार्टी पक्षाचे कमळ चिन्ह लावून प्रचार करताना मिळून आला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक फौजदार सुरवसे पुढील तपास करीत आहेत.

भगवान परशुराम जयंतीनिमित्त सोलापुरात शुक्रवारी मिरवणूक

सोलापूर, दि.८ मे

शुक्रवार १० मे रोजी अक्षय्य तृतीया या दिवशी भगवान परशुराम जयंती महोत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मिरवणूक, भगवान परशुरामांच्या मूर्तीचे पूजन होणार आहे, अशी माहिती भगवान परशुराम जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रमोद तमंवार यांनी दिली. चार पुतळ्याजवळील मूर्ती पूजनासाठी सोलापूर शहरातील सर्व समाजातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहनही तमंवार यांनी केले आहे. हा जयंती महोत्सव ऊत्तमरितीने साजरा व्हावा यासाठी उत्सव समितीचे अध्यक्ष म्हणून प्रमोद तमंवार, उपाध्यक्ष म्हणून ॲड. सुधीर बेंद्रे, कार्याध्यक्ष म्हणून रमण कुलकर्णी आणि महिला प्रतिनिधी म्हणून अमृता गोसावी, मानसी कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे.

निधन वृत्त

संगीता जगताप

सोलापूर, दि. ८ मे-

संगीता अरुण जगताप (वय - ५३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्या मुळच्या अक्कलकोट तालुक्यातील गोगाव येथील असून सध्या गणेश नगर, मडकी वस्ती येथे वास्तव्यास होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा शुभम आणि मुलगी शुभांगी असा परिवार आहे.

भौरम्मा निंबाळे

अक्कलकोट दि. ८ मे-

तालुक्यातील बासलेगाव येथील भौरम्मा प्रभु निंबाळे (अंबोजी) यांची वयांचे ६५ व्या वर्षी तीव्र हृदयविकार झटकाने बुधवार ८मे रोजी दुपारी निधन झाले आहे. प्रभू निंबाळे यांचे त्या पत्नी होत. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी ९ रोजी सकाळी १० वाजता बासलेंगाव येथील त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. त्यांचा पश्चात पती मुलगा सून नात नातवंडे असा परिवार आहे.

रत्नाबाई भुसारे

सोलापूर, दि. ८ मे-

सिंदखेड येथील रत्नाबाई रामगोंडा भुसारे (वय ८४) यांचे दुःखद निधन झाले आहे.त्याच्या पश्चात चार मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी दुपारी सिंदखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. येथील विद्यानिकेतन प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री मल्लिकार्जुन भुसारे यांचे ते मातोश्री होत.

स्वप्निल बनसोडे

अक्कलकोट, दि. ८ मे-

शहरातील भीम नगर येथील युवा सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल मनोहर बनसोडे (वय ३३) यांचे मंगळवारी अकस्मिक निधन झाले. स्वप्निल बनसोडे हे वेल्डिंगचे काम करत असताना शॉक लागून त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई पत्नी दोन मुली दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी दहा वाजता भिम नगर येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. वंचित बहुजन कामगार आघाडीचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे यांचे ते छोटे बंधू होते.

काशिनाथ खोसे

पारनेर, दि ९-

पारनेर तालुक्यातील पाडळी दर्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे माजी व्हाईस चेअरमन काशिनाथ महादेव खोसे पाटील (वय ८४) यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात त्यांच्या पश्चात पत्नी मंजुळाबाई, तीन विवाहीत मुले, सुना, नातवंडे व जावई असा परिवार आहे.

रखरखत्या उन्हातही सोलापूर मतदारसंघात मतदान टक्का वाढला

जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नाला आले यश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२४ जाहीर झालेला होता. त्यानुसार दि. ७ मे २०२४ रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा या कालावधीत जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी मतदानाची प्रक्रिया पार पडली. ही प्रक्रिया अत्यंत शांतपणे सुरळीतपणे पार पडली. काही किरकोळ घटना घडल्या परंतु प्रशासनाने त्यावर तात्काळ उपाययोजना करून मतदानाची प्रक्रिया सुरळीत चालू केली. सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी सन २०१९ मध्ये ५८.४६ टक्के मतदान झालेले होते, त्यात सन २०२४ च्या निवडणुकीत ०.७३ टक्क्यांनी वाढ होऊन ५९.१९ टक्के मतदान झालेले आहे.

रखरखत्या उन्हातही मतदारांनी मतदानासाठी मतदान केंद्राबाहेर लांब लांबच रांगा लावलेल्या होत्या. प्रत्येक मतदान केंद्रावर जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी मंडप टाकून सावलीची व्यवस्था करण्यात आलेली होती, तसेच अन्य सोयी सुविधा देण्यात आलेल्या होत्या. अनेक मतदान केंद्रावर मतदारांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधा बाबत समाधान व्यक्त केलेले दिसून आले. मागील काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात उष्णतेची लाट आल्यासारखे वातावरण झालेले आहे जवळपास ४४.४ डिग्री सेल्सिअस तापमान गेलेले होते. अशा वातावरणात ही मतदार मतदानासाठी बाहेर पडला. प्रशासनाने प्रत्येक मतदान केंद्रावर सावली पिण्याच्या पाण्याचे शुद्ध पाणी तसेच उष्णतेचा त्रास होऊन डीहायड्रेशन झाल्यास तात्काळ त्यांना चांगले पाणी मिळावे यासाठी त्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली होती.

जिल्ह्यातील तीन हजार सहाशे सतरा मतदान केंद्रावर मतदारासाठी सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येऊन त्यांना अतिरिक्त मोठा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला होता. महापालिका हद्दीतील ७७२ मतदान केंद्रावर महापालिकेचे अतिरिक्त आयोग संदीप कारंजे यांनी सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या तर नगरपालिका मतदान केंद्रावर व ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी सर्व पायाभूत सोयीसुविधा निर्माण करून त्याची खात्री केली व मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टपणे नियोजन केले.

सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघातील सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनीही आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदान केंद्रावर रॅम्प, पिण्याच्या पाण्याची सुविधा जठड पावडर व पाणी, दिव्यांगासाठी व्हील चेअर ची व्यवस्था, मतदार मदत कक्ष, आदर्श मतदान केंद्र हिरकणी कक्ष या सुविधांची खात्री मतदानापूर्वी जाऊन केलेली होती. या सर्व सोयी सुविधामुळे देशाच्या व राज्याच्या अन्य भागात मतदानाच्या टक्केवारीमध्ये कमतरता येत आहे. परंतु सोलापूर लोकसभा मतदारसंघात ०.७३ टक्के वाढ झाल्याने प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या या सोयी सुविधांचाही नक्कीच लाभ झाल्याचे दिसून येत आहे.

नाभिकरत्न नरवीर शिवाजी काशीद यांची जयंती साजरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे -

महाराष्ट्र नाभिक महामंडळ शाखा सोलापूर आणि श्री. संतसेना नाभिक बहुउद्देशीय सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत नाभिक समाजाचे शिवरत्न आणि छत्रपती शिवाजी महाराजाचे विश्वासु अंगरक्षक नरवीर शिवाजी काशीद यांचा जयंतीचा कार्यक्रम येथील रामलाल चौक येथे उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सेवा प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष सुशांत क्षीरसागर हे होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष सिद्राम रूद्रार, माजी प्रदेश कार्याध्यक्ष हिंदुराव गोरे, महिला प्रदेश प्रमुख डॉ. माधुरीताई पारपल्लीवार, राज्य कार्यकारीणी सदस्य प्रकाश जागीपेठकर यांचीं उपस्थीती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोलापूर शहर अध्यक्ष मोहन जमदाडे सोलापूर जिल्हा कार्यध्यक्ष राजु शुक्लवार, सोलापूर शहर उपाध्यक्ष महेश श्रीमंगले, सोलापूर शहर कोषाध्यक्ष मल्हारी राऊत, सोलापूर जिल्हा युवक अध्यक्ष मनिष गजाळकर, विजय शुक्लबार, परशुराम श्रीमंगले, सौंर्धा श्रीमंगले, सृष्टी श्रीमंगले, यांच्या सह नाभिक समाजातील बंधु-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महेश श्रीमंगले यांनी केले तर उपस्थिताचे आभार सोलापूर शहर अध्यक्ष मोहन जमदाडे यांनी मानले.

व्यक्तिमत्त्व विकासासाठी शारिरीक, मानसिक शिस्त आवश्यक

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. ८ मे-

व्यक्तिमत्त्व विकासासाठी आपल्यातील क्षमतांचा विकास व्हायला हवा. त्यासाठी शरीराला आणि मनाला शिस्त लागणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन विवेकानंद केंद्र वेदांतिक ॲप्लिकेशन ऑफ योग अँड मॅनेजमेंटचे प्रमुख सुहास देशपांडे यांनी केले.

बुधवारी (ता. ८) विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर व जुळे सोलापूर शाखेने जुळे सोलापुरातील वि. के. वयम् मध्ये आयोजिलेल्या निवासी वासंतिक शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. देशपांडे म्हणाले, मुलामुलींच्या शारिरीक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक विकासासाठी या शिबिराचे आयोजन केले आहे.

त्यांच्यातील वेगवेगळ्या क्षमतांचा विकास व्हावा, ही अपेक्षा यामागे आहे. याप्रसंगी विवेकानंद केंद्राच्या जुळे सोलापूर शाखेचे संचालक नंदकुमार चितापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. हर्षदा स्वामी हिने शिबिर गीत गायिले. समृद्धी गवंडी हिने सूत्रसंचालन केले.

भारतमाता, मातृ-पितृ पूजन या शिबिरात शनिवारी (ता. ११) रात्री ८.१५ वाजता भारतमाता तर रविवारी (ता. १२) सकाळी १०.१५ वाजता मातृ - पितृ पूजन आयोजित केले आहे. मुलांमध्ये देशभक्ती जागवतानाच मातापित्यांविषयी प्रेम, आत्मभाव निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

१५० मुलामुलींचा सहभाग

पाचवी ते आठवीच्या मुलामुलींसाठी आयोजित हे निवासी शिबिर १२ मे पर्यंत चालणार आहे. यात १५० मुलामुलींनी सहभाग नोंदवला आहे. मुलांमधले कुतूहल, कलाकौशल्ये, साहसी वृत्ती, संवेदनशीलता या आणि अशा अनेक क्षमतांना वाव आणि त्यांच्या विकासाला दिशा देणारे हे शिबिर आहे. यात विविध सत्रांसह सूर्यनमस्कार, योगासने, हस्तकला, चित्रकला, स्लाईड शो, गटचर्चा, क्रीडायोग यांचा समावेश असल्याचे शिबिर प्रमुख विशाल बिराजदार यांनी सांगितले.

मनाची ताकद ओळखा : सुत्रावे

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सहकार महर्षी वि. गु. शिवदारे महाविद्यालयाचे प्राचार्य राजू सुत्रावे यांनी व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व विषद केले. आईवडिलांचा सन्मान राखा, असे सांगून ते म्हणाले, आपण ऊर्जेचा स्त्रोत आहात. मन, मेंदूचा सकारात्मक उपयोग करावा. शरीरापेक्षा मनाची ताकद मोठी आहे. त्याला योग्य दिशा द्या. या निवासी शिबिरातील प्रत्येक गोष्टी डोळसपणे आत्मसात करा.

‘आयएमए’ महिला डॉक्टर शाखेचा पदग्रहण सोहळा

अध्यक्षपदी कौशाली राजगुरू; सचिवपदी मुळे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.८-

इंडियन मेडिकल असोसिएशन महिला डॉक्टर धाराशिव शाखेच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. यात अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. कौशाली राजगुरू तर सचिवपदाची सुत्रे डॉ. श्रध्दा मुळे यांनी स्वीकारली.

इंडियन मेडिकल असोसिएशनची महिला डॉक्टर शाखा ही राज्य पातळीवर काम करणारी संघटना असून, या माध्यमातून डॉक्टरांसोबतच समाजासाठीही आरोग्य विषयक विविध उपक्रम राबविले जातात. विशेषत: कोविड काळात आरोग्य विषयक सेवेसोबतच नागरिकांमध्ये जनजागृती करण्यातही संघटनेचा मोठा वाटा होता. जिल्हा शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पदग्राहण सोहळा पार पडला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला, आयएमए संघटनेचे अध्यक्ष डॉ. सचिन देशमुख, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सतीश हरिदास, आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नागनाथ गंगासागरे आदींची शुभेच्छा पर भाषणे झाली.

प्रास्ताविक डॉ. कौशाली राजगुरू यांनी केले. आभार डॉ. श्रध्दा मुळे यांनी मानले.

कार्यकारिणीत यांचा समावेश

उपाध्यक्ष : डॉ. रजनी पाटील, डॉ. स्मीता गवळी, सहसिचव :डॉ. नीता चौगुले-पौळ, खजिनदार : डॉ. अश्विनी सरडे, राज्य प्रतिनिधी : डॉ. मीना जिंतूरकर, डॉ. ज्योती कानडे, कार्यकारिणी सदस्य : डॉ. वसुधा दापके-देशमुख, डॉ. रेखा टिके, डॉ. मंजुश्री राठोड-चव्हाण, डॉ. अश्विनी देशमुख.

CHANGE IN NAME

I herby declare that My old name **Gholsing Heerasing Rathod** has been changed to New name **Ghalsing Heerasing Rathod.** I am the only person with both these Names.
Adress - 42 Rajhans Nagar, Bale,
Solapur North.
Dist. Solapur 413255
(Affidavit No. 10126
Date : 08/05/2024)

Wanted

Wanted Trained Montessory Female Teacher fluent in English for "Sahara shining kids Pre school"

The candidate must be from in and around Majarewadi Solapur. Attend interview on 10/05/2024 at 10.00 am with resume and certificate.

Plot No.3 Vinayak Nagar, lokmanya nagar, Majrewadi, Solapur. Mobile 9823141743

जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ४४/२०२४ नि.नं. ०६
पुढील नेमलेली तारीख १२/०६/२०२४

बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

भास्कर दिगंबर कांबळे, वय ६१ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. राऊळ गल्ली, टाखणखार रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
अर्जदार

- विरुद्ध -

कोणी नाही **सामनेवाला**

ज्याअर्थी, अर्जदार यांचे सख्खे भाऊ कै. भारत दिगंबर कांबळे, रा. राऊळ गल्ली, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर हे दि. ०३/०२/१९९२ रोजी मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे एकमेव कायदेशीर वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, जर करिता कोणास त्या संदर्भाने हरकत, तक्रार असल्यास हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झालेपासून ३० (तीस) दिवसांचे आत अगर या कामी पुढील नेमलेली तारीख दि. १२/०६/२०२४ रोजी स्वतः अगर विधीज्ञामार्फत हजर राहून कागदोपत्री पुराव्यानिशी म्हणणे मांडावे, हरकत घ्याणी. आपण गैरहजर राहिल्यास आपले गैरहजेरीमध्ये आणि आपली कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे न्यायालयीन चौकशीचे कामकाज चालवून अर्जदाराचे विनंतीप्रमाणे अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याची कारवाई पूर्ण केली जाईल याची नोंद घ्यावी. कळावे,

हे जाहीर प्रसिद्धीकरण मे. न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले.

तारीख : ०६/०५/२०२४

सही/-
कनिष्ठ लिपीक

(कोर्टाचा
गोल शिक्का)

सही/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे सौंदरे व बार्शी परिसरातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि. सोलापूर, सब डि. व तालुका बार्शी पैकी मौजे सौंदरे हद्दीतील शेतजमीन गट नं. ३०८ क्षेत्र ०३ हे. ०३ आर + पो.ख.०० हे. ०३ आर, एकूण ०३ हे. ०६ आर, आकार ०३ रु. ७५ पैसे येणेप्रमाणे संपूर्ण गटाची स्वतंत्र विहिरीवरुन बागायत शेतजमीन, विहिरीवरील इलेक्ट्रीक कनेक्शन, कोटेशन, मोटार, लागुपुरती पाईपलाईन जमिनीमधील झाडझुडूप, दगडपाषाण वगैरे तदंगभूत वस्तू आणि वहिवाटीचे हक्कासुद्धा.

२) वर कलम १ मध्ये नमूद मिळकत नितीन नामदेव कोकाटे, रा. बार्शी यांचे स्वसंपादित खरेदी मालकी हक्काची प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी मालकी हक्कात नोंदलेली अशी आहे. नितीन नामदेव कोकाटे यांनी नमूद मिळकत त्यांचे कायदेशीर प्रापंचिक आर्थिक अडचणी निवारण करणेसाठी आणि दुसरी सोईची मिळकत खरेदी घेण्यासाठी विक्रीस काढली असून सदर मिळकत आमचे आमचे अशिल सौ. राजाबाई लक्ष्मण आंधळकर, रा. सौंदरे यांनी खरेदी घेणेचे ठरवून विसार दिलेला आहे. नमूद मिळकतीचे विद्यमान मालक नितीन नामदेव कोकाटे यांनी वर कलम १ मध्ये शेतजमीन निर्वेध, निजोखमी, बोजाविरहीत असलेबाबत आमचे अशिलास भरवसा दिलेला आहे. आमचे अशिल नमूद मिळकत कराराप्रमाणे रजि. दस्ताने कायम खूषखरेदी घेणार आहेत.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद शेतजमिनी संबंधाने नितीन नामदेव कोकाटे यांचे विद्यमान मालकी हक्काबाबत तसेच आमचे अशिलाचे हक्कातील नियोजित खरेदी व्यवहाराबाबत कोणाचेही गहाण, दान, बक्षीस, पोटगी, वाटप, अग्रहक्क, चोळी-बांगडी वगैरे कसलेही हक्काने हरकती असलेस संबंधितांनी त्यांचे लेखी हरकती कागदोपत्री पुरावेनिशी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत या नोटीसीतील पत्त्यावर पोहोच होतील अशा पद्धतीने रवाना कराव्यात. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आलेस आमचे अशिल नियोजित खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची सक्त नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली असे. तारीख : ०८/०५/२०२४

सही/-
ॲड. श्री. एस. एन. शेटे,
ऑ.- सि.स.नं. ७३०/२/३३, शिवकृपा,
सिद्धेश्वरनगर, कासारवाडी रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९९२२५८४१७८, ९४२२४६३२१२
खरेदीदार सौ. राजाबाई लक्ष्मण आंधळकर तर्फे
ॲडव्होकेट.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, डि ।। व सब डि । सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील न्यु पाच्छा पेठ, कर्णिक नगर येथील सिटी सर्व्हे नं.१०३८८ पैकी प्लॉट नं.अ-२७२ याचे क्षेत्र ७५० स्के. फुटाची घरजागा असून, यात तळमजल्यावर आर.सी.सी. स्वरुपाचे २ रुम व संडास बाथरुम व पहिल्या मजल्यावर आर.सी.सी. स्वरुपाचे १ रुम असलेली घरजागा. यांसी चतुः सिमाः पूर्वेस-प्लॉट नं.अ-२७१, दक्षिणेस-प्लॉट नं.अ-२६७, पश्चिमेस प्लॉट नं.अ-२७३ व उत्तरेस-९ मीटरचा रोड.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली घरजागा ही बी.व्ही. वागज यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरची घरजागा ही आमचे अशिल यांना विक्री करण्याचे ठरवून त्यापोटी आमचे अशिलाकडून इसारा रक्कम स्विकारली आहे. सदर वर नमूद केलेली घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री वरील नमूद मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी परंतु वर नमूद घरजागेवर अन्य कोणत्याही बँकेचे, वित्तीय संस्थेचे अथवा अन्य कोणाचेही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार, टाच, दान, लिज, साठेखत, पोटगी, कोर्ट दावा, गहाणखत, तारण वा बोजा वगैरे असल्यास त्यांनी ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी कागदोपत्री हरकत आणून द्यावी. कोणाचेही कसलेही हरकत वा तक्रार मुदतीत न आल्यास आमचे अशिल वरील मिळकतीचे पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. ०८/०५/२०२४.

सही/-
ॲड. पुजा महादेव नाईकवाडे
रा.५७६, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर
मो.नं.: ९९७०७६७३०६/९५११६५३५७७
अशिल तर्फे ॲडव्होकेट

जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील आमचे अशिलानी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ तालुका ऑफिस झोपडपट्टी, सोलापूर या नावांने ओळखले जाणा-या नगरातील झोपडी घर नं. ३३३ ही मिळकत झोपडी घरजागा आमचे अशिल कु. विजया सिद्राम शिंदे यांचे मयत आई कै. सुलोचना सिद्राम शिंदे यांचे नावांवर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागात कर आकारणीस नोंद आहे. सदर ठिकाणी त्यांचे नावे तीन खोल्या संडास बाथरुम व लाईट व नळ कनेक्शनची सुविधा आहे.

सदरच्या खोल्या आमचे अशिलांचे मयत आई कै. सुलोचना सिद्राम शिंदे यांचे नांवावर असून सदरहू खोल्या आमचे अशिलाचे कब्जे वहिवाटीत आहेत. आमचे अशिलाचे आई कै. सुलोचना सिद्राम शिंदे यांचे दि. ०३/०१/२०२४ रोजी त्यांचा मृत्यु झालेला आहे. तसेच त्यांचे वडील कै. सिद्राम कृष्ण शिंदे यांचेही दि. ०४/१०/२०१० रोजी मृत्यु झालेला आहे. या दोघांचे मृत्युपश्चात आमचे अशिल हे भोळसर स्वभावाचे व अविवाहित वयाचे ५६ व्या वर्षापर्यंत आजमितीस अविवाहित आहेत व ते आई वडिलांचे हयातीपासूनच सदरहू वर नमूद घरजागेत राहणेस असल्याने आई वडिलांनी शेवटपर्यंत तिची देखभाल केलेली आहे. याकरिता वडिलांचे मृत्युपश्चात सदरहू घरजागा आमचे अशिलाची आई कै. सुलोचना सिद्राम शिंदे यांनी सर्वाचे संमतीने सदरहू घरजागा दोघांचे संयुक्त नावावर सदरची मिळकत केलेले आहे. यापैकी आमचे अशिलांचे आई कै. सुलोचना सिद्राम शिंदे हे दिनांक ०३/०१/२०२४ रोजी मृत्यु पावल्याने सदरहू घरजागेवरील त्यांचे नांव कमी होऊन फक्त आमचे अशिल कु. विजया सिद्राम शिंदे यांच्या एकटीच्याच नांवे सदरची मिळकत घरजागा कायमस्वरूपी व्हावी याकरिता आमचे अशिलाचे अन्य सर्व वारसांनी यांस संमती दिलेली आहे.

तरी सदरहू वर नमूद झोपडी घरजागेवर आमचे अशिलाव्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर अथवा आमचे अशिलाचे वर नमूद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे एकटीच्याच नावाची वारस नोंद कायम ठेवतील व सो.म.पा. चे कर आकारणी व कर संकलन विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे एकटीच्याच नावाची वारस नोंद कायम ठेवणेकरिता व मयत आई कै. सुलोच सुलोचना सिद्राम शिंदे यांचे नांव कमी करण्याविषयी सोलापूर महानगरपालिकेकडे अर्ज दाखल करुन त्यांचे एकटीचे नांव कायम ठेवतील तद्नंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख : ०७/०५/२०२४

सही/-
ढेकणे एस.एम.
बी.ए., एलएल.बी., ॲडव्होकेट
रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

महत्त्वाचे

ऑलिम्पिकपदक ग्रॅण्ड स्लॅम इतकेच महत्त्वाचे : कोको

न्यू यॉर्क : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणे, हे माझ्यासाठी यावर्षीच्या ग्रॅण्ड स्लॅम यशाच्या बरोबरीचे असून तेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे मत अमेरिकेची २० वर्षीय टेनिसपटू कोको गॉफ म्हणाली. कोरोनाची लागण झाल्यामुळे कोको गॉफला २०२१ मधील टोकियो ऑलिम्पिकमध्ये स्पर्धा करण्याची संधी नाकारण्यात आली होती. या महिन्याच्या शेवटी सुरू होणाऱ्या फ्रेंच ओपनमध्ये दुसऱ्या ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदासाठी आपले कौशल्य पणाला लावणार आहे. त्याच ठिकाणी २७ जुलै रोजी रोलँड गॅरोस येथे टेनिस स्पर्धा सुरू होत असताना कोको गॉफ ऑलिम्पिकमध्ये पदार्पण करण्यास उत्सुक आहे. माझ्यासाठी ऑलिम्पिकला सर्वोच्च प्राधान्य आहे. मी ऑलिम्पिक पदकाला ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदाच्या बरोबरीचे म्हणेन, असे गॉफने इटालियन ओपनमध्ये पत्रकारांना सांगितले. मी ऑलिम्पिक व ग्रॅण्ड स्लॅममध्ये कोणताही फरक करणार नाही, कारण मी यापूर्वी कधीही खेळलो नाही. ही माझी पहिलीच वेळ आहे. मला नेहमीच चांगली कामगिरी करायची असते, पदक मिळवायचे असते, असे ती म्हणाली.

ऑलिम्पिक विजेता अहमद पॅरिस वारीला मुकणार

मेलबर्न : ऑलिम्पिक ४०० मीटर फ्रीस्टाईल विजेता अहमद हाफनौई पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेला मुकणार आहे, असे आफ्रिका जलतरण संघटनेने सांगितले.

ट्युनिशियाचा २१ वर्षीय अहमद २६ जुलै ते ११ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पोहणार नाही, या वृत्ताला आंतरराष्ट्रीय जलतरण महासंघानेही दुजोरा दिला आहे. अहमद हफनौईने अमेरिकेत प्रशिक्षण पुन्हा सुरू करण्यास नकार दिला होता, मात्र त्याचे कारण स्पष्ट केले नाही. ट्युनिशियन ऑलिम्पिक समिती आणि राष्ट्रीय जलतरण महासंघाने वृत्तसंस्थेला त्वरित टिप्पणी दिली नाही. हाफनौईच्या प्रतिनिधीने देखील त्वरित टिप्पणी दिली नाही. ऑरेंज काउंटीमध्ये एलिट डिस्टन्स जलतरण उपक्रम चालवणाऱ्या अमेरिकन संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक मार्क शुबर्ट यांच्या नेतृत्वाखाली हाफनौईने गेल्या वर्षी कॅलिफोर्नियामध्ये प्रशिक्षण घेतले होते. तथापि, त्याने फेब्रुवारीमध्ये दोहा येथे झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत व्हिसा समस्येचे कारण देत ट्युनिशियाला मायदेशी परतल्याचे सांगितले. २०२१ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी हाफनौईने टोकियो ऑलिम्पिकमध्ये लेन आठमधून ४०० मीटर फ्रीस्टाइल सुवर्ण जिंकून जगाला चकित केले.

दुखापतीतून सावरत ॲण्डी मरेचे पुनरागमन

जिनेव्हा : दुखापतीतून सावरल्यानंतर ब्रिटनचा स्टार टेनिसपटू ॲण्डी मरे आगामी जिनिव्हा ओपन टेनिस स्पर्धेच्या माध्यमातून टेनिस कोर्टवर परतणार आहे. या महिन्याच्या अखेरीस ३७ वर्षांचा होणारा ॲण्डी मरे मार्चमध्ये मियामी ओपनमध्ये झेक प्रजासत्ताकच्या टॉमस मॅचॅककडून पराभूत होत असताना अंतिम सेटमध्ये त्याचा पाय मुरगळला. त्यामुळे गत महिन्यात त्याने मॉण्टे कार्लो मास्टर्स व म्युनिक ओपनमधून माघार घेतली. ॲण्डी मरे या महिन्यात जिनिव्हा ओपनमध्ये पुनरागमन करेल. माजी जागतिक क्रमवारीत अव्वल खेळाडू मरेला फ्रेंच ओपन ट्यून-अप स्पर्धेच्या आयोजकांनी वाइल्डकार्ड दिले. तीन वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता मरेने २०१९ मध्ये शस्त्रक्रिया केली होती. मी या उन्हाळ्यात जास्त खेळण्याची योजना आखली नाही, परंतु दुसऱ्या ऑलिम्पिकमध्ये भाग घेण्याची आशा आहे, असे तो म्हणाला होता.

बायर्न म्युनिकनविरुद्ध रिअल माद्रिद जिंकणार?

म्युनिक : युईएफए चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेत उपांत्य फेरीतील पहिल्या चरणाचा सामना २-२ गोलने बरोबरीत राहिल्यानंतर आता रिअल माद्रिद आणि बायर्न म्युनिक यांच्यादरम्यान दुसऱ्या चरणाचा सामना खेळला जाणार आहे. या दुसऱ्या चरणाच्या सामन्यात आम्ही गोल करण्याची कोणतीही संधी सोडणार नाही. थिबॉट कोर्टोइस गत आठवड्यातच दुखापतीतून परतला असून ॲण्ड्री लुनिनला गोलरक्षक म्हणून ठेवले आहे, असे रिअल माद्रिदचे प्रशिक्षक कार्लो ॲन्सेलोटी म्हणाले. अलिकडेच रिअल माद्रिदने कॅडिझवर ३-० ने विजय मिळवून स्पॅनिश लीगचे विजेतेपद पटकावलेले आहे. या विजयामुळे आमच्या संघाचा आत्मविश्वास वाढला आहे.

बंगळुरूची अस्तित्वासाठी पंजाबविरुद्ध लढत

◆ **धर्मशाला, ८ मे**

सतराव्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामात गुरुवारी पुनरुत्थान होणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ आणि पंजाब किंग्ज यांच्यादरम्यान अस्तित्वाची लढाई होणार आहे. या दोन्ही संघांची स्थिती समान असून दोघांनाही सलग चौथ्या विजयाची अपेक्षा असेल.

हंगामाची निराशाजनक सुरुवात केल्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला स्पर्धेत पुनरागमन करण्यात यश आले आहे. आरसीबीने गत तीन सामने जिंकून जोरदार मुसंडी मारली. या विजयामुळे आरसीबीचे ढासळणारे मनोबल वाढलेच, पण गुणतालिकेत सातव्या स्थानावरही पोहोचले.

आरसीबी ११ सामन्यांतून आठ गुणांसह सातव्या क्रमांकावर आहे. आता आरसीबीने आपले उर्वरित तीन सामने जिंकले तर ते प्लेऑफमध्ये प्रवेश करू शकतात.

पंजाब किंग्जचीही अशीच स्थिती आहे. त्यांनी ११ सामन्यांतून आठ गुण जमा करून आठवे स्थान मिळविले आहे. तथापि, या दोन्ही संघांपैकी केवळ एक संघ सर्वात महत्त्वाच्या १४ गुणांचा टप्पा गाठू शकतो.

हंगामाच्या सुरुवातीला पंजाब किंग्जला पराभूत केल्यामुळे आणि अलिकडच्या तीन विजयांमुळे बंगळुरू संघ पंजाब किंग्जपेक्षा अधिक आत्मविश्वासाने भरलेला असेल.

विराट कोहली अव्वल स्थानावर सातत्य राखून आहे, तर कर्णधार फाफ डु प्लेसिसने गत सामन्यात आक्रमक खेळी करत आपल्या वाईट धावसंख्येची परंपरा मोडीत काढली.

विल जॅक्सने गुजरात टायटन्सविरुद्ध विजयी शतकी खेळछी करून सर्वांना प्रभावित केले. कॅमेरून ग्रीनने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध धावा व बळी टिपण्यात महत्त्वपूर्ण योगदान देऊन आपल्या अष्टपैलू कौशल्याची चमक दाखवली. भारतीय टी-२० विश्वचषक संघात असलेल्या मोहम्मद सिराजला अखेर सूर गवसला व तो लक्षवेधक कामगिरी करत आहे. यश दयाल व विजयकुमार विशकने गुजरातविरुद्ध चांगली कामगिरी केली आणि आता आरसीबीला त्यांच्याकडून अशाच कामगिरीची अपेक्षा आहे.

दुसरीकडे, पंजाब किंग्जची फलंदाजी सीएसकेविरुद्ध कोसळल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी असेल.या सामन्यात पंजाब किंग्जने सर्वात वाईट प्रदर्शन केले. पंजाबचे गोलंदाज सीएसकेच्या सर्व फलंदाजांवर भारी पडले, परंतु फलंदाजी विभागाची पुरती दमछाक झाली.

पंजाबने कोलकाता नाईट रायडर्सवर अवे विजय मिळवून आपली क्षमता दाखवली आहे, मात्र, त्यांना आपले घरचे मुख्य मैदान असलेल्या मुल्लानपूरमध्ये त्यांना पाच पैकी केवळ एक सामना जिंकता आला.आता पंजाबच्या गोलंदाज व फलंदाजांना एकजुटीने खेळावे लागणार आहे. (वृत्तसंस्था)

आजचा सामना

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. पंजाब किंग्ज
स्थळ : हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटना स्टेडियम, धर्मशाळा
वेळ : सायंकाळी ७.३० वाजतापासून
थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर

पॅरिस ऑलिम्पिक क्रीडा ज्योतच्या स्वागतासाठी मार्सिले शहर सज्ज

◆ **मार्सिले, ८ मे**

फ्रान्सच्या दक्षिणेकडील मार्सिले शहरात पॅरिस ऑलिम्पिक क्रीडा ज्योतचे आगमन होणार असून बुधवारी सूर्यास्ताच्या वेळी या पॅरिस ऑलिम्पिक क्रीडा ज्योतच्या स्वागतासाठी जोरदार तयारी करण्यात आली आहे. ग्रीसहून हे जहाज प्रवास करून आल्यानंतर मार्सेलेच्या जुन्या बंदरात कडक सुरक्षा व्यवस्थेखाली ठेवण्यात आला.

फ्रान्सला अधिकृतपणे क्रीडा ज्योत सुपूर्द करण्यापूर्वी गत महिन्यात ग्रीसमध्ये मशाल पेटवण्यात आली होती. गत बारादिवसापासून प्रवास करत ऑलिम्पिक क्रीडा ज्योत मार्सेलीमध्ये दाखल झाली.

क्रीडा ज्योतच्या स्वागतासाठी मार्सेलेच्या उपसागराच्या जवळपास बेलेमच्या परेडमध्ये हजाराहून अधिक बोटी असतील. या बोटीवर सुंदर चित्रे काढण्यात आली. एका बोटीवर ॲथ्लेटिक्स ट्रॅकसारखे दिसणारे चित्र रंगविण्यात आले आहे.

पॅरिस ऑलिम्पिक क्रीडाज्योतचे स्वागत करण्यासाठी मार्सेलेमध्ये जोरदार तयारी

स्वागत समारंभात फ्रेंच हवाई दलाच्या क्रोबॅटिक टीट्र मार्सिलेमध्ये उत्साह निर्माण सहकारी करीत होते.

आमच्या देशात ऑलिम्पिक खेळांचे पुनरागमन हा एक विलक्षण उत्सव असेल, असे पॅरिस २०२४ ऑलिम्पिक आयोजन समितीचे अध्यक्ष टोनी एस्टँग्युएट म्हणाले.

२०००, २००४ आणि २०१२ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा व माजी ऑलिम्पिक कॅनोईंग स्टार एस्टँग्युएट मशाल हाती घेऊन धावत आहे. बंदरात सुमारे ८,००० पोलिस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. या सोहळ्यासाठी हजारो प्रेक्षक जमतील अशी अपेक्षा आहे.

शहराभोवती हजारो अग्निशमन दल आणि बॉम्ब निकामी पथके तैनात करण्यात आली आहेत, तसेच सागरी पोलिस आणि ड्रोनविरोधी पथके शहराच्या पाण्यात आणि हवाई क्षेत्रात गस्त घालत आहेत.

हा एक महत्त्वाचा दिवस आहे आणि या ऐतिहासिक क्षणाचा आनंद घेण्यासाठी आम्ही कठोर परिश्रम घेत आहोत, असे मार्सेले शहराचे उपमहापौर यानिक ओहानेसियन म्हणाले. (वृत्तसंस्था)

आशियाई टेनिस स्पर्धांमध्ये सर्वोत्तम खेळाडूंची गरज

एटीएफचे अध्यक्ष युरी पोल्स्की यांचे मत

◆ **नवी दिल्ली, ८ मे**

आशियाई स्पर्धांमध्ये सर्वोत्कृष्ट आशियाई खेळाडूंचा सहभाग आवश्यक आहे, कारण ते खेळाडू बरेचदा युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिकेत जातात आणि याचा अर्थ स्थानिक आशियाई खेळाडूंना स्पर्धा करण्याची संधी नसते, असे मत आशियाई टेनिस महासंघाचे नवनियुक्त अध्यक्ष युरी पोल्स्की यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना व्यक्त केले.

३६ वर्षीय पोल्स्की यांनी आपल्या मूळ देश कझाकस्तानमधील टेनिस सुधारणांच्या पृष्ठभूमीवर गत वर्षी डिसेंबरमध्ये आशियाई टेनिस महासंघाच्या (एटीएफ) अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय मिळवला. टेनिस खेळ लोकप्रिय करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या देशांना मदत करण्यासाठी व त्यांच्या समस्यांचे निवारण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आपल्या कार्यकाळात आशियाई टेनिसचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार असलेले, एटीएफचे सर्वात तरुण अध्यक्ष युरी पोल्स्की यांनी परदेश दौऱ्यापूर्वी प्रदेशातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंना आशियाई स्पर्धांमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहित केले आहे.

नेपाळ, बांगलादेश, म्यानमार आणि सीरिया यांसारख्या लहान टेनिस खेळणाऱ्या देशांमध्ये हा खेळ विकसित करणे, हे त्यांचे ध्येय आहे.

आशियातील मजबूत खेळाडूंना आपल्या आशियातील स्पर्धा करणे आवश्यक आहे, त्यामुळे खेळाडूंना स्पर्धात्मक अनुभव व नवीन शिकण्यास मदत होईल. १४ वर्षांखालील गटाच्या खेळाडूंसाठी भरीव आर्थिक मदतीसह एक मजबूत आशियाई दौरा आणि कार्यक्रम ही काळाची गरज आहे, असेही ते म्हणाले.

एटीएफ त्यांच्याशी स्पर्धा करण्याऐवजी एटीपीच्या बरोबरीने काम करेल आणि जवळपासच्या अनेक स्पर्धांसह एक व्यवहार्य आशियाई दौरा तयार करेल ज्यामुळे या प्रदेशातील खेळाडूंचा प्रवास खर्च कमी होईल, असेही ते म्हणाले.

आशियामध्ये जगातील अव्वल १०० मध्ये केवळ सहा खेळाडू आहेत, याबद्दल आपल्याला काळजी वाटते, असेही ते म्हणाले.

जपान, कोरिया, चीन, तैवान, भारत, थायलंड आणि कझाकस्तान यांसारख्या पूर्वेकडील देशांमध्ये आशिया खूप मजबूत आहे, परंतु खंडाला अधिक टेनिस खेळणाऱ्या राष्ट्रांची आवश्यकता आहे, असेही ते म्हणाले.

अलिकडच्या वर्षांत उझबेकिस्तान, इराणचाही टेनिसचा मोठा इतिहास आहे आणि मला असे वाटते की इराक, सीरिया, नेपाळ, म्यानमार, तिमोर-लेस्टे आणि इतर यांसारखी छोटी राष्ट्रे देखील संधीस पात्र आहेत आणि त्यांची संख्या मोठी आहे, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

अमन सेहरावत, दीपक पुनियाकडून उत्तम कामगिरीची आशा

इस्तंबूलमध्ये अखेरची ऑलिम्पिक पात्रता कुस्ती स्पर्धा

◆ **इस्तंबूल, ८ मे**

पॅरिस ऑलिम्पिकसाठी येथे गुरुवारपासून सुरू होणाऱ्या जागतिक पात्रता फेरीत पुरुषांच्या फ्रीस्टाइल प्रकारात भारताच्या प्रतिभावान अमन सेहरावत आणि अनुभवी दीपक पुनिया यांच्याकडून उत्तम कामगिरीची आशा आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळविण्यासाठी ही शेवटची स्पर्धा आहे.

२३ वर्षांखालील विश्वविजेता अमन एकतर जागतिक अजिंक्यपद किंवा बिश्केक येथील आशियाड पात्रता स्पर्धेत पात्र ठरेल अशी आशा होती, पण दोन्ही संधी वाया गेल्या.

अमन सेहरावत

दीपक पुनिया

बिश्केकमध्ये निर्णायक लढतीत अमनने (५७ किलो) गुलोमजोन अब्दुल्लाएवला मजबूत टक्कर दिली, तर विश्व रौप्यपदक विजेता दीपक (८६ किलो) व सुजीत कलकल (६५ किलो) हे दोघेही दुबईत अडकल्यामुळे वेळेवर बिश्केकला पोहोचू शकले नाहीत.

आता इस्तंबूल येथील सर्व भारतीय कुस्तीपटूंसाठी करा किंवा मरा अशी परिस्थिती आहे. प्रत्येक श्रेणीतील दोन अंतिम स्पर्धकांना पॅरिस ऑलिम्पिकमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. दोन कांस्यपदक विजेत्यांमधील लढतीत विजेते ठरणाऱ्या कुस्तीपटूंना तिसरा कोटा दिला जाईल.

या स्पर्धेची सुरुवात ग्रीको रोमन शैलीने होईल आणि त्यानंतर चार दिवसीय पात्रता स्पर्धेच्या शेवटच्या दोन दिवशी महिला आणि फ्री स्टाईल होईल. आतापर्यंत, भारताला चार कोटा मिळाले आहे. (वृत्तसंस्था)

किक बॉक्सिंगच्या सात खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर निवड

◆ **मेहकर, ८ मे**

बुलढाणा जिल्ह्याच्या किक बॉक्सिंग संघाच्या सात खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर निवड करण्यात आली आहे.

अहमदनगर येथे पार पडलेल्या या स्पर्धेत २२ जिल्ह्यांतून एकूण २४०० मुलांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड करण्यात येणार होती. बुलढाणा जिल्ह्याचा किक बॉक्सिंग संघ या स्पर्धेमध्ये यशस्वी ठरला असून, यामध्ये सात खेळाडूंची निवड राष्ट्रीय पातळीसाठी करण्यात आली आहे.

राष्ट्रीय किक बॉक्सिंगसाठी निवड झालेले खेळाडू आणि मार्गदर्शक

अरमान मोहम्मद परसुवाले, हर्षल सुनील नागरे, गजानन दत्ता उमाळे, धीरज राजेश्वर इंगळे, पृथ्वीराज प्रदीप बुंदे, जुबेर महेबूब परसुवाले या मुलांची निवड झाली. क्रीडा शिक्षिका आरती कैलास चव्हाण व शिक्षक कैलास अशोक चव्हाण तसेच अभिषेक सुनील ढोरे यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. (तभा वृत्तसेवा)

सात्त्विक-चिरागकडे नेतृत्व, सिंधू, लक्ष्य सेनची माघार

◆ **नवी दिल्ली, ८ मे**

पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेनने बीडब्ल्यूएफ जागतिक टूर स्पर्धेचे वेळपत्रक जाहीर झाल्यामुळे आगामी १४ ते १९ मे दरम्यान नियोजित थायलंड ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेतून माघार घेतली आहे. सिंधूने यापूर्वी उबेर चषक स्पर्धेत भाग न घेण्याचा निर्णय घेतला होता. ती जुलै-ऑगस्ट २०२४ पॅरिस ऑलिम्पिकसाठी तयार होण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अनुपस्थितीची रजा घेत आहे.थायलंड ओपन टेनिस स्पर्धेत सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी ही जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकाची पुरुष दुहेरी जोडी भारतीय संघाचे नेतृत्व करणार असून ही जागतिक क्रमवारीत ७१ व्या क्रमांकावर असलेल्या मलेशियाच्या नूर मोहम्मद अझरिन अयुब आणि ता वी किओंग या जोडीविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करतील.

विमलराज अन्नादुराई आणि मौर्यन काथिरावन हे पुरुष दुहेरीतील अन्य जोडी पात्रता फेरीत खेळणार आहेत. पुरुष एकेरीत एच. एस. प्रणॉय, किरण जॉर्ज आणि सतीश कुमार करुणाकरन हे भारताचे प्रतिनिधित्व करतील. जागतिक नवव्या क्रमांकावर असलेला प्रणॉय पात्रताधारीविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. (वृत्तसंस्था)

हैदराबादचा लखनऊवर १० गडी दणदणीत विजय

ट्रॅव्हीस हेड (८९) व अभिषेकशर्माची (७५) नाबाद अर्धशतकी खेळी

वृत्तसंस्था,
हैदराबाद, दि. ८ मे-

आयपीएल २०२४च्या ५७ व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने लखनऊ सुपर जायंट्सवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. या विजयासह हैदराबाद १४ गुणासह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे तर लखनऊ सहाव्या स्थानावर घसरला आहे.

हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर विजयी १६६ धावांचे लक्ष्य हैदराबादने ९.४ षटकांत एकही गडी न गमावता गाठले. ट्रॅव्हिस हेडने ३० चेंडूत नाबाद ८९ धावा तर अभिषेक शर्माने २८ चेंडूत नाबाद ७५ धावा केल्या. दोघांनी १६६ धावांची शतकी भागीदारी केली. दोघांनी मिळून १६ चौकार आणि १४ षटकार लगावले. लखनऊच्या गोलंदाजांना एकही विकेट घेता आली नाही.

तत्पूर्वी लखनऊने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ४ बाद १६५ धावा केल्या. त्यांच्या आयुष बडोनीने नाबाद ५५ आणि निकोलस पुरनने नाबाद ४८ धावा केल्या. दोघांनी ९९ धावांची भागीदारी झाली. कर्णधार केएल राहुलने २९ धावा केल्या. भुवनेश्वर कुमारने अवघ्या १२ धावांत २ बळी घेतले. कर्णधार पॅट कमिन्सला एक गडी बाद केला. त्याने कृणाल पंड्याला धावबादही केले.

नीरज चोप्रा ३ वर्षांनंतर फेडरेशन चषकात परतणार

◆ **नवी दिल्ली, ८ मे**

ऑलिम्पिक आणि जागतिक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने आगामी १२ ते १५ मे दरम्यान भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय फेडरेशन चषक ॲथ्लेटिक्स स्पर्धेत आपला प्रवेश निश्चित केला असून गत तीन वर्षांत तो प्रथमच मायदेशात स्पर्धा करणार आहे.

२६ वर्षीय सुपरस्टार नीरज चोप्रा १० मे रोजी प्रतिष्ठित डायमंड लीग मालिकेच्या पहिल्या टप्प्यात आपला हंगाम सुरू केल्यानंतर तो दोहाहून भारतात येण्याची अपेक्षा आहे.

नीरज चोप्रा व किशोर कुमार जेना आगामी १२ मे पासून भुवनेश्वर येथे सुरू होणाऱ्या देशांतर्गत स्पर्धेत भाग घेणार आहेत, असे भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाने ट्विट केले.

चोप्राचे प्रशिक्षक क्लॉस बारटोनिट्झ यांनीही पीटीआयला पुष्टी दिली की त्यांचा प्रभाग भुवनेश्वर स्पर्धेत भाग घेत आहे.

चोप्राने सुवर्णपदक जिंकलेल्या हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा २८ वर्षीय किशोर जेना १० मे रोजी दोहा डायमंड लीगमध्येही भाग घेणार आहे.

चोप्राने १७ मार्च २०२१ रोजी त्याच स्पर्धेत अखेरच्या देशांतर्गत स्पर्धेत भाग घेतला होता, जेव्हा त्याने ८७.८० मीटर फेकून सुवर्ण जिंकले होते. तेव्हापासून, चोप्राने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक सुवर्ण जिंकले, २०२२ मध्ये डायमंड लीग विजेता झाला, २०२३ मध्ये विश्वविजेता झाला आणि चीनमध्ये आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णलपदक जिंकले. त्याने डायमंड लीगचे तीन वैयक्तिक पदकही जिंकले आणि २०२२ च्या विश्व स्पर्धेतील रौप्यपदक जिंकले.

मात्र, त्याला अद्याप ९० मीटरचा टप्पा गाठता आलेला नाही. त्याचा वैयक्तिक सर्वोत्तम आणि राष्ट्रीय विक्रम ८ ९.९४ मी. असा आहे. (वृत्तसंस्था)

२०२७ महिला विश्वचषकासाठी ब्राझील प्रबळ दावेदार : फिफा

◆ **लॉसेन, ८ मे**

२०२७ सालच्या महिला फुटबॉल विश्वचषक स्पर्धा आयोजित करण्यासाठी ब्राझीलने जर्मनी, नेदरलॅण्ड व बेल्जियमने सादर केलेल्या बोलीपेक्षा जास्त बोली लावली, असे फिफा या जागतिक फुटबॉल महासंघाने मंगळवारी जारी केलेल्या मूल्यांकन अहवालात म्हटले आहे.

फिफा काँग्रेस १७ मे रोजी बँकॉक येथे होणाऱ्या बैठकीत २०२७ च्या यजमानपदासाठी मतदान करणार आहे. स्पर्धेचे यजमान निवडण्यासाठी फुटबॉलच्या २११-राष्ट्रीय प्रशासकीय मंडळाचे सदस्य फेडरेशन्स पहिल्यांदाच खुले मतदान घेतील.

फिफाने २०३० आणि २०३४ मधील पुरुषांच्या विश्वचषक स्पर्धेचे पसंतीचे यजमान मिळविण्यासाठी ऑक्टोबरमध्ये फुटबॉलच्या अनेक महाद्वीपीय प्रशासकीय संस्थांशी करार केल्यामुळे २०२७ च्या स्पर्धेचे यजमानपद जिंकण्यास ब्राझील अनुकूल आहे.

दक्षिण अमेरिकन फुटबॉल महासंघाने २०३० साठी केवळ तीन सामने घेण्यास सहमती दर्शविली - अर्जेंटिना, पॅराग्वे आणि उरुग्वेमध्ये प्रत्येकी एक १०४-खेळांच्या स्पर्धेसाठी जे मुख्यतः स्पेन, पोर्तुगाल आणि मोरोक्को येथे आयोजित केले जातील.

फिफाच्या इन-हाऊस पॅनेलद्वारे तांत्रिक मूल्यमापनाच्या आधारे, ब्राझीलच्या बोलीला ५ पैकी ४.० सरासरी गुण देण्यात आले, तर संयुक्तत युरोपियन बोलीला ३.७ गुण मिळाले.

२०२३ ची महिला विश्वचषक स्पर्धा ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आयोजित करण्यात आली होती आणि ही स्पर्धा दोन राष्ट्रांनी पहिल्यांदाच आयोजित केली होती. (वृत्तसंस्था)

संक्षिप्त वृत्त

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक शामसुंदर देविदास भागवत यांनी अकलूज येथे सदाशिवराव माने विद्यालयाच्या मतदान केंद्रावर आपल्या कुटुंबासह मतदानाचा हक्क बजाविला.

जेऊर बसस्थानकात एसटी महिला प्रवाशाचे चार लाखांची दागिने लंपास; गुन्हा दाखल

सोलापूर, दि. ८ मे-

बसमध्ये चढणाऱ्या एका प्रवासी महिलेच्या पर्समधील आठ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना करमाळा तालुक्यातील जेऊर बस स्टँडवर मंगळवार मतदानाच्या दिवशी दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान या प्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गीतांजली संतोष राठोड (वय ५३, रा. भवानी पेठ, करमाळा) यांनी फिर्यादा दाखल केली आहे. यातील फिर्यादी या मंगळवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास जेऊर बस स्टँडवर एसटीमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील सोन्याचे ४ तोळ्याचे गंठण व ४ तोळ्याच्या बांगड्या मिळून एकूण चार लाख रुपये किंमतीचे दागिने फिर्यादीच्या नकळत लंपास केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार शेख हे पुढील तपास करीत आहेत.

कार कठड्याला धडकून अपघात; पाचजण जागीच ठार, सोलापूरचे दोघे गंभीर जखमी

मोहोळ, दि. ८ मे-

पंढरपुरहून मोहोळच्या दिशेने येताना कारवरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या सिमेंट कठड्यावर धडक दिल्याने पाचजण ठार तर सातजण जखमी झाले. हा अपघात पोखरापूर (ता. मोहोळ) जवळ मंगळवारी पहाटे अडीचच्या सुमारास घडला. याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार कार (क्र. एम. एच.१३/ई. सी. २८१९) चे चालक अनिकेत अंकुश जाधव (रा. कोर्टी) हे त्यांची कार मोहोळच्या दिशेने घेऊन येत असताना पोखरापूर या गावाजवळ हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणाने, भरधाव वेगात चालविल्याने गाडीवरील ताबा सुटल्याने रोडकडेच्या सिमेंट कठड्याला धडक दिली. यात कारमधील सोमनाथ शिवाजी डवरी (वय ४०), रेणुका सुरेश कासार (वय ४५), नवनाथ अनिकेत जाधव (वय ७) हे गंभीर जखमी होऊन ते उपचारापूर्वीच मयत झाले तर सीता दिलीप कोष्टी (वय ५५), दिलीप हरीनाथ कोष्टी (वय ६०) हे दोघे सोलापुरात उपचार सुरू असताना मृत्यूमुखी पडले तर श्रावणी सुरेश डवरी (वय १६) महेश दिलीप कोष्टी (वय २४), निकिता महेश कोष्टी (वय १९), आकाश सुरेश जोगी (वय २१, रा. वडाळा), अश्विनी अनिकेत जाधव (वय २५, रा. कोर्टी) हे गंभीर जखमी झाले. ही घटना पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास पोखरापूर जवळ घडली. याबाबत कारचालक अनिकेत अंकुश जाधव (रा. कोर्टी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास मोहोळ पोलिस करीत आहेत.

जागर नाट्यकलेच्या नाट्य संगीतपद गायन स्पर्धेत सार्थक बावीकर प्रथम

सोलापूर, दि. ८ मे-

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई व सांस्कृतिक विभाग महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे १०० व्या नाट्य संमेलनानिमित्ताने घेण्यात आलेल्या जागर नाट्यकलेचा या स्पर्धेतील नाट्यसंगीत पद गायन या स्पर्धेत श्री वेणुगोपाल संगीत विद्यालयाचा विद्यार्थी सार्थक बावीकर प्रथम आला. महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर झालेल्या प्राथमिक फेरीतून निवड झालेले २१ स्पर्धक या अंतिम फेरीत सहभागी झाले होते. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ गायक व नाट्य कलाकार मधूवंती दांडेकर, शुभदा दादरकर व ज्ञानेश पेंढारकर यांनी केले. यावेळी चि सार्थक यास रु २५ हजार रुपयांचा धनादेश, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह परिक्षकांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नाट्यकलाकार विजय गोखले, सविता मालपेकर तसेच नाट्य परिषदेचे अजित भुरे, सतिश लोटके व स्पर्धा प्रमुख श्री बांदिवडेकर हे उपस्थित होते. या स्पर्धेसाठी सार्थक यास शर्वरी कुलकर्णी व झंकार कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

कुसमोडच्या ११० वर्षीय रामचंद्र मदने-पाटील यांनी बजावला मतदानाचा हक्क

पिलीव, दि. ८ मे-

माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक ७ मे रोजी झाली. या निवडणुकीत तरुण थोर, म्हाताऱ्यांनी मतदानाचा पवित्र हक्क बजाविला. यामध्ये माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील रामचंद्रनाना मदने-पाटील (वय ११०) यांनी मतदान केंद्रावर येऊन आपल्या मतदानाचा हक्क बजाविला. लोकशाहीच्या या उस्तवात तरुण मंडळी मतदानाचा हक्क बजावितात. पण ११० वर्ष वयाच्या आजोंबानी आपल्या वयाचा विचार न करता आपल्या मतदानाचा हक्क बजाविला. हा तरुण पिढीसाठी त्यांनी एक आदर्शच घालून दिला आहे. त्यांनी आतापर्यंत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, सोसायटी अशा सर्वच निवडणुकीत न चुकता आपल्या मतदानाचा हक्क बजाविला आहे. सगळ्याच निवडणुकीत ते हिरीरीने भाग घेतात. कसल्याही प्रलोभनाला बळी न पडता ते मतदान करतात. महत्त्वाची बाब म्हणजे कोणाचाही आधार न घेता त्यांनी स्वतःच मतदानाचा पवित्र हक्क बजाविला.



पंढरीतील इंदिरा गांधी भाजी मंडईची दुरवस्था

पावसाळ्याच्या तोंडावर पालिकेकडून दुरुस्तीची गरज; देखभाल करुन मंडई सुस्थितीत करण्याची व्यापारी, ग्राहकांतून मागणी

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. ८ मे-

शहरातील मध्यवर्ती असलेल्या इंदिरा गांधी भाजी मंडईची सध्या दूरवस्था झाली आहे. त्यामुळे या मंडईची दुरुस्ती आणि देखभालीची गरज असून पालिकेने तत्काळ याकडे लक्ष देऊन पावासाळा सुरु होण्याअगोदर संबंधित काम हाती घ्यावे अशी मागणी मंडईतील भाजी विक्रेते आणि शहरातील सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.



पंढरपुरात गावभागात असलेली सर्वात जुनी भाजी मंडई म्हणजे इंदिरा गांधी भाजीमंडई. शहरातील मध्यवर्ती आणि सर्वांनाच सोयीची मंडई म्हणूनदेखील इंदिरा गांधी भाजी मंडईची ओळख आहे. एरव्ही तसेच यात्रांच्या काळात या भाजी मंडईत शहरातील नागरिकांबरोबरच वारकऱ्यांचीदेखील मोठी गर्दी असते. या भाजी मंडईमध्ये भाजीपाल्याबरोबरच किराणा माल, दूध, दही आदींचीदेखील किरकोळ स्वरुपात विक्री केली जाते. त्यामुळे गावभागातील सर्वसामान्य नागरिकांना भाजीपाल्याबरोबरच दैनंदिन किराणा सामान तसेच दूध, दही आणि लोणी आदी पदार्थांची एकत्रितरित्या इथे खरेदीची सुविधादेखील उपलब्ध होते. त्यामुळे गावभागातील नागरिकांची या मंडईमध्ये वर्दळ असते.

मध्यंतरी ही मंडई पाडून या ठिकाणी दोन, तीन मजली नवीन भाजी मंडई बांधून त्या ठिकाणी भाजी मंडई आणि दुचाकी, चारचाकी गाड्यांच्या पार्किंगचादेखील घाट घालण्यात आलेला होता. मात्र मंडईतील कायमस्वरुपी व्यापाऱ्यांचा तसेच भाजीपाला विक्रेत्यांचा कमालीचा विरोध झाल्याने पालिकेने हा विषय बाजूला ठेवला. दरम्यान अतिशय जुन्या असलेल्या या मंडईची सध्या अतिशय दूरवस्था झालेली आहे. या मंडईवर टाकण्यात आलेले पत्रे खूपच जुने झाल्यामुळे पावसाळ्यात अनेक ठिकाणी पत्र्यांमधून अक्षरशः मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होताना दिसते. मंडईतील भाजी विक्रेत्यांसाठी असलेल्या दगडी कट्ट्यांचीदेखील अनेक ठिकाणी पडझड झालेली आहे. या मंडईतील पावसाचे किंवा मंडई धुतल्यानंतर साठलेल्या पाण्याचा निचरा होण्याची सिस्टीम किंवा अंतर्गत असलेल्या गटारी बुजल्या गेल्यामुळे या ठिकाणी थोडे जरी पाणी आले तरी ते मंडईत साठून राहते. त्याचा योग्य निचरा होत नाही. त्यामुळे सगळीकडे दलदल होऊन निसरडे होते.

याबरोबरच मंडईमध्ये फ्लोरिंगच्या ठिकाणी असलेले घडीव दगडदेखील अनेक भागात निघालेले दिसत आहेत. त्यामुळे मंडईतून चालताना लहान मुले, वृद्धांना अडचणीचे होत आहे. मंडईचे लोखंडी पत्र्यांचे छत ज्या मोठ्याला लोखंडी गर्डरवर पेललेले आहे ते मोठाले लोखंडी गर्डरदेखील पावासामुळे गंजू लागलेले आहेत. त्यामुळे या गर्डरलादेखील गंज लागणार नाही अशा प्रकारे ऑईलपेंट देण्याची गरज आहे. पावसाळ्यात गर्डरला तसेच लोखंडी गळणाऱ्या पत्र्यांना सततच्या पावासाच्या पाण्यामुळे इजा पोहचून एखादी दुर्घटना घडणार नाही याबाबत पालिकेकडून सतर्कता बाळगली जावी. त्यामुळे पावसाळा तोंडावर आलेला आहे. त्यापूर्वीच पालिकेच्या वतीने या मंडईची देखभाल आणि दुरुस्तीची कामे हाती घेऊन गावभागातील नागरिकांसाठी मध्यवर्ती जुनी असलेली ही मंडई सुस्थितीत करुन द्यावी अशी मागणी नागरिकांमधून तसेच भाजी विक्रेत्यांकडून केली जात आहे.

स्वच्छतेबाबत पालिकेकडून कमालीची उदासिनता

या मंडईची पालिकेकडून पूर्वीप्रमाणे नियमीत स्वच्छतादेखील केली जात नाही. पूर्वी दर एक, दोन महिन्याला ही मंडई फिनेल टाकून पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांकडून स्वच्छ धुवून घेतली जात असे. मंडई धुण्यासाठी खास पाण्याच्या वॉल्व्हचीदेखील या मंडईत सुविधा होती. मात्र सध्या हा पाण्यासाठीचा असणारा व्हॉल्वदेखील कुठे दिसेनासा झाला आहे. येथील छोट्या, मोठ्या यात्रा तसेच महिन्याच्या एकादशी झाल्यानंतर तर पालिकेकडून मंडई स्वच्छतेचा कार्यक्रम नियमितपणे केला जात असे. मात्र पालिकेकडून या मंडईच्या स्वच्छतेबाबत सध्या कमालीची उदासीनता दिसून येत असल्याचे परिसरातील नागरिकामधून बोलले जात आहे.



जेऊर येथे शुक्रवारी सामुदायिक विवाह सोहळा

१९ जोडपी होणार विवाहबद्ध ; श्री काशीलिंग बहुऊद्देशिय संस्थेच्यावतीने आयोजन

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. ८ मे-

जेऊर (ता. अक्कलकोट) येथे श्री काशीलिंग बहुऊद्देशिय संस्थेच्या वतीने शुक्रवार, दि. १० मे रोजी सायंकाळी ६.४५ वाजता अक्कलकोट रोडवरील श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन, जेऊर येथे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला आहे. यावेळी १९ जोडपी विवाहबद्ध होणार असल्याची माहिती संस्थाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी दिली.

यावेळी खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, शिवानंद शिवयोगी महास्वामी, बसवलिंग महास्वामी, शिवयोगी शिवाचार्य महास्वामी, नीलकंठ शिवाचार्य महास्वामी, श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, राजशेखर शिवाचार्य महास्वामी,

मळेंद्र महास्वामी, शांतलिंग शिवाचार्य महास्वामी, अभिनव शिवलिंग महास्वामी, शांतलिंग शिवाचार्य महास्वामी, प्रभूशांत महास्वामी, महानंदाताई मुगळी, सोमलिंग घुळी महाराज, सद्गुरू पांडुरंग महाराज, वीर शिवालिंगेश्वर महास्वामी, रऊफ पिरजादे बाबा आदी उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण भागात सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे आर्थिक अडचण तसेच वाढत चाललेली प्रचंड महागाई यामुळे नागरिकांना आपल्या मुला-मुलींची लग्ने लावणे आणि त्याची जबाबदारी हे खूपच खर्चिक आणि न झेपणारे ठरत आहे. यामुळे श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व बहुऊद्देशिय संस्थेच्या वतीने जेऊरला कोरोनाकाळ वगळता सलग १० व्या वर्षी सामुदायिक विवाह सोहळा घेण्यात येत आहे. या संस्थेत एकूण २०० मित्रपरिवार सदस्य एकत्र येऊन तन, मन, धनाने योगदान देत आहेत. आतापर्यंत १३५ जोडपे विवाहबद्ध झाले आहेत. या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. दरवर्षी साधारण ५० हजार वऱ्हाडी उपस्थित राहत असतात. प्रामुख्याने वधू-वरांना पोशाख, मणी-मंगळसूत्र, वऱ्हाडी मंडळींना, गावातील मुख्य रस्त्यावरून वधू-वरांची मिरवणूक, भोजन, शिदोरी आदींची व्यवस्था केली आहे. या पत्रकार परिषदेस शिवानंद चौलगी, परशुराम सातले, मल्लिनाथ चौलगी, शिवाजीराव कलमदाणे, अंबाराया कनोजी, सिद्धाराम कापसे, राजकुमार अमोगी, काशिनाथ पाटील, मल्लिनाथ चौलगी, शंकर अजगोंडे, श्रीशैलय्या मसुती, खंडप्पा वग्गे, इरण्णा चपळगांव, काशिनाथ कडगंची आदी उपस्थित होते.

रामललांचे वैदिक पं. लक्ष्मीकांत दीक्षित यांचा गौरव

याचवेळी अयोध्या येथे २२ जानेवारी २०२४ रोजी संपन्न झालेल्या रामललांच्या मूर्तीच्या अभिषेक सोहळा पूजन ज्यांच्या नेतृत्वाखाली होता ते वैदिक पंडित लक्ष्मीकांत मथुरानाथ दीक्षित व त्यांचे कुटुंबीय यांचा सन्मान सोहळादेखील होणार आहे.

बार्शीत लोकसभेसाठी ६५.२९ टक्के मतदान

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ८ मे-

लोकसभेसाठी बार्शी विधानसभा मतदारसंघात चुरशीने शांततेत मतदान झाले. रात्री १२.४० वाजता माहिती दिली.

स्त्री मतदार १५४७४३, पुरुष मतदार १६६४९७ व तृतीयपंथी मतदार ३९ असे एकूण मतदार ३,२१,२७० असून यात स्त्री मतदान ९७,५४१, पुरुष मतदान १,१२,२०२ तर तृतीयपंथी मतदान ११ असे एकूण मतदान २,०९,७५४ इतके मतदान झाले आहे. याची एकूण ६५.२९ टक्के मतदान झाले असल्याचे सांगितले. ऊन फार असल्याने लोकांनी सकाळी ११ वा. च्या आत आणि दुपारी ४ नंतर मतदानास गेले आहेत. गेल्या लोकसभेच्या मतदानापेक्षा यंदा थोडे वाढल्याचे बोलले जात आहे. बार्शी शहर व तालुक्यात सर्वत्र मतदानाची लगबग दिसून येत होती. वृध्द व्यक्तींना कोण मोटारसायकलवर बसवून तर कोण व्हीलचेअरवर घेवून येवून मतदान करत होते. बुथवरही गर्दी दिसत होती. सकाळी ९ ते १२ च्या दरम्यान मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा होत्या. त्यानंतर मात्र तुरळक गर्दी होती. मतदानासाठी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत असा सुमारे ११ तासांचा वेळ दिल्याने सायंकाळी ६ वाजता शहरातील मतदार केंद्रावर फारशी गर्दी दिसून आली नाही. मतदानासाठी दोन्ही गटामध्ये चुरस पहायला मिळाली. आज मतदानाच्या सर्व मशिन्स धाराशिव (उस्मानाबाद) येथे पोलीस बंदोबस्तात पाठविण्यात आल्या आहेत.

गोणेवाडी दिव्यांग मतदान केंद्र ठरले आदर्श

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी यंदा पहिल्यांदाच निवडणूक विभागाच्यावतीने सखी मतदान केंद्र, आदर्श दिव्यांग मतदान केंद्र, आदर्श महिला मतदान केंद्र, आदर्श युवा मतदान केंद्र याचबरोबर आदर्श मतदान केंद्र ही संकल्पना राबविल्यामुळे मतदार आकर्षित होऊन मतदानाचा हक्क बजाविला आहे. ४२ सोलापूर लोकसभा मतदार संघातील पंढरपूर विधानसभा मतदारसंघात मंगळवेढा तालुक्यातील गोणेवाडी येथील दिव्यांग मतदारांसाठी स्थापन केलेले आदर्श दिव्यांग मतदान केंद्र हे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहे.



मंगळवेढ्याच्या गोणेवाडीतील आदर्श दिव्यांग मतदान केंद्राची स्थापना केली. या मतदान केंद्रात रॅम्प, व्हीलचेअर, प्रथमोपचार पेटी, मदत कक्ष, कमोडसह स्वतंत्र प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, उष्मघातापासून वाचण्यासाठी सूचना फलक, आरोग्य सुविधा, पुरेशी प्रकाश व्यवथा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, महिला दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी महिला स्वयंसेवक, कुलर आधी आवश्यक सुविधा देण्यात आल्या.

आरोप-प्रत्यारोप अन् रणधुमाळीत झाले इलेक्शन... आता जपा रिलेशन

सलोखा टिकवण्यासाठी सोशल मीडियावर ट्रेंड

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. ८ मे-

माढा लोकसभा मतदारसंघात आपापल्या उमेदवारासाठी सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातला होता. मतदान झाल्यानंतर ते कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा सलोखा टिकवण्यासाठी झाले इलेक्शन... आता जपा रिलेशन हा ट्रेंड सोशल मीडियावर दिसून आला.

सध्या देशामध्ये लोकशाहीचा उत्सव म्हणजेच लोकसभा निवडणुका चालू आहेत. सुरुवातीला वेगवेगळ्या पक्षातून उमेदवारी कोणाला मिळणार यासाठी सोशल मीडियावरून तर्कवितर्क काढले जात होते. त्यावरून कार्यकर्ते आपला नेता उमेदवारीसाठी का योग्य आहे हे सोशल मीडियाद्वारे सांगत होते.

आधी तापले वातावरण आता समुपदेशन

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर ज्या त्या पक्षाच्या पदाधिकारी व नेते मंडळींनी आपल्या पक्षाच्या उमेदवाराचे काम व भविष्यातील वाटचाल काय राहील तसेच त्यांचा प्रचार सोशल मीडियाद्वारे करुन वातावरण चांगलेच गाजवले होते. परंतु सांगोला तालुक्यामध्ये मंगळवार दि. ७ मे रोजी मतदान झाल्यानंतर कार्यकर्ते, पदाधिकारी, नेतेमंडळी यांच्याकडून सलोखा टिकवण्यासाठी झाले इलेक्शन..... जपा रिलेशन हा ट्रेंड सोशल मीडियावर चालू करुन समुपदेशन करण्यात येत आहे.

माढ्याचा गढ जिंकणार कोण?; कार्यकर्त्यांमध्ये पैजा

माढा लोकसभा मतदारसंघ

मतदारांच्या कौलाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष

तभा वृत्तसेवा,
पिलीव, दि. ८ मे-

माढा लोकसभा मतदारसंघात भाजपा, महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर तर विरोधी महाविकास आघाडीकडून धैर्यशील मोहिते-पाटील यांनी निवडणूक लढविली. मंगळवारी चुरशीने मतदान झाले. या मतदारसंघात कमळ फुलणार की तुतारी वाजणार, अशा चर्चांना सध्या उधाण आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

माढा लोकसभा मतदारसंघात करमाळा, माढा, सांगोला, माळशिरस, फलटण, माण-खटाव या विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. करमाळा विधानसभा मतदारसंघात ३,१७,९२८ एवढे मतदार असून त्यापैकी १,७४,८५६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला. सरासरी ५५ टक्के मतदान झाले. माढा विधानसभा मतदारसंघात ३,३७,६३२ एवढे मतदान असून त्यापैकी २,०६,३८३ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजाविला. सरासरी ६१ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. सांगोला विधानसभा मतदारसंघात एकूण ३,१२,४९८ एवढे मतदारांपैकी १,८७,२९८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. या तालुक्यात ५९ टक्के मतदान झाले. माळशिरस विधानसभा मतदारसंघातील ३,३७,३८६ मतदारांपैकी २,०३,३७० मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. सरासरी ६० टक्के मतदान झाल. फलटण विधानसभा मतदारसंघात ३,३५,९९९ एवढे मतदान असून त्यापैकी २,१५,८१५ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजाविला. याठिकाणी ५८ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला, तर माण-खटाव विधानसभा मतदारसंघात ३,५०,०११ एवढे मतदार असून त्यापैकी २,०४,४६८ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजाविला. याठिकाणी सरासरी ५८ टक्के मतदान झाले.

माढा लोकसभा मतदारसंघात ११,९२,१९० एवढ्या मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजाविला असून या संपूर्ण माढा लोकसभा मतदारसंघात ६३.६५ टक्के एवढे मतदान झाले आहे. याठिकाणी महायुतीचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री महादेव जानकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी प्रचारसभा घेतल्या होत्या तर महाविकास आघाडीचे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासाठी माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रचारसभा घेतल्या.

४ जूनच्या निकालाकडे नजरा

७ मे रोजी संपूर्ण माढा लोकसभा मतदारसंघात मतदान झाले. यामध्ये महायुतीचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर व महाविकास आघाडीचे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह इतर ३० उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशिनमध्ये बंद झाले असून माढा लोकसभा मतदारसंघात पुन्हा कमळ फुलणार की तुतारी वाजणार हे ४ जून रोजीच समजणार. पण सध्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्सुकता लागली आहे.

संक्षिप्त वृत्त

दागिने खरेदीसाठी चंदुकाका सराफमध्ये अक्षय्य तृतीया शुभमुहूर्त ऑफर्स

सोलापूर, दि. ८ मे-

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर दागिने खरेदी करण्याची आपल्याकडे परंपरा आहे. याच परंपरेचं औचित्य साधून बारामतीची सुवर्णपेढी चंदुकाका सराफ यांनी अक्षय्य तृतीया शुभमुहूर्त ऑफर्स जाहीर केली आहे. या ऑफर्समध्ये सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीवर कमीतकमी मजुरी फक्त रूपये ४९९ प्रति ग्रॅमपासून देण्यात येणार आहे. हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर १००% पर्यंत सूट मिळणार आहे. चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर फ्लॅट १०% सवलतही देण्यात येत आहे. याशिवाय जर एसबीआय क्रेडिट कार्डधारक असाल तर ५% एक्स्ट्रा कॅशबॅक देखील मिळू शकतो. चंदुकाका सराफ यांच्या महाराष्ट्रातील सर्व स्टोअर्समध्ये ह्या ऑफर्स ९ ते १२ मे २०२४ पर्यंत सुरू असणार आहे. तेव्हा आपल्या जवळच्या चंदुकाका सराफ स्टोअर्सला भेट द्यावी, असे आवाहन संचालकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी १८००२६७८५५५ ह्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

चंदुकाका सराफ
SINCE 1827
बारामतीची सुवर्णपेढी

अभिनेते सुबोध भावे यांनी पत्नी मंजिरीला दिल्या अनोख्या अंदाजात शुभेच्छा

सोलापूर, दि. ८ मे-

सुबोध भावे हे मराठी चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रांतील एक अग्रगण्य आणि प्रतिष्ठित अभिनेते आहेत. त्यांचं काम अत्यंत कौतुकास्पद आणि लोकप्रिय आहे. त्यांना गौरव, सन्मान आणि प्रेम मिळते आहे. त्यांच्या कामामुळे त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आणि मराठी चित्रपटसृष्टीत विश्वास संपादन केला आहे.सुबोध भावे यांनी आपल्या सोशल मिडियाद्वारे आपल्या चाहत्यांना त्यांच्या आयुष्यतल्या विशेष अनुभवांबद्दल नेहमीच सांगत असतात. त्यांचा चाहतावर्ग यांच्या सोशल मिडियावर नजर ठेवून असतो. त्यांनी आपल्या सोशल मिडियावर एक अनोखा आणि विशेष असा व्हिडिओ शेअर केला आहे. तो विशेष यासाठी आहे की ६ मे १९९१ रोजी सुबोध यांनी त्यांची पत्नी मंजिरी हिला प्रपोझ केलं होतं आणि आज तब्बल ३३ वर्षांनी सुबोध यांनी त्या दिवसाला उजाळा दिला आणि मंजिरीला शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी चित्रपट आणि दूरदर्शन उद्योगात अभिनय करणारे लोकप्रिय अभिनेते सुबोध भावे यांनी आज त्यांच्या पत्नीला ३३व्या प्रपोझल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्याचा एक अनोखा विचार केला. त्यांची पत्नी मंजिरी यांना शुभेच्छा देताना सुबोध यांनी मंजिरीबद्दलचे आपले प्रेमही व्यक्त केले, पण या व्हिडिओची खास गोष्ट ही आहे की या व्हिडिओत सुबोध यांचा चेहरा चक्क तरुणपणातल्या सुबोधसारखा आहे. प्रेक्षक या व्हिडिओमुळे खूश झाले आहेत. कारण सुबोध यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्याशिवाय या व्हिडिओ दरम्यान सुबोध यांना त्यांच्या प्रेम कथेची आठवण झाली कारण आजच्याच दिवशी त्यांचा प्रपोझल दिवस होता. सुबोध यांनी ही खास गोष्ट प्रेक्षकांसोबत शेअर केली आहे. हा व्हिडिओ पाहून मंजिरीसोबतच त्यांचे चाहतेही खूश आहेत, कारण ३३ वर्षांनंतरसुद्धा सुबोध यांनी आजच्या दिवसाचे महत्त्व जपून मंजिरीला आठवणीने शुभेच्छा दिल्या. त्यांनी मंजिरी वरील आपले प्रेम व्यक्त केले. सुबोध म्हटले आहेत कि जगण्यासाठी श्वासाची नाही तर प्रेमाची गरज असते. एक आदर्श जोडीदार कसा असावा, हे त्यांनी दाखवून दिले आहे. आपली पत्नी मंजिरी हिला आगळ्या अंदाजात शुभेच्छा देत सुबोध यांनी तिचं मन जिंकलं आहे.

बीएएसएफ शेतकऱ्यांसोबत बांधिलकीला अधिक मजबूत

सोलापूर, दि. ८ मे-

उत्पादनक्षमता आणि पिकाचे उत्पादन यामध्ये ३५ ते ४०% इतके प्रचंड नुकसान निर्माण करणाऱ्या रस शोषक किटकांनी भारतातील शेतकरी पिकांसमोर एक लक्षणीय संकट उभे केले आहे.भारतातील शेतकरी आता एफिकॉन ह्या बीएएसएफच्या आज सादर करण्यात आलेल्या नवीन किटकनाशकाच्या साह्याने ह्या आव्हानाचा सामना करु शकतात.एफिकॉनला विशेष रसायनामधील ॲक्सालिऑन ह्या बीएएसएफच्या नव्या सक्रीय घटकाची शक्ती मिळालेली आहे.

तोडकर वस्तीतील घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी

अधिकाऱ्यांच्या कार्यालयात संतप्त नागरिकांचा ठिय्या

''महापालिकेचा धिक्कार''च्या दिल्या घोषणा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

बाळे येथील तोडकर वस्तीतील घरांमध्ये ड्रेनेजचे गहाण पाणी घुसल्याने संतप्त झालेल्या महिला व नागरिकांनी थेट महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयात ठिय्या मांडला. ''महापालिकेचा धिक्कार असो'' च्या घोषणा दिल्या.

बाळे येथील तोडकर वस्तीत गेल्या तीन महिन्यापासून ड्रेनेज लाईन तुंबत आहे. त्यामुळे हे ड्रेनेजचे दुर्गंधीयुक्त घाण पाणीघरामध्ये घुसत आहे. पाणी सुटल्याच्या दिवशी याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. या घाण पाण्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यापूर्वी सबंधित अधिकाऱ्यांना सांगूनही कार्यवाही केली नाही. आज बुधवारी सकाळी पुन्हा मोठ्या प्रमाणात ड्रेनेजचे पाणी घरात घुसल्याने संतप्त महिला व नागरिकांनी थेट महापालिका गाठली. महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाच्या कार्यालयात उपअभियंता पेंटर यांना समस्या कधी सोडणार याचा जाब विचारला. अशा दुर्गंधीमध्ये जेवण कसे करणार असा सवाल यावेळी उपस्थित केला. हा प्रश्न मार्गी लावण्याची आग्रही मागणी युवा नेते राजू आलुरे, आनंद भवर आणि अल्पेश राऊत यांनी केली.

अधिकाऱ्यांनी केली 'ऑन द स्पॉट' पाहणी

सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे व इतर अधिकाऱ्यांनी तोडकर वस्ती येथे जाऊन समस्येची पाहणी केली. तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याबरोबरच नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यात येईल, असे त्यांनी आश्वासन दिले.

श्रीविजयवैभवलक्ष्मी माता मंदिराचा उद्या वर्धापनदिन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे -

जुळे सोलापूर भागातील श्री विजयवैभवलक्ष्मी माता मंदिराचा १८ वा वर्धापन दिन शुक्रवार १० मे रोजी इंडियन मॉडेल स्कूल समोर पाण्याच्या टाकीजवळ जुळे सोलापूर येथील श्री विजयवैभवलक्ष्मी मंदिर येथे होईल. त्यानिमित्ताने मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम होतील. शुक्रवार दि. १० मे रोजी पहाटे ५ ते सकाळी ८.३० वा. पर्यंत रुद्र पठणाने क्षिराभिषेक, पंचगव्याभिषेक, पंचामृताभिषेक त्यानंतर विशेष अलंकार महापुजा होणार आहे. सकाळी ९ वाजता महाआरती, सकाळी ९.३० ते १२.०० वाजेपर्यंत श्रीसुक्त हवन होईल. दुपारी ३ ते ४.३० वाजेपर्यंत भजनाचा कार्यक्रम, दुपारी ४.३० ते ५.३० वाजेपर्यंत देवी सहस्त्र नामावली कुंकुमअर्चना, सायंकाळी ६.०० वाजता मातेची पालखी मिरवणुक (मंदिर प्रदक्षिणा), सायंकाळी ६.३० वाजता भव्य दिपोत्सव कार्यक्रम होईल. त्यानंतर विशेष महाप्रसादाचे आयोजन करण्यात केले आहे. भक्तांनी उपस्थित राहून दिप प्रज्वलित करुन मातेचा शुभाशिर्वाद घ्यावा असे आवाहन जोकारे, सोलापूरे व भोगडे परिवारांकडून केले आहे.

मुंबई प्रांतिक परिषदेच्या शतकपूर्ती; सोलापुरात शुक्रवारी सन्मान परिषद

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे .

बार्शी येथील मुंबई प्रांतिक परिषदेच्या शतकपूर्तीनिमित्त शुक्रवार दि. १० मे २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात शतकपूर्ती सन्मान परिषद आयोजित करण्यात आली आहे.

देशांतर , नामांतर आणि धर्मांतर या डॉ. आंबेडकरांच्या ऐतिहासिक भाषणाचे स्मरण या निमित्ताने करण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे १० मे १९२४ रोजी मुंबई प्रांतिक परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिल्यांदाच अस्पृश्यांच्या उद्धारासाठी धर्मांतर हाच पर्याय आहे. येवले येथील परिषदेपूर्वी त्यांनी विचार आणि त्याचे विश्लेषण जाहीर केलेले दिसून येते. या ऐतिहासिक परिषदेत देशांतर, नामांतर आणि धर्मांतर या तीन पर्यायांवर डॉ. आंबेडकर यांनी विचार मांडले होते. धर्मांतराचा विचार प्रथमच त्यांनी यावेळी अधोरेखित केला होता. या परिषदेस १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या या ऐतिहासिक प्रेरणादायी भाषणाचे स्मरण तरुणाईला व्हावे या उद्देशाने ही ''शतकपूर्ती सन्मान परिषद'' सोलापुरात आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन माजी शिक्षणाधिकारी विष्णू कांबळे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत लेखक दत्ता गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. टी. एस. मोरे, प्रा. डॉ. एम.डी. शिंदे , प्रा. एम. आर. कांबळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी संयोजक सुधीर चंदनशिवे, सुजित हावळे सुनीता गायकवाड, प्रा. डॉ. अंजना गायकवाड, सुनील आवारे, जयश्री रणदिवे, प्रा. डॉ. वनिता चंदनशिवे , सुचित्रा थोरे, शीला हावळे आदी परिश्रम घेत आहेत. या ऐतिहासिक परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

रामवाडी येथील गोडाऊनच्या स्ट्राँगरूममध्ये 'ईव्हीएम मशीन' सील

रात्री उशिरापर्यंत मशीन सील करण्याचे काम

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व इतर अधिकारी उपस्थित

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

लोकसभा निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघात मंगळवार, दि. ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत किरकोळ प्रकार वगळता उत्साहात व शांततेत मतदान पार पडले. आज सकाळी हाती आलेल्या अंतिम मतदार टक्केवारीनुसार सोलापूर लोकसभा मतदारसंघात ५९.१९ टक्के आणि माढा लोकसभा मतदारसंघासाठी ६३.६५ टक्के इतके मतदान झाले असून, या मतदानाच्या मतपेट्या आज (दि. ८) रात्री उशिरापर्यंत स्ट्राँगरूममध्ये सील करण्याचे काम जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अप्पर जिल्हाधिकारी तथा माढा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी मोनिकासिंह ठाकूर यांच्यासह इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना दिली.

काही बुथवर रात्री उशिरापर्यंत मतदान झाल्याने टक्केवारी वाढली आणि या मतपेट्या रात्री उशिराने पोलिस बंदोबस्तात रामवाडी गोडावून मध्ये दाखल झाल्या. मतदान घेण्यासाठी गेलेले कर्मचाऱ्यांनीही या ठिकाणी रात्री उशिरापर्यंत हजेरी लावून आपल्याकडील जबाबदारी चोखपणे पार पाडली आहे. या मतपेट्या बुधवारी दिवसभर आणि रात्री उशिरापर्यंत रामवाडी गोडावूनमध्ये आल्या आणि सीलही करण्यात आल्या आहेत. यासाठी आवश्यक तो पोलिस, सीआरपी, एसआरपी बंदोबस्तही लावण्यात आला आहे. आता ४ जूनला म्हणजेच निकालादिवशीच या मतपेट्या उघडल्या जाणार आहेत.

या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले. ७० टक्केपर्यंत मतदान घेवून जाण्यासाठी सर्वांनी अथक प्रयत्न केले मात्र कडक उन्हामुळे व इतर काही कारणामुळे मतांचा टक्का कमीच झाला. मंगळवारी सकाळी मोठ्या उत्साहात मतदानास सुरुवात झाली. उन्हाच्या तीव्रतेमुळे सकाळी अनेक नागरिक मतदानासाठी घराबाहेर पडल्याचं चित्र दिसून आलं. मतदानादिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर प्रशासनाची सज्जता दिसून आली. उन्हाच्या वाढत्या तीव्रतेच्या पार्श्वभुमीवर मतदारांच्या काळजीसाठी प्रशासनानं विशेष उपाय योजनांवर भर दिला होता आणि आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली होती. मतदानाच्या पार्श्वभुमीवर सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. योग्य ती खबरदारी या निमित्त घेण्यात आली होती. अनेकांनी मोठ्या उत्साहात लोकशाहीच्या उत्साहाचा हा सोहळा पार पाडला.

मतदान वाढविण्यासाठी सर्वांचेच विशेष प्रयत्न

विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते हे अधिकाधिक मतदान कसं होईल? याकडं विशेष लक्ष देताना दिसत होते. दरम्यान विविध मतदान केंद्रावर वरिष्ठ पोलीस अधिकारी हे प्रत्यक्षात जाऊन भेट देऊन एकूणचं परिस्थितीचा आढावा घेऊन मतदान सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी योग्य त्या सूचना मतदान केंद्रावरील पोलीस कर्मचाऱ्यांना देत होते. ऊन वाढण्यापूर्वीच मतदान करण्याची प्रत्येकाची लगबग दिसल्यानं बहुतांश मतदान केंद्रावर सर्वत्र सकाळीचं मतदानासाठी रांगा लागल्याचं चित्र पहावयास मिळालं. तरीही आवश्यक तितक्या प्रमाणात मतदान झाले नसल्याची खंतही काहीजणांनी बुधवारी व्यक्त केली.

सोलापुरात तापमानाचा पारा ४१ अंशाच्या पुढेच

वाढत्या तापमानामुळे छत्र्या, टोप्यांची मोठी उलाढाल

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

सोलापुरमध्ये उन्हाच्या कडाक्याने नागरिक त्रासले आहेत. कारण गेल्या १०-१५ दिवसांपासून ४०-४१ अंशाच्या पुढेच तापमान असल्याने सकाळी ११ नंतरच घराबाहेर पडायला नागरिक भीत आहेत. जर महत्वाचे काम निघाले तर छत्री, टोपींचा वापर लोक करीत असल्याने शहरातील बाजारपेठांत याची मोठी उलाढाल झाली आहे. तर शीतपेयधारकांचीही सध्या चलती आहे.

जास्त तापमानात विनाटोपी फिरले तर अचानक चक्कर येणे, नाकातून रक्त येणे असे प्रकार होऊ लागले आहे. जिल्हाभरात काहीजणांना उष्माघात झाल्याची नोंद झाली आहे, वेळीच उपचार घेतल्याने हे लोक बरेही झाले आहेत. दरम्यान, अजून जवळपास महिनाभर कडक ऊन जाणवणार असल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

सोलापुरात यावर्षी उन्हाळ्यात ४४.४ अंश सेल्सिअस एवढ्या विक्रमी तापमानाची नोंद झाली आहे. कडक उन्हामुळे रस्त्यावरील वाहतूक कमी झाली आहे. या शिवाय उन्हाचा त्रास असह्य झाल्याने ताप येण्याचे प्रकार वाढू लागले आहेत. दुपारी १२ ते ५ कालावधीत शक्यतो घराबाहेर उन्हात जाण्याचे टाळावे. आवश्यक असल्यास योग्य त्या उपाययोजना करून बाहेर जावे, असा सल्ला आरोग्य खात्याने दिला आहे. जिल्हा रुग्णालय ते प्राथमिक आरोग्य केंद्रात विशेष उष्माघात उपचार कक्ष सुरू करण्यात आले आहेत.

शनिवार ११ मे सायं.७ वा.
हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर

अभिजात क्रिएशन्स
दिलीप प्रभावळकर यांच्या कथेवर आधारित
मिलाप
बोक्या सातबंडे

सोलापुरातील शुभारंभाचा प्रयोग
प्रमुख भूमिकेत आरूष बेडेकर
निर्माते - राहुल कर्णिक, रणजित कामत आणि दीप्ती प्रणव जोशी
लेखक - डॉ. निलेश माने | दिग्दर्शक - विक्रम पाटील, दीप्ती जोशी
दृश्यसंकल्पना - प्रणव जोशी | सूत्रधार - दीपक गोडबोले
फोन बुकिंग व प्रयोग संपर्क
bookmyshow /ति.विक्री आजपासून सुरु... गुरु वठारे 9011474400

मोहोळच्या नागनाथ यात्रेला तैलाभिषेकाने प्रारंभ

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि. ८ मे-

श्रीक्षेत्र मोहोळ येथील ग्रामदैवत श्री सद्गुरू नागनाथ महाराजांची यात्रा बुधवारी चैत्र अमावस्यापासून श्रींना पारंपारिक पद्धतीने अभिषेक करून तेल लावण्याच्या कार्यक्रमाने सुरुवात झाली. सकाळी पारंपारिक पद्धतीने अभिषेक व श्रींना तेल लावणे आणि रात्री चंदनउटीचा कार्यक्रम झाला.

दि. ९ मे रोजी रात्र वसंत पूजा, चंदनउटी, प्रसाद व प्रमुख मानकरी विनायकबुवा मोहोळकर यांचे सद्गुरु नागनाथ चरित्रावर प्रवचन, १० मे रोजी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी रात्री वसंत पूजा, चंदन उटी, त्यानंतर रघुनाथबुवा रचीत कुर्डे यांचे चक्रीभजन, रात्री १ वाजता श्रीक्षेत्र वडवळहून आलेल्या श्रीच्या छत्रीचे आगमन होईल. ११ मे रोजी पहाटे ४ वाजता खर्गाच्या पालखीसह मिरवणूक व भाकणूक आणि हेग्रसवंशज विनायकराव तथा अरुण बुवा मोहोळकर आणि खर्गे महाराजांची आलिंगन भेट. १३ मे रोजी रात्री ८ वाजता श्रीच्या पालखीची मिरवणूक व पूज्य भक्त भिकलिंग महाराजांची गुरु-शिष्य भेट आणि त्यावेळी शोभेचे दारूकाम. १४ मे रोजी सकाळी महापूजा, दुपारी ४ वाजता श्रीच्या पालखीसह गणासह मिरवणूक व दिल्ली दरवाजात राजकीय भाकणूक, दि. १७ मे रोजी दुपारी कलगीतुरे भेदिक गाण्यांचा सामना व दुपारी ४ वाजता जंगी कुस्त्याचा फड रंगणार आहे.

१८ मे रोजी तेल उतरवण्याचा कार्यक्रम

वैशाख शुद्ध दशमी शनिवार १८ मे रोजी श्रीचे तेल उतरवण्याचा कार्यक्रम आणि प्रसाद होणार आहे. सद्गुरु नागनाथ महाराजांच्या यात्रा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी श्री नागनाथ देवस्थान कमिटीचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, पदाधिकारी, सदस्य, मोहोळ नगरपरिषदचे मुख्याधिकारी, कर्मचारी, पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन व नागनाथ सांप्रदायिक मंडळी, संत, ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

हाऊसफुल्ल गर्दीत
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
रोज-१२॥,३॥,६॥,वा.

Book The Ticket At BookMyShow
शुक्र दि १० पासुन भव्य प्रारंभ

Bhola Shankar

लक्ष्मीनारायण स्क्रिन १(AC)
सकाळी.९॥ वा

लक्ष्मीनारायण स्क्रिन १(AC)
१२।,३।,६।,९॥ वा

लक्ष्मीनारायण सिनेमास (AC)
१२।,३।,६।, वा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

माजी नगरसेवकाच्या मुलासह दोघांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.८ मे-

मतदारांना स्लिप व रोख पैसे वाटणाऱ्या माजी नगरसेवकाच्या मुलासह दोघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चेतन नागेश गायकवाड (वय २५, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ३, सोलापूर) आणि नरसिंग सायबण्णा कोळी (वय ३१, रा. सैफुल, रेणुका नगर हौसींग सोसायटी, सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबबात पोलिस शिपाई सागर बोरामणीकर यांनी फिर्याद दाखल केली आहे.

७ मे रोजी सायंकाळी सुतकर शाळेजवळ चेतन गायकवाड व नरसिंग कोळी हे दोघे पसंतीच्या उमेदवाराला मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांना एक पांढरी चिठ्ठी व रोख ५०० रुपये वाटप करीत असताना मिळून आले. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पवार पुढील तपास करीत आहेत.

सोलापुरात कोण ठरणार 'बाजीगर'!

सोलापूर मतदारसंघात चर्चांना ऊत

तालुकानिहाय गोळाबेरीज करण्यात नेतेमंडळी दंग

४ जूनलाच होणार फैसला

तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड
सोलापूर, दि. ८ मे-

सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी ५९.१९ टक्के तर माढा मतदारसंघासाठी ६३.६५ टक्के मतदान झाले असून, सोलापुरात मुख्य लढत झालेल्या महाविकास आघाडी आणि महायुतीचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते तालुकानिहाय झालेल्या मतदानाची गोळाबेरीज करून नाना प्रकारचे तर्कवितर्क लावत असल्याने या मतदारसंघात कोण बाजीगर ठरणार? याकडे अवघ्या जिल्ह्याचेच नाहीतर राज्याचेच लक्ष लागले आहे. दरम्यान, या निवडणुकीचा फैसला ४ जूनलाच होणार आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. या मतदारसंघाचे एकूण मतदार संख्या २० लाख ३० हजार ११९ इतकी असून, यामध्ये १० लाख ४१ हजार ४७० पुरुष मतदार, ९ लाख ८८ हजार ४५० स्त्री मतदार व १९९ तृतीयपंथी मतदार आहेत. यामध्ये विधानसभा निहाय मतदान झालेली आकडेवारी पुढीलप्रमाणे- मोहोळ ६३.१५, सोलापूर शहर उत्तर ५९.१५, सोलापूर शहर मध्य ५६.५१, अक्कलकोट ५९.१७, सोलापूर दक्षिण ५८.१८, पंढरपूर ५९.०४ इतके फायनल मतदान झाले.

या मतदारसंघात एकूण १२ लाख १ हजार ५८६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. मोहोळ २ लाख १ हजार ९६५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. उ. सोलापूर १ लाख ०८४ हजार ८५ इतकं मतदान झाले. मध्य सोलापूर १ लाख ८४ हजार २९ जणांनी मतदान केले. अक्कलकोट २ लाख १२ हजार ७९० जणांनी मतदान केले. दक्षिण सोलापूर २ लाख ७ हजार ४८६ जणांनी मतदान केले. पंढरपूर २ लाख ११ हजार २५१ जणांनी मतदान केले. अशी शासकीय आकडेवारी उपलब्ध झाली आहे.

मतदानाच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी सोलापुरात सर्वत्र एकच चर्चा ऐकण्यास मिळत आहे, ती म्हणजे काय होईल, लीड कुणाला मिळेल, कोण निवडून येणार, तुम्हाला काय वाटते? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. सोलापुरात भाजपा आणि काँग्रेसमध्ये सरळ सरळ लढत झाली. सुरुवातीला वैयक्तिक विषयावर प्रचाराला सुरुवात झाली. नंतर विकासाचा विषय पुढे आला, उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर मात्र भाजपाने हिंदुत्ववादाचा मुद्दा प्रकर्षाने पुढे आणला. वंचित बहुजन आघाडीने घेतलेली माघार, एमआयएम पक्षाने उमेदवार न देण्याचा घेतलेला निर्णय तसेच काँग्रेस पक्षाच्या अर्ज दाखल करण्याच्या मिरवणुकीत काही नेत्यांकडून फडकावण्यात आलेले हिरवे झेंडे त्यामुळे भाजपच्या हातात आयते कोलीत मिळाले. काँग्रेसने विकासाच्या मुद्यांसोबतच संविधान बचाव हा विषय पुढे आणला. संविधानासाठी एमआयएमने माघार घेतली. मुस्लिम समाजातून मतदान व्हावे म्हणून मशिदीतून मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. मशिदीतून फतवे काढले जात असल्याचा मुद्दा भाजपाने कायम प्रचारात घेतला. हिंदुत्ववाद पुढे आणला, अशी भाषणे सुरु झाली. यातच देवेंद्र कोठे यांचा भाजपा प्रवेश झाला, त्यांनी मुख्यमंत्री योगी यांच्या सभेत केलेले भाषण केल्याने या निवडणुकीत मुस्लिम समाजाला मतदानाला बाहेर काढण्याचे कारण ठरले आहे.

मराठा आरक्षणावरून मराठा समाजामध्ये सत्ताधारी पक्षाबाबत नाराजीचा सूर दिसून आला. अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी दौरा केला. त्यांनी मराठा समाजाला महायुतीला मतदान करण्याचे आवाहन केले. बरीच मराठा नेते मंडळी महायुती सोबत होती. अचानक सोलापुरातून मनोज जरांगे-पाटील यांचा दौरा झाला, परंतु त्यांनी मतदानाबाबत कोणतेही भाष्य केले नाही. भारतीय जनता पार्टीचा एक गठ्ठा म्हणून मतदान करणारा समाज म्हणजे पद्मशाली अर्थात साळी. त्या समाजाने उत्साहाने मतदान केले. जय श्रीरामचा नारा त्या भागात जोरात होता. तसेच भाजपाचा दुसरा मोठा गठ्ठा मतदार म्हणजे लिंगायत समाज. परंतु सिध्देश्वरची चिमणी पाडल्यानंतर धर्मराज काडादी यांनी काँग्रेसला पाठींबा दिला, ते प्रथमच राजकीय स्टेजवर दिसले. त्यामुळे २०१९ मध्ये जयसिध्देश्वर महाराज यांना मतदान केलेला लिंगायत समाज यंदा काहीसा काँग्रेसकडे वळाला. या समाजाची किती मते भाजपापासून काँग्रेसकडे जाणार यावरही भाजपाचे भवितव्य अवलंबून आहे.

शिवसेनेच्या ज्योती वाघमारे या महायुतीत असल्याने त्यांनी आपला समाज भाजपाकडे किती वळवला हा धोका काँग्रेसला आहे. ऐनवेळी काँग्रेसचे भारत जाधव भाजपच्या स्टेजवर गेल्याने त्यांनी त्या भागातील किती मते भाजपकडे वळवली. हा मुद्दा सुद्धा या निवडणुकीत महत्त्वाचा ठरणार आहे. एकूणच या निवडणुकीत कोण जिंकणार आणि कोणाचा पराभव होणार? हे येणारा काळच सांगणार आहे.

भाजपा आणि काँग्रेसमध्ये चुरशीची लढाई

विधानसभानिहाय वर्तवलेल्या या अंदाजानुसार भाजप आणि काँग्रेसमध्ये सोलापुरात नेक टू नेक फाईट आहे. एखाद्या मतदारसंघात काहीशा मतांचाही फरक पडला तर निकालावर परिणाम होण्याची शक्यता आहे. या शिवाय मागील निवडणुकीत तब्बल १ लाख ७० हजार मते मिळवणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला किती मते मिळतात यावर ही लढाई आधारित असणार आहे. अर्थात हे सर्व ढोबळमानाने वर्तवलेला अंदाज आहे. खरा निकाल चार जून नंतरच समोर येईल. सोलापूर लोकसभेची लढाई ही अत्यंत चुरशीची आहे.

सोलापूर दक्षिण अन् अक्कलकोटचे मतदान भाजपासाठी निर्णायक

सोलापूर दक्षिणमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. माजी आमदार दिलीप माने यांनी काँग्रेसमध्ये परतण्याचा निर्णय घेतला. या मतदारसंघाचे शहरी आणि ग्रामीण असे दोन भाग करता येईल. श्री सिद्धेश्वर सहकारी कारखान्याची चिमणी पाडल्याने कारखान्याचे सभासद भाजपविरोधात आक्रमक राहिले. विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांनीही उमेदवारासाठी चांगलाच जोर लावला. भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल असलेले आकर्षण सोलापूर लोकसभा निवडणूक दोन वेळा एकतर्फी सोलापूर लोकसभा निवडणूक ही मागील दोन वेळा एकतर्फी राहिली. यंदा मात्र तशी स्थिती दिसून आली नाही. तर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात गत निवडणुकीत भाजपला मोठे मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे काँग्रेसने या मतदारसंघात ताकद लावण्याचा प्रयत्न केला. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वात अक्कलकोटमध्ये काँग्रेसने प्रयत्न केले. मात्र आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची मतदार संघात असलेली पकड, कार्यकर्त्यांचे जाळे पाहता भाजपच इथे वरचढ ठरण्याची शक्यता आहे.

सोलापूर शहर मध्यमध्ये हाताला मोठे मतदान

सोलापुरातील शहर मध्यमध्ये भाजपऐवजी काँग्रेसला मताधिक्य मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघ हा बहुभाषिक आणि वेगवेगळ्या जाती धर्मातील लोकांचा मतदार संघ आहे. तरी मुस्लिम आणि पद्मशाली समाज इथे निर्णायक भूमिकेत असतो. या निवडणुकीत भाजपाला धक्का बसण्याचा शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे काँग्रेसला लीड मिळण्याची शक्यता आहे.

सोलापूर शहर उत्तरचा भाजपचा टक्का घसरण्याची शक्यता?

सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ हा भाजपाचा बालेकिल्ला राहिला आहे. लिंगायत आणि मागासवर्गीय समाजाची मोठी संख्या या मतदारसंघात आहे. लिंगायत समाज हा कायम भाजपच्या बाजूने उभा राहतो. त्यामुळे मोठे मताधिक्य भाजपला या मतदारसंघात मिळते. यंदा मात्र लिंगायत समाजात मोठी पकड असलेले धर्मराज काडादी यांनी काँग्रेसच्या बाजूने उभे राहण्याचा निर्णय घेतल्याने या भाजपाचा साधारण २० ते २५ हजार मतांचे मताधिक्य मिळण्याचा अंदाज आहे. तरीही जनतेचा कौल कोणाकडे आहे, ते येत्या ४ जूनलाच समजणार आहे.

मराठा आरक्षण, कांदा निर्यात बंदीचा विषय फोकस

मोहोळ मतदारसंघात माजी आमदार राजन पाटील यांची मोठी ताकद आहे. राजन पाटील यांनी या निवडणुकीत महायुतीला पाठिंबा द्यायचा निर्णय घेतला. माजी आमदार रमेश कदम, राष्ट्रवादीचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी देखील महायुतीला पाठिंबा दिला. मात्र मराठा आरक्षण आणि कांदा निर्यात बंदी, शेतकऱ्यांचे प्रश्न याचा फटका या मतदारसंघात भाजपला बसण्याची शक्यता आहे. या मोहोळ मतदारसंघात काँग्रेसला लीड मिळण्याची शक्यता आहे. तर पंढरपूर, मंगळवेढ्याच्या शहरी भागात भाजपविषयी लोकांच्या मनात आस्था आहे. मागासवर्गीय समाजाची मते देखील वंचित बहुजन आघाडीमुळे विभागली जाण्याची शक्यता आहे. यामुळे भाजपाला पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात लीड मिळण्याची शक्यता आहे.

विवाहितेची आत्महत्या; सासू, सासऱ्याला जामीन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.८ मे-

विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सासू व सासरा आरोपींस मुंबई उच्च न्यायालयाने २५ हजार रुपयांच्या जातमूचलक्यावर जामीन मंजूर केला.

काजल अण्णासाहेब मोरे हिस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सासू अलका सिद्धेश्वर मोरे (वय ५०), सासरा सिद्धेश्वर मारुती मोरे (वय ६०, दोघे रा. ढवळस, ता.मंगळवेढा) यांना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम. जे. जमादार यांनी जामीन मंजूर केला. काजल हिचे २०२१ मध्ये आरोपी अण्णासाहेब याच्यासोबत लग्न झाले होते. लग्नानंतर सासू सासरे पती नणंद हे तिस लग्नामध्ये मानपान नीट केला नाही तसेच माहेरहून १० तोळे सोने घेऊन ये म्हणून तिस जाचहाट करीत होते. तसेच तिस उपाशी पोटी ठेऊन शिविगाळ व मारहाण करीत होते. तसेच माहेरहून नवीन गाळ्याच्या बांधकामासाठी १० लाख रुपये घेऊन ये म्हणून तिस त्रास देत होते. सदरच्या जाचहटीला कंटाळुन काजल हिने ८ डिसेंबर २३ रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली अशा आशयाची फिर्याद सुरेश मुरलीधर घाडगे यांनी मंगळवेढा पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावर आरोपींनी पंढरपूर सत्र न्यायालयात जामीन मिळणेसाठी अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयात जामीन मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. यात आरोपीतर्फे सरकारच्यावतीने ॲड.समीर मानगावकर यांनी तर आरोपींच्यावतीने ॲड. रितेश थोबडे यांनी काम पाहिले.

सोलापूर जनता बँक स्थापना दिन; उद्या सांस्कृतिक कार्यक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या ५९ व्या स्थापना दिवसानिमित्त अक्षय तृतीयेच्या दिवशी शुक्रवार १० मे रोजी सायंकाळी ७ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात प्रसिद्ध रसिक प्रस्तुत 'सोबतीचा करार' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी दिली.

श्री. पेंडसे म्हणाले, समाजातील लहान मोठ्या व्यवसायिकांपासून व्यापारी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना हक्काची वाटणारी आणि आर्थिकदृष्ट्या आधार देणारी बँक म्हणून सोलापूर जनता सहकारी बँकेचा लौकिक आहे. १९६६ पासून हजारो जणांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यामध्ये सोलापूर जनता सहकारी बँकेने योगदान दिले आहे. बँक यंदाच्यावर्षी ५८ वर्षे पूर्ण करून ५९व्या वर्षात प्रवेश करत आहे. त्यानिमित्त शुक्रवारी अक्षय तृतीयेच्या दिवशी विविध सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रम होणार आहेत.

सोलापूर जनता सहकारी बँक लि.
SJSB
Multi-State Scheduled Coop.Bank

शुक्रवारी (दि. १०) सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत नवी पेठ, शिंदे चौक येथील शिवस्मारक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. उन्हाळ्यामुळे रुग्णांना रक्ताची गरज अधिक प्रमाणात भासते. त्यामुळे आपले सामाजिक उत्तरदायित्व पूर्ण करण्यासाठी सोलापूर जनता सहकारी बँकेकडून रक्तदान शिबिर भरवण्यात आले आहे. तसेच सायंकाळी सात वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात रसिक प्रस्तुत 'सोबतीचा करार' हा कवी, गीतकार वैभव जोशी यांच्या मैफिलीचा कार्यक्रम होणार आहे. गायक म्हणून दत्तप्रसाद रानडे आणि सहगायक म्हणून निनाद सोलापूरकर आपली कला सादर करणार आहेत. कार्यक्रमांना बँकेच्या सभासदांनी हितचिंतकांनी आणि अधिकारी, कर्मचारी वर्गाने उपस्थित रहावे, असे आवाहन केले आहे.

छात्रवीर प्रतिष्ठानच्यावतीने रविवारी मूर्तीवाटप

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उपक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर,दि.८ मे-

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छात्रवीर प्रतिष्ठानच्या वतीने ११ ते १४ मे दरम्यान विविध कार्यक्रम होतील. रविवारी १२ मे रोजी पाच फुटी २५ मूर्तींचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष शिरीष जगदाळे यांनी दिली.

छात्रवीर प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शनिवार दि. ११ मे रोजी मान्यवर महिलांच्या हस्ते मंडळाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येईल. अनावश्यक खर्च टाळून प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात येतील. रविवार दि. १२ मे रोजी सायंकाळी ७ वाजता पाच फुटी २५ मूर्तींचे वाटप विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते मूर्ती वाटप होईल. मागील वर्षी ११ मंडळांना मूर्ती वाटप केले होते. मंगळवार दि. १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त मिरवणुकीतील विविध मंडळांचा सत्कार होईल. या पत्रकार परिषदेस लहू गायकवाड, श्याम कदम, प्रकाश कदम, वैभव गंगणे आदी उपस्थित होते.

शौकत पठाण, रियाज सय्यदसह सहा जणांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

मतदारांना स्लिप वाटण्यासाठी विनापरवाना मंडप उभारून उमेदवारांना घालून दिलेल्या नियमाचा भंग करण्याची घटना मंगळवारी सकाळी पावणेदहाच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.या प्रकरणी हवालदार बाळू जाधव यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शौकत मुस्तफा पठाण, रियाज मुस्तफा सय्यद, ओंकार सुनील गायधनकर, संध्या सुनील नागरे, अनुप्रिया रमाकांत जाधव, मनिषा रमेश उड्डाणशिव (रा. सोलापूर) अशी गुन्हा नोंदलेल्यांची नावे आहेत. मंगळवारी सकाळी शहरात सर्वत्र मतदान प्रक्रिया सुरू होती. दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन उर्दू शाळेच्या गेटसमोर कंपाउंडलगत वर नमूद लोकांनी मंगळवारी सकाळी पावणेदहाच्या सुमारास काँग्रेस पक्षाच्या वतीने मतदारांना स्लिपा वाटण्यासाठी नमूदपैकी क्रमांक १ याने विनापरवाना मंडप उभारला. तेथे मतदार स्लिपा वाटण्यासाठी नमूद लोकांना बसविण्यात आले. उमेदवारांना दिलेल्या अटीचा भंग केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

गणपतीला आंब्यांची आरास अन् निराधारांना आमरस

श्रीमंत मानाच्या कसबा गणपतीची सजावट

अक्षय्य तृतीयेला बेघर, निराश्रितांना मिळणार मिष्टान्न भोजन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

उत्तर कसब्यातील श्रीमंत मानाचा कसबा गणपतीला अक्षय्य तृतीयाच्या पार्श्वभूमीवर २ हजार १०० आंब्यांची आरास करण्यात आली आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी त्याचा रस करुन निराधार, बेघर, अनाथाश्रम, झोपडपट्टीतील नागरिकांना आमरस, पोळी, भाजी, भात असा बेत करुन मिष्टान्न भोजन देण्यात येणार आहे.

गणेश भक्तांनी सजावटीसाठी स्वयंस्फूर्तीने आंबे आणून दिले आहेत. शिवाय आंब्याचे होलसेल व्यापारी बसवराज चकाई यांनी रत्नागिरीवरुन आंबे मागवून खास सजावटीसाठी दिले आहेत. दरवर्षी अक्षय्य तृतीयेला आंब्याची आरास करण्यात येत असून, आरास उतरविल्यानंतर रस करुन गरिबांना महाप्रसादाचा घास भरविण्यात येतो. गत सहा वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यात ५६ भोग, मोगरा, शहाळ सजावट, मोदक सजावट अशाप्रकारे विविध प्रकारच्या सजावटी श्रीमंत मानाच्या कसबा गणपतीला करण्यात येत आहे. मंदिर समिती अक्षय्य तृतीयेच्या दिवशी स्वयंपाक बनवून निराधारांना पोहच करण्यासाठी रॉबीन हुड आर्मी, लोकमंगल अन्नपूर्णा योजनेसह अन्य अन्नपूर्णा योजना, जयहिंद फुट बँक, आस्था रोटी बँक यांच्यामार्फत अनाथाश्रम, मठ, मंदिर, रस्ते, झोपडपट्टी येथील बेघर, निराधारांना आमरसचा घास भरविण्यात येणार आहे. यासाठी मंदिर समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. आंब्याची आरास संदीप जोशी, योगीराज भोगडे, रवी भोगडे, पुष्कराज म्हेत्री, सागर मुस्तारे यांच्यासह मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

> गत सहा वर्षांपासून आंब्याची आरास करण्यात येत आहे. महागाईमुणे गरीब आणि निराधारांना हापूस आंब्याची चव चाखता येत नाही. यामुळे श्रीमंत मानाच्या कसबा गणपती मंडळातर्फे आम रस, पोळी, भात, भाजी असा मेन्यू असलेले जेवण अक्षय्य तृतीयेच्या दिवशी देण्यात येत आहे.
>
> **-शशिकांत बिराजदार, उत्सव अध्यक्ष,**
> **श्रीमंत मानाचा कसबा गणपती**

ज्युनियर कमांडो कॅम्पमध्ये विनायक गायकवाड प्रथम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे-

ओकिनावा ट्रॅडिशनल कराटे अकॅडमी इंडियाच्या २४व्या ज्युनियर कमांडो ट्रेनिंग कॅम्पमध्ये विनायक नीलम गायकवाड याने उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून प्रथम, सुजीत परमेश्वर बिराजदार याने द्वितीय तर प्रतिक्षा बाबू सुनकारे हिने तृतीय क्रमांकांची ट्रॉफी पटकाविली.

कर्णिक नगर व पद्मा नगर येथे झालेल्या या कॅम्पचा समारोप पोलीस उपनिरीक्षक प्रियवंदा जाधब यांच्या हस्ते झाला. यावेळी ओंकार साखरे, सुनाक्षी माळी यांनी प्रशिक्षणाबाबत मनोगत व्यक्त केले. दररोज सलग १२ तास चालणाऱ्या या शिबिरात कराटे,ज्यूदो, सेल्फ डिफेन्स, जिम्नॅस्टिक, योगासने, ध्यान-प्राणायाम, लाठीकाठी, नानचाकू, विविध अडथळा पार करणे, परेड, नेमबाजी, रोप व रॉक क्लायम्बिंग, रिव्हर क्रॉसिंग, बौद्धिके आदी प्रकारचे शोर्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यांना मुख्य प्रशिक्षिका व आंतरराष्ट्रीय पंच शिहान अनुराधा थोरात यांचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

मतदार, आम्ही लोकशाहीचे हक्कदार

कमल क्लिनिकचे डॉ.सतिश, डॉ. लता बुरांडे


गोविंदराव देशपांडे परिवार.

अग्निहोत्री परिवार.

रिजवान शेख

इलाही जमादार

श्री. व सौ. भिमगोंडा परिवार.

दत्ता भोसले व परिवार.

सुनील रिक्के परिवार.

आयुब नल्लामंदू

सुमित्रा व शरणप्पा शाबादे.

आबिद शेख परिवार

राहुल कोल्हटकर

मंजू सिंग, हेमंत सिंग, सुमंतसिंग रजपूत, आदित्यनगर.

श्री. व सौ. कामतकर परिवार.

राजेंद्र व राजश्री भोसले.

विश्वभूषण शिंदे व परिवार.

चलवादी परिवाराने बजावला मतदानाचा हक्क.

दोशी परिवार.

हुमा परिवाराने मंगळवारी मतदानाचा हक्क बजावला.

दवाखान्यात जाण्याअगोदर विनाशुल्क सल्ला घ्या

जिजामाता कृषी भूषण पुरस्कार विजेत्या सुजाता गाट

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.८-

शतायुषी परिवार गेल्या ८ वर्षापासून थायरॉईड, वजन कमी करणे, कॅन्सर व लखवा आदी असाध्य रोगावर काम करत असून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर यश मिळविले आहे. त्यासाठी दवाखान्यात जाण्याअगोदर शतायुषी परिवाराशी विनाशुल्क ऑनलाईन सल्ला घ्या, असे आवाहन कोल्हापूरच्या जिजामाता कृषी भूषण पुरस्कार विजेत्या सुजाता गाट बोलत होत्या.

शतायुषी परिवारातर्फे ऑफिसर्स क्लबच्या हॉलमध्ये चर्चासत्रात मार्गर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी विजय शेटे, डॉ. प्रसाद पाटील यांनीही मार्गदर्शन केले. येथील पद्मजा पाटील, डॉ. अजित माणिकशेटे, मंगल पांढरे व स्वरुपा कोठारी यांनी आपण दवाखान्यात न जाता आरोग्याची कशी काळजी घेतली याचे अनुभव कथन केले.

आरोग्याची काळजीसाठी विनाशुल्क सल्ला, योग व व्यायाम यासाठी येथील वेलनेसच्या संचालिका स्वरुपा कोठारी (मो. ७२७६१४७०२५) यांच्याशी संपर्क साधावा.

जागतिक परिचारिका दिनानिमित्त

५० परिचारिकांचा होणार शनिवारी सन्मान

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.८ मे-

इंडियन मेडिकल असोसिएशन सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक परिचारिका दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, खासगी दवाखाने, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियातील ५० परिचारिकांचा सन्मान सोहळा शनिवार दि. ११ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत डफरीन चौक येथील आय. एम.ए. हॉलमध्ये आयोजित केला आहे.

सकाळी ९ ते ११ या वेळेत परिचारिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत खुर्ची, लिंबूचमचा, प्रश्नमंजूषा, सापशिडी आशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते १२ या वेळेत स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक भेट वस्तू, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन तर उपस्थित परिचारिकांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला जाईल. सोलापूर महानगरपालिका प्रजनन व माता बालसंगोपन अधिकारी डॉ. वैशाली शिरशेट्टी या प्रमुख अतिथी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर हे असणार आहेत. अशी माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. किरण सारडा व फॅमिली प्लॅनिंगचे चेअरपर्सन डॉ. एन.बी. तेली यांनी दिली.

कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. प्रदीप कोठाडिया, डॉ.निशिकांत मस्के, डॉ. मधुरा बुरटे, डॉ. सुशील मर्दा, डॉ. आयेशा रंगरेज, सपना चिट्टे, डॉ. राजीव प्रधान, डॉ. विजया महाजन, सुगतरत्न गायकवाड यांनी केले.

नानजकर हॉस्पिटल येथे व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्ती केंद्र सुरू

तभा वृत्तसेवा,
सोलापूर,दि.८ मे-

नानजकर हॉस्पिटल येथे व्यसनमुक्ती व व मधुमेह मुक्ती केंद्र सुरु करण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. कल्पना नानजकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

न्यूट्रीस्टार हेल्थ कंपनी प्रायव्हेट लिमिटेड कोल्हापूर व नानजकर हॉस्पिटल यांच्या वतीने हे केंद्र सुरु करण्यात आले आहे. व्यसन ही माणसाला लागलेली कीड आहे आणि समाजामध्ये अनेक व्यक्तींचे संसार आणि शरीरातील किडनी सारखे अवयव या व्यसनामुळे निकामी झाल्याचे आपल्यास बघावयास मिळते. मधुमेहामुळे अनेक व्याधीग्रस्त झाले आहेत. या दोन्हीसाठी औषधे या केंद्रात उपलब्ध आहेत. आवश्यक ते मार्गदर्शन डॉक्टरांकडून करण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेस प्रदीप कुंभार, देव जाधव, संदीप कुंभार, अजित सरनाईक आदी उपस्थित होते.

बार असोसिएशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी स्वीकारला पदभार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर,दि.८ मे-

सोलापूर बार असोसिएशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी बार असोसिएशनचे मावळते अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड यांच्याकडून पदभार स्विकारला.

सोलापूर बार असोसिएशनची सर्वसाधारण सभा मावळते अध्यक्ष ॲड. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेस बार असोसिएशनचे बहुतांश सिनिअर आणि ज्युनिअर वकील बंधू भगिनी व मान्यवर ज्येष्ठ विधीज्ञ उपस्थित होते. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आला. आणि सन २०२४-२५ सालाकरिता निवडून आलेल्या नविन पदाधिकाऱ्यांचे निकाल वाचून दाखवण्यात आले. त्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. अमित विश्वनाथ आळंगे, उपाध्यक्ष ॲड. व्ही. पी. शिंदे, सेक्रेटरी ॲड. मनोज पामूल, सहसेक्रेटरी ॲड.

निदा सैफन आणि खजिनदार ॲड. विनयकुमार कटारे यांना अनुक्रमे मावळते अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड, उपाध्यक्ष ॲड. असीम बांगी, सेक्रेटरी ॲड. करण भोसले, सहसेक्रेटरी ॲड.अनिता रणशृंगारे आणि खजिनदार ॲड.अविनाश काळे यांनी पदभार सोपवून निवड पत्र दिले. तसेच बार असोसिएशन व उपस्थित सिनिअर व ज्युनिअर वकिलांच्यावतीने नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सोलापूर प्रमुख जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदिपासिंह रजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्षा ॲड.एम.बी.जोशी चिंचोळकर, माजी अध्यक्ष ॲड. सी.एम.सावंत, ज्येष्ठ विधीज्ञ बापूसाहेब देशमुख, ॲड.संतोष न्हावकर यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यानी सर्व मतदार सभासदांचे आभार मानून आगामी वर्षभर विविध कायदेविषयक मार्गदर्शन व्याख्यान, सेमिनार, वर्कशॉप आयोजन, सांस्कृतिक व क्रीडा महोत्सव आयोजित करण्याबाबत मनोदय व्यक्त केला. खजिनदार ॲड. विनयकुमार कटारे यांनी आभार मानले.

गुरुवार, ९ मे २०२४
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

ज्ञानामृत आनंदलहरी- ७६४

अगा देहींचा अग्नि जरी गेला । तरी देह नव्हे चिखलु ओला ।
वायां आयुष्य वेळु आपुला । आंधारां गिंवसी ।।

ज्ञानयोगी, ध्यानयोगी देहाबद्दल आसक्त नसतात. जीवनसमयी तसेच मृत्यूसमयी देहाच्या सुख, दु:खात हे योगी अडकत नाहीत. योगी लोकांचा मृत्यू सुध्दा अत्यंत चांगल्या पध्दतीने होत असतो. त्यांच्या देहात चेतना कायम असते. त्यांचा जठराग्नी त्यांना साथ देतो म्हणून त्यांची ज्ञानशक्ती कायम असते. वायाने किंवा पाण्याने दिव्याचा प्रकाश जर नाहीसा झाला तर शाबूत असलेली दृष्टी अंधारात पाहू शकत नाही. त्याप्रमाणे मृत्युसमयी विषयवाताने देह जेव्हा आंत बाहेर कामदोषाला प्राप्त होतो. तेव्हा देहातील जठराग्नीचा दिवा मालवतो. जेव्हा जठराग्नी साथ देत नाही, तेव्हा बुध्दी असूनही काम करीत नाही. देहात जठराग्नीवाचून ज्ञानशक्तीला आधार राहत नाही. देहातील जठराग्नी नष्ट झाला तर काय होते हे सांगतांना भगवंत म्हणाले,

अगा देहींचा अग्नि जरी गेला । तरी देह नव्हे चिखलु ओला ।
वायां आयुष्य वेळु आपुला । आंधारां गिंवसी ।।

अर्थात, देहातील अग्नी जर नष्ट झाला तर हा देह केवळ ओला चिखल असतो. ओल्या चिखलाचा देह म्हणजे आयुष्य आपला वेळ व्यर्थ अंधारात शोधत राहण्याची अवस्था होय. अशा माणसाला मागील कांहीही आठवत नाही. देह आणि काम यांच्या चिखलात ज्ञानशक्ती नष्ट होते. प्रत्येक माणसाला मृत्यू सुध्दा चांगला यावा असे वाटत असते. परावलंबी न होता किंवा वाईट प्रकारे मृत्यू न येता चालता-बोलता, हिंडता-फिरता, मृत्यू यावा असे प्रत्येकाला वाटते. पण मृत्यू हा मानवाच्या हातात नसतो. कोणाला कसा मृत्यू येईल हे सांगता येत नाही. मृत्यू जर मानवाच्या हातात असता तर माणसाने तो पत्करलाच नसता. लोकसंख्या एवढी वाढली असती की, कोणाला हिंडायला-फिरायला सुध्दा जागा शिल्लक राहिली नसती. खरे म्हणजे मृत्यू हे एक मानवाला मिळालेले वरदानच आहे. असो, बहुतांश ज्ञानयोगी, ध्यानयोगी यांच्या देहाच्या आंत जठराग्नीचा आणि बुध्दीच्या आत ज्ञानाचा प्रकाश असतो. बाहेर शुक्लपक्ष आणि दिवस असतो. तसेच उत्तरायणातील सहा महिण्यापैकी कोणताही एखादा महिना असतो. प्रत्येकाला असा मृत्यू येईलच असे सांगता येत नाही. मानवाच्या हातून चांगली कर्म घडत गेली तर मृत्यू वाईट येईलच कशाला. मृत्यू चांगला येईल की वाईट याचा विचार न करता सुखाने कसे मरता येईल अशी मानसिकता होण्यासारखे चांगले वागले तरी पुरेसे आहे. आयुष्यभर जे केले त्याचे फळ भोगावे लागते. म्हणून पावला-पावलाला माणसाने विचार करावा की, आपल्या हातून सत्तेचा, संपत्तीचा, अधिकाराचा दुरुपयोग होणार नाही. हा देह सोडण्याचा जो उत्तम काळ वर चर्चिला गेला, त्यालाच अचिर्रादी मार्ग किंवा देवयान मार्ग असे म्हणतात. माणसाच्या हातून घडणाऱ्या सत्कर्मावर हे सर्व अवलंबून असते. आपल्या हातून कोणाचे नुकसान होत नसेल, माणूस कोणावर अन्याय करीत नसेल, कोणाला अकारण त्रास देत नसेल, कोणाला लुबाडत, फसवित नसेल तर त्याला वाईट मृत्यू येण्याचे कारण नाही. आपण ज्ञानदेवांच्या ओवींच्या सहवासात राहून चांगले वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याने मृत्यूचे भय मानण्याचे कारण नाही. सत्कर्माची फळे चांगली मिळत असतात. त्यामुळे सत्कर्मी माणसाला मृत्यूची भीती बाळगण्याचे कारण नाही.

जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

सुप्रभात

आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. ९ मे २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - चैत्र
शु. प्रतिपदा (०६.२१)
ऋतु - वसंत
नक्षत्र- कृत्तिका (११.५५)
योग - शोभन (१४.४०)
करण - बालव (१७.१६)
सुर्योदय - ०६.०९
सूर्यास्त - १९.०२
दिनविशेष-

शिवजयंती (परंपरेने), कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यदिन, भवानी यात्रा, पाटण, सिद्धनाथ यात्रा, सांगली

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

राशीभविष्य

मेष : कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल. मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल.

वृषभ : लोभ - लालचेपासून दूर रहा. अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे-घेण्यापासून सावधानता बाळगा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख-शांती मिळेल.

मिथुन: आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल.

कर्क: वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल. अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल.

सिंह : प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल. व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल.

कन्या : कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे.

तुळ : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

वृश्चिक : आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील. अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा,

धनु : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

मकर : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

कुंभ : धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा.मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

मीन: व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल.

भोसे येथे १३ लाखांची चोरी

रोख रकमेसह सोन्याचे दागिने लंपास

तभा वृत्तसेवा,
करकंब, दि.८ मे-

भोसे ता.पंढरपूर येथे दि.७ मे रोजी सकाळी १०च्या सुमारास सर्व सदस्य मतदान करण्यासाठी कुलूप लावून गेले होते. यावेळी स्वप्निल सुनील तळेकर, त्यांची आई, वडील, पत्नी, चुलती, भावजई असे मतदान करून दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घरी आल्यानंतर घराच्या दरवाजाचा कोंयडा तुटलेला व कुलूप खाली पडलेले दिसले. त्यानंतर घराचा दरवाजा उघडून आत पाहिले असता हॉलमध्ये सोन्याच्या दागिन्यांचे रिकामे बॉक्स व डबे अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले.कुटुंबातील सदस्यांनी बेडरूममध्ये बघितले असता यावेळी लाकडी फर्निचरचे कपाट उघडे असलेले व टीव्हीच्या खालील बाजूस असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीसीर त्या ठिकाणी नसल्याचे दिसून आले.

कपाटामधील ड्रावरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने, मंगल कार्यालयातील लग्नाचे हॉलचे आलेले भाडे रोख रक्कम हे सुद्धा या ठिकाणी मिळून आले नाही.१ लाख रुपये रोख, १८८९६ रुपये किमतीचे ३.५ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले, ६१३९५ रुपये किमतीचे १२.५ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण, १ लाख २३ हजार ७४७ रुपये किमतीचा एक २३.१२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गोट, ३लाख ११ हजार ८३१ रुपये किमतीचा ५८.१५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, ३१ हजार ९६३ रुपये किमतीची ५.७७ ग्राम सोन्याची अंगठी, १ लाख ९२हजार ३६९ रुपये किमतीची ३४.१६ ग्रॅम वजनाची सोन्याची मोहन माळ, १ लाख ३ हजार २३ रुपये किमतीची ७७.७६ ग्राम वजनाची सोन्याची मोहन माळ, ८९ हजार ५६३ रुपये किमतीचे १५.९८ ग्राम वजनाच्या सोन्याच्या कानातील झुमका, ५४ हजार ५०८ रुपये किमतीचे एक १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, ७५ हजार रुपये किमतीची ३० ग्राम वजनाची सोन्याचा लक्ष्मी हार, १ लाख रुपये किमतीची ४०ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, ७ हजार रुपये किमतीचे ६ पैंजण जोड, वाळे, लहान मुलांचे कंबर साखळी जोड, असे चांदीचे दागिने, ५ हजार ५५९ रुपये किमतीचा सीसीटीव्हीचा डीव्हीआर असा एकूण १२ लाख ७२ हजार १४५ रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केल्याची फिर्याद स्वप्निल सुनील तळेकर यांचेकडून करकंब पोलिसात दाखल करण्यात आली आहे.

यावेळी घटनास्थळी श्वानपथक मागवण्यात आले होते. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून या चोरीचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर हे करीत आहेत.

करकंब येथे ६४ टक्के मतदान

तभा वृत्तसेवा,
करकंब, दि.८ मे-

पंढरपूर तालुक्यातील माढा विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्येच्यादृष्टीने सर्वात मोठ्या असलेल्या करकंब मतदारसंघात लोकसभेसाठी १६ मतदान केंद्रांवर १४ हजार ३९३ एवढे मतदान आहे. सकाळी मतदारांनी तुरळक हजेरी लावल्याने ११ वाजेपर्यंत केवळ १५.८८ टक्के एव्हढेच मतदान झाले होते.दिवसभर उन्हाचा पारा वाढलेला असल्याने परिणामी अनेक मतदारांनी उन्हाच्या तिव्रतेमुळे भर दुपारी मतदान करणे टाळले.दुपारनंतर मात्र मतदारांनी मतदान केंद्रावर मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळाले.अनेक केंद्रांवर मतदारांच्या मतदानासाठी रांगा लागल्या होत्या.माढा लोकसभेसाठी करकंब गावामध्ये एकूण १४ हजार ३९३ मतांपैकी ९ हजार २४५ एवढे मतदान झाले.झालेल्या मतदानाची एकूण टक्केवारी ६४.६३ टक्के एवढी झाली.

माळशिरस नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी वावरे

तभा वृत्तसेवा,
सदाशिवनगर, दि.८ मे-

माळशिरस नगरपंचायतीच्या नूतन नगराध्यक्षपदी ताई सचिन वावरे यांची आज बिनविरोध निवड झाली आहे निवडीनंतर त्यांच्या समर्थकांनी नगरपंचायत कार्यालयासमोर जल्लोष साजरा केला.

नगराध्यक्ष शिवाजीराव देशमुख यांनी ठरल्याप्रमाणे आपल्या नगराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता नगराध्यक्ष पद रिक्त झाल्याने नगर अध्यक्षपदाची निवडणूक जाहीर झाली होती या पदासाठी ताई सचिन वावरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा प्रशासन अधिकारी नगर विकास विभाग सोलापूर विना पवार यांनी आज नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्ष निवडीसाठी विशेष सभा बोलवली होती यावेळी या पदासाठी ताई सचिन वावरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध नगराध्यक्षपदी निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी विना पवार यांनी घोषित केले यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नगरपंचायतीचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी काम पाहिले

या निवडीच्यावेळी माजी सरपंच व पंचायत समिती सदस्य तुकाराम देशमुख माजी नगराध्यक्ष डॉ.आप्पासाहेब देशमुख,शिवाजीराव देशमुख, सचिन वावरे,महादेव देशमुख,पांडुरंग वाघमोडे, अशोक देशमुख,आबासाहेब धाईंजे, सर्जेराव जानकर, रेश्मा टेळे, माजी उपनगराध्यक्ष पूनम वळकुंदे नगरसेवक कैलास वामन, रघुनाथ चव्हाण,कोमल जानकर,पुष्पा कोळेकर,माजी पंचायत समिती सदस्य अनिल सावंत,सुरेश टेळे,अजिनाथ वळकुदे, रणजीत ओव्हाळ, महेश वावरे आदी उपस्थित होते. ताई वावरे यांची नगराध्यक्षपदी निवड होताच त्यांच्या समर्थकांनी नगरपंचायत कार्यालयापासून त्यांची हनुमान मंदिरापर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढली यावेळी गुलालाची मुक्त उधळण करण्यात आली.

श्री संत गोरोबाकाका, स्वामी समर्थांची पुण्यतिथी साजरी

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. ८ मे-

अकलूज व परिसरात श्री अक्कलकोट स्वामी समर्थ व संत श्री गोरोबाकाका यांची पुण्यतिथी विविध धार्मिक कार्यक्रमाने उत्साहात साजरी करण्यात आली.

शंकरनगर येथील कुंभार शॉपिंग सेंटर येथे कुंभार समाजाच्या वतीने श्री संत गोरोबाकाका महाराज आणि श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिषेक व पूजा चंद्रकांत जालिंदर कुंभार व उमा चंद्रकांत कुंभार यांनी केली. त्यानंतर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी चंद्रकांत कुंभार, रामा कुंभार, संदीप कुंभार, ओंकार कुंभार, दिलीप कुंभार, विक्रम कुंभार, गणेश कुंभार, सूरज कुंभार, सुभाष कुंभार, सुनील महाडिक, संजय हावळे, रमण कुंभार, कुंभार समाजाचे अध्यक्ष अमित कुंभार, तुकाराम भोईकर, सहकार महर्षींच्या माजी संचालिका शामा कुंभार, ग्रामपंचायत सदस्या भारती कुंभार, महानंदा कुंभार, अपूर्वा कुंभार उपस्थित होते.

प्राणीमित्र शहा निसर्गोपचार केंद्राचे उत्साहात भूमिपूजन

तभा वृत्तसेवा,
मंद्रुप, दि. ८ मे-

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडकबाळ येथे प्राणीमात्र विलासभाई शहा निसर्गोपचार केंद्राचे भूमिपूजन डॉ. अर्चना चांदणे यांच्या हस्ते ज्येष्ठ गांधीवादी प्राणमित्र विलासभाई शहा यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी पुष्पलता पाटील महाराज, वैशाली कुलकर्णी यांच्या दिव्य सानिध्यात व प्राजक चांदणे, अतुल कोटा, बावळे, जाधव, रत्नपारखी, दर्शन कोचर व शिवांगी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी अनिता बिराजदार, सोनाली जळकोटे, महानंदा बिराजदार, मुमताज शेख, रोहिणी होनराव, मंगल पांगळे, इंदुमती पुजारी, गजराबाई पुजारी, अश्विनी बिराजदार, राजामती बिराजदार, तन्वी बिराजदार, द्राक्षणी बिराजदार, मुक्ताबाई लिगाडे, कन्नवा वाघमारे आदी गोभक्तांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी नूतन विकास शहा (सोलापूर), निरूपमा विशाल शहा (माढा), मीना विवेक शहा (पुणे) या तिन्ही प्राणीमित्र विलास शहा यांच्या स्नुषांनी निसर्गोपचार केंद्रास रक्कम रुपये एक लाख रुपये दिल्याबद्दल उपस्थितानी गौरव उद्गार काढले. सूत्रसंचालन रावसाहेब राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुद्रप्पा बिराजदार यांनी केले. अतिथीचे स्वागत सत्कार संस्थेचे अध्यक्ष उमा बिराजदार व सचिव कविता राठोड यांनी केले. अमर निंबाळ, निमेश कोचर, शिवराज कुमारमेश बिराजदार, युवराज बिराजदार, स्वरूप बिराजदार, सिद्धप्पा धोंडप्पा बिराजदार, अप्पाराव बिराजदार, अनिल राठोड, महादेव देसाई यांच्यासह पदाधिकारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

कुर्डूवाडीतील आदर्श पब्लिक स्कूलचे एटीएस परीक्षेत यश

ADARSH PUBLIC SCHOOL
KURDUWA

तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी, दि. ८ मे-

एटीएस परिक्षेत कुर्डूवाडीच्या आदर्श पब्लिक स्कूलच्या १० विद्यार्थी राज्यात, जिल्ह्यात ५१ तर ८६ विद्यार्थिनी केंद्रात उत्तुंग यश संपादन केले आहे.

राज्यस्तरीय गुणवंत यादीत अथर्व नवले, अर्णव राऊत, दिव्यांका तोगे, प्रज्वल ढेंबरे, आरोही अनंत कळस, श्रवण जवंजाळ, भार्गवी चोपडे, काव्या देशमुख, समर्थ शेजुळ, राहीश शिरताट यांनी स्थान मिळवले. जिल्हास्तरीय गुणवंत यादीत मनत्वी शिंदे, शौर्य सरवदे, सत्यजित पाटील, श्रीशा कदम, आर्यन नवले, अक्षरा इंगळे, देवांश कसबे, शिवेंद्र खैरे, श्रद्धा भोसले, सानवी शिंदे, आयुष जगदाळे, शिवराज काळे, मंथन शिरगिरे, मानस उंडे, रुद्र सोनवणे, विनायक गोसावी, मंजिरी शिरसट, ईश्वरी लुंगसे, रुद्र बागल, स्वानंदी क्षीरसागर, कार्तिक डोंगरे, आरोही काळे, सार्थक जाधव, आर्या चव्हाण, शिवराज बागल, शिवानी शिंद, स्मरणिका पवार, कृष्णा मुसळे, शौर्य केमधारणे, वेदिका करळे, दुर्वा घाडगे, आरोही सोमनाथ कांबळे, शिंदे स्वरा, जारा काझी, श्रेया लोंढे, राजवीर गडेकर, अनुश्री साळुंखे, वृंदा सोनवणे, सुहर्ष शिंदे, देवांश छापेकर, आर्या कन्हेर, अन्वेषा पाटील, मोईन तांबोळी, अर्वी कन्हेरे, शाक्य माने, जयदीप रणदिवे, श्रवण मस्के. केंद्रस्तरीय दिव्यांश खोत, स्मित कांबळे, शिवराज मुटकुळे, पुष्कराज दास, आरव बागल, दयावान पाटील, आरोही जाधव, वेदिका माळी, पार्थ शेंडे, प्रगती बस्के, समृद्धी शिंदे, श्रेया मोरे, श्रेया चांदणे, रियांश शेळके, शिवराज कचरे, नियती जाधव, प्रणव शिंदे, पार्थ वाघमारे, प्रगती सातव, आराध्या काळे, आकांक्षा इंगळे, संस्कृती कुंभार, विराज गवळी, अनुराग गायकवाड, गौरी चव्हाण, सान्वी जगताप, अर्णव वाघ, अथर्व हराळे, शिवम नवले, अथर्व कदम, नेहा शेलार, आर्या क्षीरसागर, श्रीवर्धन रणदिवे, अर्शिया इनामदार, शांभवी शिंदे, संस्कार गवळी, श्रवण कांबळे, वेदांत जगताप, आराध्या कोथमिरे, संस्कृती शिंदे, सानवी तांबे, हर्षवर्धन गिड्डे, रेवती मिरगणे, आरोही संजय कांबळे, वेदांश्री जाधव, रिया सोलंकर, आराध्या बागल, वैष्णवी देवकते, सृष्टी साळुंखे, युवराज शिंदे, शिवांश क्षीरसागर, समीक्षा राऊत, अर्णव खांडवीकर, शौर्य माडेकर, शिवरत्न गोरे, प्रथमेश भोसले, समृद्धी मोडेकर, आर्या जगताप, सार्थक गायकवाड, श्री जगताप, राजनंदिनी गवळी, आरोही कोकाटे, कदम सार्थक, विराज ढगे, मंथन कांबळे, ईश्वरी डोंगरे, शर्वरी माळवतकर, श्रवण मोरे, गौरी भोंग, ईश्वरी शेळके, श्रुती चौधरी, कार्तिकी क्षीरसागर, सीम ताकभाते, श्रेयस परबत, चैतन्य पाटील, कृष्णा भोंग, रुद्र प्रताप महिंगडे, शिवराज खंडागळे, पृथ्वी शिंदे, पार्थ क्षीरसागर यांनी स्थान मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांना आहेर, गाडे, धुमाळ, साळव, बारबोले, कांबळ, बोराडे, डोळसकर, बारबोले, कोरके मॅडम, चोपडे, शेंडगे, विद्या गज, ठवरे सर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, मुख्याध्यापिका सय्यद, प्राथमिक विभाग प्रमुख मुलाणी यांनी अभिनंदन केले.

इंदापूर तालुक्यात ६२ टक्के मतदान

तभा वृत्तसेवा,
इंदापूर, दि.८ मे-

बारामती लोकसभा मतदार संघाअंतर्गत इंदापूर विधानसभा मतदार संघात सायंकाळी सहा वाजे पर्यंत २०००३६०० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला ६१.८२ टक्के मतदान झाले तर इंदापूर शहरात ६५ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

विशेष म्हणजे गोतंडी मतदान केंद्रात दुपारी चार नंतर मतदारांनी रांगा लावल्याने रात्री आठ वाजेपर्यंत येथे मतदान सुरू होते. निवडणूक निर्णय अधिकारी कल्याण पांढरे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शांततेत मतदान पार पडले. इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे व सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, जिजाऊ महिला बचत गट फेडरेशनच्या अध्यक्षा सौ. भाग्यश्री हर्षवर्धन पाटील, भाजप युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे, इंदापूर तालुका भाजपा युवा मोर्चा कोअर कमिटी अध्यक्ष राजवर्धन पाटील यांनी बावडा, आमदार दत्तात्रय भरणे, सारिका भरणे, युवा नेते श्रीराज भरणे यांनी भरणेवाडी, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे यांनी सराटी, सोनाई दूध संघाचे अध्यक्ष दशरथ माने, कार्यकारी संचालक विष्णूकुमार माने,संचालक हरीकाका माने, प्रवीण माने, किशोर माने, अतुल माने यांनी रुई, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, सौ. अनुराधा गारटकर, मावळत्या नगराध्यक्षा अंकिता शहा, मुकुंदशेठ शहा, माजी उपनगराध्यक्ष भरतशेठ शहा, सौ. वैशाली शहा, अंगद मुकुंद शहा यांनी इंदापूर येथे मतदान केले. उन्हाची दाहकता असल्याने दुपारी एक वाजेपर्यंत संथगतीने मतदान सुरू होते. यावेळी ३२३५४१ मतदारांपैकी ९७ हजार मतदारांनी मतदान केले. यावेळी ३१ टक्के मतदान झाले होते. दुपारी चार वाजेपर्यंत ४० टक्के तर ५ वाजेपर्यंत ५३ टक्के मतदान झाले होते. साहस वाजेपर्यंत सुमारे ६२ टक्के मतदान झाले होते. विद्यमान खासदार सुप्रिया सुळे, आमदार दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य व बांधकाम सभापती प्रवीण माने यांनी मतदान केंद्रास भेटी देवून मतदान वाढीसाठी प्रयत्न केले. या निवडणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

सांगोल्यात ६४ टक्के मतदान

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.८ मे-

सांगोला विधानसभा मतदारसंघात मंगळवार दि.७ मे रोजी ६४.०३ टक्के मतदान झाल्याची माहिती अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांनी दिली. यामध्ये मतदार ३,१२,४९८ पैकी २००१०१ मतदारांनी हक्क बजावला. पुरुष मतदार १,६३,७१३ पैकी १,०७८९३ तर स्त्री मतदार १,४८,७८३ पैकी ९२,२०८ असे एकूण ६४.०३ टक्के मतदारांनी हक्क बजावला असल्याची माहिती तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

संग्रामनगर येथे अभिषेक, महापूजा

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. ८ मे-

संग्रामनगर येथे मनोहर तुकाराम उगाडे यांच्याकडे श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या १४६ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळी अभिषेक व महापूजा भक्ती कम्प्युटर टाईपरायटिंग इन्स्टिट्यूटचे गजानन जवंजाळ व अश्विनी जवंजाळ यांच्या हस्ते करण्यात आली. महापूजेनंतर माळीनगर येथील श्री ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळाची भजनसेवा झाली. त्यानंतर जप व पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर आरती होऊन महाप्रसाद देण्यात आला. सायंकाळी यशवंतनगर येथील ओंकार महिला भजनी मंडळांची भजन सेवा झाली. मनोहर उगाडे हे गत अनेक वर्षांपासून स्वामी समर्थांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम आयोजित करत असतात. यामध्ये महेश उगाडे व सुप्रिया उगाडे यांच्यासह परिसरातील अनेक भक्त आपले योगदान देत असतात.

संक्षिप्त वृत्त...

वैराग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष नीरंजन भूमकर यांनी मतदान केल्यानंतर.

दै. तरुण भारतचे सांगोला प्रतिनिधी दीपक भाकरे.

डोणज (ता. मंगळवेढा) येथे मतदान केल्यानंतर प्रा. डॉ. धानेश लिगाडे, निंगण्णा लिगाडे, मल्लम्मा लिगाडे, प्रीती लिगाडे, वर्षा लिगाडे.

आदर्श महिला मतदान केंद्र

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावल्यानंतर माढ्यातील कै. गणपतराव साठे प्रशालेतील शिक्षिका.

पंढरपुरात वीररत्न शिवबा काशीद, श्री संत शिरोमणी सेना महाराजांची जयंती साजरी

पंढरपूर, दि. ८ मे-

वीररत्न शिवबा काशीद यांची जयंती पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे व श्री संत शिरोमणी सेना महाराज मठामध्ये सेना महाराजांच्या जयंतीनिमित्त फुले टाकण्याचा कार्यक्रम भजन, कीर्तन कार्यक्रमासह महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी आ. समाधान आवताडे, प्रणव परिचारक, मनसे नेते दिलीप धोत्रे, रोहन परिचारक, मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष साईनाथ शिंदे, उपाध्यक्ष धनंजय गवळी, कार्याध्यक्ष अनिल शेटे, खजिनदार विठ्ठल भोसले, सहखजिनदार राकेश देवकर, जितेंद्र भोसले, बाळासाहेब देवकर, तुकाराम चव्हाण उपस्थित होते.

विस्तार अधिकाऱ्यानी केला आनंद घाडगे यांचा सत्कार

बार्शी, दि. ८ मे-

पीटी परीक्षा व संकलित चाचणी दोनच्या पडताळणीसाठी बार्शी तालुका पंचायत समितिच्या टीमने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) शाळेस भेट दिली. यावेळी त्यांनी पीटीच्या तिसरी ते सातवीच्या व संकलित चाचणी दोनच्या पहिली ते सातवीच्या पेपरची पडताळणी केली. सर्व पेपर शिक्षकांनी नियमानुसार तपासून ठेवले होते. त्याची मुख्याध्यापकांनी ही पडताळणी केली होती. सर्व रेकॉर्ड उत्तम होते. यावेळी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) शाळेचे शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षक आनंद घाडगे यांचे सर्वाधिक विद्यार्थी पात्र झाले. यामुळे त्यांचा सत्कार बार्शी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी जरीचंद चौधरी, विस्तार अधिकारी बालाजी नाटके, केंद्रप्रमुख छगन गवारे यांनी केला. यावेळी मुख्याध्यापक अनिल काळे यांचाही त्यांनी सत्कार केला. शाळेच्यावतीनेही मुख्याध्यापक अनिल काळे यांनी जरीचंद चौधरी, बालाजी नाटके, छगन गवारे यांचा सत्कार केला. यावेळी शाळेतील शिक्षक आप्पासाहेब पिंगळे, रामचंद्र बरचे, प्रभाकर काटे, हरिभाऊ दळवी, सविता जाधव, सुवर्णगौरी शिंदे, मीरा गरड, दीपाली गोरे उपस्थित होते.

कोळेगांव येथे शुक्रवारपासून श्री बाळोबा यात्रेस प्रारंभ

पिलीव, दि. ८ मे-

कोळेगांव (ता. माळशिरस) येथे शुक्रवार, दि.१० मेपासून ऐतिहासिक त्रैवार्षिक श्री बाळोबा देवाच्या यात्रेस प्रारंभ होत आहे. शुक्रवारी अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर श्री बाळोबा देव रंगाला जाणार असून गुरुवार, दि.१५ मे रोजी श्री बाळोबा देवाचा हळदी समारंभ, शुक्रवारी नैवेद्य व गजी स्पर्धा, शनिवारी श्री बाळोबा देव विसर्जन, तर मंगळवार दि. २१ मे रोजी साजीवंत करणे असे कार्यक्रम होणार आहेत. श्री बाळोबा देवाच्या यात्रेस ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

चारा, पाणी द्या अन् द्राक्षबागांची छाटणी करून घ्या

मेंढ्या जगविण्यासाठी अनोखी शक्कल; माणदेशी मेंढपाळांची पंढरीत भटकंती, द्राक्ष बागायतदारांना मदत

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. ८ मे-

सांगली जिल्ह्याचा पूर्व भाग आणि सोलापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागात दुष्काळ पाचवीलाच पुजलेला असतो. या पडलेल्या दुष्काळाने मेंढ्याना चारा, पाणी मिळेना. मग मेंढ्या जगविण्यासाठी मेंढपाळांनी ङ्कचारा पाणी द्या अन् द्राक्ष बागांची छाटणी करून घ्याङ्ख अशी अनोखी शक्कल लढविली आहे.

आटपाडी, सांगोला, जत परिसरातील अनेक मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेऊन पंढरपूर तालुक्यातील द्राक्ष मळ्यात छाटणी करताना दिसून येत आहेत. द्राक्ष बागायतदारांनी पुढच्या हंगामाची तयारी सुरू केली असून द्राक्ष छाटणीला वेग आला आहे. मेंढपाळ कोणत्याही मोबदल्याशिवाय केवळ द्राक्षेचा पाला चारण्यासाठी छाटणी करून देत आहेत. या मेंढपाळांची वर्षातून आठ महिने भटकंती असते तर फक्त पावसाळ्यात चारच महिने त्यांना हक्काच्या घराचा सहवास लाभतो. दिवाळीनंतर सुरू झालेली भटकंती जूनमध्ये पाऊस आल्यानंतरच थांबते, अशी माहिती मेंढपाळानी दिली.

शेतकऱ्यांनी शेतातील पिके काढल्यानंतर त्या जमिनीत मेंढपाळ आपल्या मेंढ्या चारण्यासाठी आणत असतात. पिके निघाल्यानंतर जनावरांना खाण्यासाठी कोणताही चारा राहत नाही. त्यामुळे मेंढपाळांना स्थलांतर केल्याशिवाय पर्याय राहात नाही. आठ, पंधरा दिवसानंतर त्यांना आपला गाव बदलावा लागतो. या काळात मेंढ्यांच्या लेंड्या व मूत्र शेतासाठी चांगले खत म्हणून कामी येत असल्याने स्थानिक शेतकरी शेतात सहारा देतात.त्यांच्यासोबत प्रत्येकाची एक घोडी व त्यावर आपल्याला खाण्यासाठी लागणारे साहित्य आणि संरक्षणासाठी प्रामाणिक कुत्रा सोबतच असतो.

सांगली, सांगोला परिसरातील मेंढपाळ दुष्काळामुळे पंढरपूर परिसरात वास्तव्यास आहेत. ढेकळाच्या रानात पाल उभारून मेंढरांबरोबर दिवस ढकलत आहेत. झोपायला भुई आणि पांघरायला आभाळ अशी त्यांची स्थिती आहे. आता तर गावाकडे पाण्याची वाणवा म्हणून सुटी लागल्याने शाळकरी मुलंही आई-वडिलांबरोबर मेंढरामागच्या फुफाट्यात जीवनाचा अर्थ शोधू लागलीत. सांगली जिल्ह्याचा पूर्व भाग आणि सोलापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागात दुष्काळ पाचवीलाच पुजलेला. या भागात मेंढपाळ वर्ग अधिक. त्यामुळे लहान जनावरे जगविण्यासाठी काही मेंढपाळ वर्ग दरवर्षी दिवाळी करून जनावरे जगविण्यासाठी गाव सोडतो. उन्हाळा संपेपर्यंत हा मेंढपाळ वर्ग पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा परिसरात येतो. वर्षानुवर्षांचे हेच गणित असते. पण गेल्यावर्षी पाऊसच पडला नाही. त्यामुळे अनेक मेंढपाळांनी गावाला वृद्ध आई-वडील, शाळकरी मुलांना सोडून मेंढरामागे भटकंती सुरू केली. पंढरपूर परिसरात ढेकळाच्या रानात पाल उभी करून पावसाळा सुरू होईपर्यंतचे दिवस मोजत आहेत. सकाळी एकदा मेंढरं वागरंबाहेर काढली की दिवसांत किती किलोमीटर चाऱ्यासाठी फिरावं लागेल, हेही त्यांना माहीत नसतं. मेंढराच्या एकेएका खांडव्यामागं दोघं-तिघं तरी राहतात. आजूबाजूला पीक असल्यानंतर मेंढरं पिकात शिरण्याचा धोका असतो. त्यामुळे सर्वांना विविध बाजूला थांबून हा-हू करत मेंढरं चारावी लागतात. सायंकाळी पालावर गेल्यावर कोणी विहिरीतून किंवा जवळपास हातपंप असेल तर पाणी आणतो. कोणी, मेंढ्या वागरत बसवतो तर कोणी तेल, मीठ भाजी आणण्यासाठी खेडेगाव जवळ करतो, अशी स्थिती. सायंकाळी मग सर्वजण एकत्र येत भाकरीचा एकेक घास तोंडात घालत उद्या कुठं मेंढर घेऊन जायचं, यावर चर्चा करतात. भाकरी खाऊन झाली की तिथंच ढेकळात काहीतरी चादर, वाकळ टाकतात आणि झोपतात. अंगावर काही घेत नाहीत. घेतलं तरी दिवसभराच्या फिरण्यानं झोप कधी लागते तेही कळत नाही. झोपायला भुई आणि पांघरायला आभाळ यातच सकाळ कधी होते, तेही समजत नाही. उठल्यानंतर मग नव्या दिवसाची नवी तयारी सुरू होते.

शाळेला सुट्टी लागल्याने मुलंही मेंढपाळासोबत

माणदेशी मेंढपाळांचं हे जीवन असलं तरी आता त्यांच्याबरोबर मुलंही गावावरुन आलीत. शाळेला उन्हाळ्याची सुटी लागलीय. पण गावाला पाणी नाही म्हणून ही मुलं वडील, नातेवाइकांच्या मागं रान तुडवू लागली आहेत. पंढरपूर परिसरातील अनेक भाग बागयती. त्यामुळे येथे मेंढरांना खाण्यासाठी चारा आहे. बाभळीचा डहाळा, मोकळी आणि पिकं काढलेल्या रानात मेंढरं चरतात. कोणाही शेतकऱ्यांच्या रानात रात्री मेंढरं बसवली जातात. एक रात्र मेंढ्या बसविण्यासाठी मेंढपाळांना २०० ते २५० रुपये किंवा दोन पायली धान्य मिळते.

-दिलीप काळे, मेंढपाळ, कटपळ, ता. सांगोला

आयआयटी-जेईई, नीट, एमएचटी-सीईटीचे धडे

सांगोला विद्यामंदिर प्रशालेचा उपक्रम

नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना फायदा

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. ८ मे-

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज व मेरीट होम, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अकरावी व बारावीसाठी आयआयटी-जेईई, नीट, एमएचटी-सीईटी व नववी, दहावीसाठी फाउंडेशन कोर्स (कोटा पॅटर्न) शुक्रवारपासून नियमित सुरुवात होत आहेत. त्या संदर्भाने सांगोला विद्यामंदिर येथे जागरूक पालक व विद्यार्थी मेळावा झाला.

यावेळी सां. ता. शि. प्र. मंडळ संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म. शं. घोंगडे, मेरीट होमचे राजन भरणे, सांगोला विद्यामंदिर प्राचार्य गंगाधर घोंगडे, उपमुख्याध्यापक लक्ष्मण विधाते, उपप्राचार्य शहिदा सय्यद, पर्यवेक्षक अजय बारबोले, पोपट केदार, कोळा विद्यामंदिर प्राचार्य लांडगे, नाझरा विद्यामंदिर प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून झाली. या मेळाव्यामध्ये सकाळ सत्रात नववी दहावी व दुपार सत्रात अकरावी, बारावीचे विद्यार्थी व पालकांना राजन भरणे यांनी विद्यार्थ्यांना फाउंडेशन महत्त्व, अनुभवी आयआयटी, एमबीबीएस, एमडी झालेले अध्यापकांचे निवासी राहून होणारे अध्यापन व सराव टेस्ट, नोटस् याप्रमाणे कोर्सची संपूर्ण माहिती दिली.

यावेळी प्राचार्य गंगाधर घोंगडे, सहशिक्षक शिवाजी चौगुले यांनी मार्गदर्शन केले. पालक नारायण माळी व बाबासाहेब इंगोले यांनी विचार मांडले. सूत्रसंचालन प्रा. महेश कोरे यांनी तर आभार शहिदा सय्यद यांनी मानले.

ग्रामीण आणि शहरी शिक्षणाच्या बाबतीत विचार केल्यास आज ग्रामीण भागातील मुलांमध्ये खूप गुणवत्ता दिसून येते. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास निश्चितपणे यशोशिखर सर करतील. यासाठीच सांगोला विद्यामंदिर व मेरीट होमच्या संयुक्त विद्यमाने ही संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे. सांगोला शहर व परिसरातील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा.

-प्रा. प्रबुद्धचंद्र झपके,
अध्यक्ष, सां. ता. शि. प्र. मंडळ, सांगोला

मोटरसायकलवर हृदयविकारचा झटका आल्याने शिक्षकाचा मृत्यू

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. ८ मे-

तालुक्यातील हंजगी येथील जीवाजीराव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वाल्मिकी बालक प्राथमिक आश्रम शाळेतील सहशिक्षक चनबसप्पा तुकशेट्टी (वय ४७) हे दुचाकीवरुन जाताना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला. ही घटना बुधवार सकाळी १० वाजता घडली.

बुधवारी सकाळी घरी अंघोळ करुन समतानगर येथून अक्कलकोट शहरात जात असताना चालत्या मोटरसायकलवरच चनबसप्पा तुकशेट्टी यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने ते गाडीवरून खाली कोसळले. तेव्हा परिसरातील लोक चनबसप्पा तुकशेट्टी यांना पाहून गाडीत घालून श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल येथे घेऊन गेले, मात्र मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्या या दुर्दैवी मृत्यूमुळे किणीवाडी गावासह अक्कलकोट शहर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ असा परिवार आहे.

त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी ६ वाजता किणीवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

समर्थ नगरीतील कोंडी हटविण्यासाठी प्रशासन असमर्थ

वाहतूक कोंडीमुळे अक्कलकोटवासियांसह भाविकांमधून संताप; पालखी मार्ग तातडीने रुंद करण्याची गरज

तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे
अक्कलकोट, दि. ८ मे-

अक्कलकोट तीर्थक्षेत्र समर्थांच्या पदस्पर्श, लिलाकार्याने पावन झालेली भूमी आहे. येथे स्वामींची अनेक मठ-मंदिरे आहेत. वर्षभरात अनेक उत्सव साजरे होतात. पालखी मार्गावरून भव्य-दिव्य मिरवणूक निघतात. पण वारंवार होणारी वाहतूक कोंडी नागरिकांसह भाविकांना मोठा त्रास होतो. जीव मुठीत घेऊन भाविकांचा वावर होतो. दिवसेंदिवस तीर्थक्षेत्री येणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. यामुळे तातडीने पालखी मार्ग संदीकरण करावे अशी मागणी व्यक्त होत आहे. एकंदरित स्वामी समर्थांच्या नगरीतील वाहतूक कोंडी हटविण्यासाठी प्रशासनच असमर्थ असल्याचे वारंवार समोर येत आहे.

अक्कलकोट तीर्थक्षेत्री वर्षभरात स्वामी समर्थांचा प्रकटदिन, पुण्यातिथी महोत्सव, श्री दत्त जयंती, गुरुप्रतिपदा, गुरुपौर्णिमा उत्सव, त्रिपुरारी पोर्णिमा यासह ग्रामदैवत मल्लिकार्जुन यात्रा व अन्य शहरातील उत्सव, जयंती, राजकीय कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होत असतात. याकरिता मोठ्या प्रमाणात भाविक येतात. याशिवाय हल्ली गुरुवार, शनिवार, रविवारी, पोर्णिमा, सलग सुट्ट्यादिवशी मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत आहेत. याशिवाय गाणगापूर, पंढरपूर, तुळजापूर यात्रा काळात अक्कलकोट तीर्थक्षेत्री मोठ्या प्रमाणात भाविक येतात. उत्सव असो अथवा नसो बारा महिने अक्कलकोट तीर्थक्षेत्री दर्शन, पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या तीव्र झपाट्याने वाढत आहे.

घरोघरी भाविकांनी स्वामी समर्थांची लीला, कार्याची टीव्ही मालिका यामुळेही अक्कलकोट स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्यांचा ओढा वाढलेला आहे. यामुळे प्रचंड प्रमाणात वाढणारी गर्दी, वाहनांची संख्या पाहता स्वामी मंदिर परिसर तसाच अरुंद आहे. रस्त्याचा मोठ्या प्रमाणातील अतिक्रमण वाढलेले, वाहने पार्किंगसाठी अपुरी जागा, लॉजसमोर रस्त्यावरच वाहतुकीस अडथळा ठरणारी ऑटोरिक्षा भाविकांची वाहने यामुळे मुळातच अरुंद असलेली रस्ते यामुळे अधिकच अरुंद झाली आहेत. यामुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथे सध्या येणारी वाहने, भाविकांची संख्या नजरेआड करता येणार नाही. स्वामी समर्थ समाधी मठ परिसर, गुरु मंदिर परिसर, स्वामी समर्थ मंदिर परिसर, पालखी मार्गावर तातडीने रस्ते रुंदीकरण, पार्किंग सुविधा ऑटो रिक्षांना वाहतुकीस अडथळा नसणारे थांबे निश्चित करणे अत्यंत गरजेचे आहे.

रस्त्यांचे रुंदीकरण तत्काळ व्हावे

सध्या येणाऱ्या भाविकांची संख्येमध्ये झपाट्याने होणारी वाढ व भविष्यात वाढणारी भाविकांची संख्या लक्षात घेता अक्कलकोट तीर्थक्षेत्रासाठी तातडीने पालखी मार्ग, रस्ते रुंदीकरण कामे हाती घेणे गरजेचे असल्याचे मत पुणे येथील स्वामी समर्थभक्त नरेश अहिर, अमोल आव्हाड, ठाणे येथीलभक्त संभाजी जाधव, वैभव पवार यांनी व्यक्त केले आहे.

CMYK

धाराशिव •
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

दुधाळवाडी येथे पंचगव्य उत्पादनाचे दोन दिवसीय मोफत प्रशिक्षण शिबिर

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.८ मे -

जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील दुधाळवाडी येथे दि.११ व १२ मे या कालावधीत पंचगव्य उत्पादनांचे दोन दिवसीय मोफत प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती गोसेवक वैद्य नवनाथ दुधाळ यांनी दिली.

सदरील शिबिरामध्ये पंचगव्यापासून साबण, दंतमंजन, धूपबत्ती, अंगराग पावडर, गोमय भस्म, पंचगव्य घृत, जलअमृत, बाम, केशतेल, शाम्पू यासह दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या वस्तू कशा बनविता येतात याचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

त्याचबरोबर कोरोना सारख्या महामारी, कॅन्सर, डायबिटीस यांसारख्या आजारावर कशी मात करता येऊ शकते याबाबत मोफत मार्गदर्शन व सल्ला देण्यात येईल. तसेच रुग्ण सुद्धा सल्ला घेण्यासाठी आपले रिपोर्ट घेऊन येऊ शकतात. सदरील प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी वैद्य नवनाथ दुधाळ यांच्याशी ९९६९३१३३९७ किंवा ९९७५६८४३५४ या क्रमांकावर नोंदणी करावी. रोजगार निर्मितीसाठी अथवा स्वतः चे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी वयाची किंवा शिक्षणाची अट नाही.

सदरील शिबिर हे दुधाळवाडी (हरणवाडी), ता. कळंब, येथे होणार असून जास्तीत जास्त इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही वैद्य नवनाथ दुधाळ यांनी केले आहे.

▶▶संक्षिप्त वृत्त...

रोजी अग्नि मंथन व अग्नि स्थापना
रोजी सायं ५.०० वा.सा... श्रीसुक्त हवन
रोजी ... दर्श इष्टि यज्ञ

वाशी येथे दर्शन ईस्टी यज्ञ संपन्न

वाशी, दि.८ मे -

वाशी येथील दत्त मंदिर देवस्थान वाशी (जि. धाराशिव) यांच्यावतीने पूज्य दीक्षित अग्नी होत्री सद्गुरु श्री यज्ञेश्वरजी रंगनाथ सेलुकर महाराज यांच्या हस्ते दर्श ईष्टी यज्ञाचा कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम येथील दत्त मंदिर मधील दि.६, ७ व ८ मे रोजी तीन दिवस घेण्यात आला. दि.६ रोजी अरणीमंथन व अग्निस्थापना करण्यात आली दि.७ रोजी सायंकाळी पाच वाजता सामुदायिक श्री सूक्त हवन करण्यात आले. महत्त्वाचा कार्यक्रम दि. आठ रोजी सकाळी नऊ ते बारा दर्शन ईष्टी यज्ञ करण्यात आला. यावेळी सद्गुरु महाराजांनी महेंद्र देवतेला विशिष्ट अग्नी दिला जातो असे सांगितले. ईष्टी यज्ञ का करायचा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शेवटी सर्व उपस्थित लोकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आल्यानंतर ईष्टी यज्ञची सांगता झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट वाशी यांच्या संचालकांनी परिश्रम घेतले.

आष्टा कासारमध्ये ५३.७७ टक्के मतदान

जळकोट, दि.८ मे -

येथून जवळच असलेल्या उमरगा-लोहारा मतदार संघातील आष्टा (कासार) येथे धाराशिव लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि.७ मे रोजी घेण्यात आलेल्या मतदान प्रक्रियेत एकूण ५३.७७% मतदान झाले. आष्टा (कासार) गावात मतदान प्रक्रियेसाठी निवडणुक आयोगाच्यावतीने एकूण पाच मतदान बूथ स्थापन करण्यात आले होते. या पाच मतदान केंद्रावर मतदान केंद्रावर गावातील एकूण मतदार ५११९ पैकी २७२२ महिला पुरुष मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. केंद्र क्र.२१७ वर ९९५ पैकी ४९८, केंद्र क्र.२१८ वर ९९० पैकी ५३१, केंद्र क्र.२१९ वर ११४४ पैकी ५६२, केंद्र क्र.२२० वर ११०६ पैकी ५७२ तर मतदान केंद्र क्र.२२१ वर ९८४ पैकी ५६० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

जीप-मोटारसायकल अपघातात दोघे गंभीर जखमी

धाराशिव, दि.८ मे -

वाशी तालुक्यातील पारगाव शिवारात जीप व मोटारसायकल अपघातात दोघे जखमी झाले आहेत. हा अपघात शुक्रवारी (दि.३) सायंकाळी ५.४५ वाजेच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर पारगाव शिवारात घडला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, परंडा तालुक्यातील खासापुरी येथील अजय जदाळे व वैष्णवी जमदाडे हे दोघेजण राष्ट्री महामार्ग ५२ वरुन दुचाकी (क.एम.एच.२५ए.झे. ०१९९) वरुन जात होते. दरम्यान त्यांची मोटारसायकल पारगाव शिवारात आली असता जीप (क्र.एम.एच.२३ ए. एस. ३१४८) चा चालकाने त्याचे ताब्यातील जीप हायगई व निष्काळजीपणे चालवून मोटारसायकलला पाठीमागुन धडक दिली. या अपघातात अजय जदाळे व वैष्णवी अमदाडे यांना गंभीर जखमी केले. सदरचा जीप चालक हा अपघात करुन जखमीस उपचारासाठी न नेता अपघातस्थळावरुन वाहनासह पसार झाला. या प्रकरणी महादेव जदाळे यांनी वाशी पोलीसात दिलेल्या तक्रारीवरुन सोमवार (दि.६) गुन्हा दाखल झाला आहे. प्रकरणाचा पुढील तपास वाशी पोलीस करत आहेत.

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात ६३.८८ टक्के मतदान

१२ लक्ष ७२ हजार मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क... ८१ पैकी २० तृतीयपंथीयांनी केले मतदान...

सर्वाधिक मतदान तुळजापूर झाले तर सर्वात कमी मतदान उमरग्यात...

तभा वृत्तसेवा / देविदास पाठक
धाराशिव, दि.८ मे -

उस्मानाबाद लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी ७ मे रोजी मतदान झाले. या निवडणूकीच्या मतदानाची टक्केवारी ६३.८८ इतकी आहे. १९ लक्ष ९२ हजार ७३७ मतदारांपैकी १२ लक्ष ७२ हजार ९६९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ६ लक्ष ९० हजार ५३३ पुरुष, ५ लक्ष ८२ हजार ४१६ स्त्री आणि २० तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

औसा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ५६ हजार ४७९ पुरुष, १ लक्ष ३७ हजार ६०४ स्त्री व ३ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लक्ष ९४ हजार ८६ मतदार असून त्यापैकी १ लक्ष १ हजार ९७८ पुरुष, ८७ हजार ५३६ स्त्री आणि एक तृतीयपंथी अशा एकूण १ लक्ष ८९ हजार ५१५ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुषांची मतदानाची टक्केवारी ६५.१७ टक्के, महिलांची ६३.६१ टक्के तर तृतीयपंथीयांची ३३.३३ टक्के अशी एकूण ६४.४४ टक्के इतकी आहे. उमरगा विधानसभा मतदारसंघात ३ लक्ष १० हजार ७०३ मतदार असून यामध्ये १ लक्ष ६४ हजार ५०० पुरुष, १ लक्ष ४६ हजार १९३ स्त्री आणि १० तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. यापैकी १ लक्ष २९१ पुरुष, ८७ हजार ५६ स्त्री आणि ४ तृतीयपंथी मतदार अशा एकूण १ लक्ष ८७ हजार ३५१ मतदारांनी मतदान केले. पुरुष मतदारांची टक्केवारी ६०.९७, स्त्री मतदारांची ५९.५५ टक्के आणि तृतीय पंथीयांची टक्केवारी ४० टक्के असे एकूण टक्केवारी ६०.३० टक्के आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदान झाले त्याची टक्केवारी ६५.४० इतकी आहे. तुळजापूर विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ९८ हजार ५१७ पुरुष, १ लक्ष ७७ हजार ३९ स्त्री आणि ६ तृतीयपंथी मतदारांचा समावेश असून काल झालेल्या निवडणूकीत १ लक्ष ३४ हजार १ पुरुष, १ लक्ष ११ हजार ६२५ स्त्री आणि एका तृतीयपंथीयाने अशा एकूण २ लक्ष ४५ हजार ६२७ मतदारांनी मतदान केले. यामध्ये ६७.५० टक्के पुरुष, ६३.०५ टक्के स्त्री व १६.६७ टक्के तृतीयपंथी अशा एकूण ६५.४० टक्के मतदारांनी मतदान केले.

उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ९२ हजार ९५७ पुरुष, १ लक्ष ७२ हजार ९७७ स्त्री व १७ तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष ६५ हजार ९५१ मतदार आहेत. त्यापैकी १ लक्ष २८ हजार १२१ पुरुष, १ लक्ष ५ हजार ९८५ स्त्री अशा २ लक्ष ३४ हजार १०६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ६६.४० टक्के पुरुष, ६१.२७ टक्के स्त्री असे एकूण ६३.९७ टक्के मतदान झाले.



परंडा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ७३ हजार १४६ पुरुष, १ लक्ष ५२ हजार १३ स्त्री व ६ तृतीयपंथी मतदार असे एकूण ३ लक्ष २५ हजार १६५ मतदार असून त्यापैकी १ लक्ष १३ हजार ९४० पुरुष, ९२ हजार ६७३ स्त्री व ३ तृतीयपंथी असे एकूण २ लक्ष ६ हजार ६१६ मतदारांनी मतदान केले. मतदानाची पुरुषांची टक्केवारी ६५.८१, स्त्री टक्केवारी ६०.९६ टक्के व ५० टक्के तृतीयपंथी अशी एकूण टक्केवारी ६३.५४ टक्के इतकी आहे.

बार्शी विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ६६ हजार ४९७ पुरुष, १ लक्ष ५४ हजार ७३४ स्त्री व ३९ तृतीयपंथी मतदार अशा एकूण ३ लक्ष २१ हजार २७० मतदारांचा समावेश आहे. ७ मे रोजी १ लक्ष १२ हजार २०२ पुरुष, ९७ हजार ५४१ स्त्री आणि ११ तृतीयपंथी अशा एकूण २ लक्ष ९ हजार ७५४ मतदारांनी मतदान केले. यामध्ये ६७.३९ टक्के पुरुष, ६३.०४ स्त्री व २८.२१ तृतीयपंथी अशा एकूण ६५.२९ टक्के मतदारांनी मतदान केले.

येत्या ७ मे रोजी झालेल्या निवडणूकीसाठी १० लक्ष ५२ हजार ९६ पुरुष, ९ लक्ष ४० हजार ५६० स्त्री आणि ८१ तृतीयपंथी असे एकूण १९ लक्ष ९२ हजार ७३७ मतदारांचा मतदार यादीत समावेश आहे. त्यापैकी ६ लक्ष ९० हजार ५३३ पुरुष, ५ लक्ष ८२ हजार ४१६ स्त्री व २० तृतीयपंथी मतदार अशा एकूण १२ लक्ष ७२ हजार ९६९ मतदारांनी मतदानाचा या निवडणूकीत हक्क बजावला.

यामध्ये ६५.६३ टक्के पुरुष, ६१.९२ टक्के स्त्री व २४.६९ टक्के तृतीयपंथी अशा एकूण ६३.८८ टक्के मतदारांनी मतदान केले.

येत्या ४ जून २०२४ रोजी १८ व्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतमोजणी होणार आहे. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातील ३१ उमेदवारांचे भाग्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले असून सर्वांचे लक्ष ४ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे.

काल्याच्या कार्यक्रमानंतर दिंडया आपआपल्या गावी मार्गस्थ

तभा वृत्तसेवा
तेर, दि.८ मे -

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका यांच्या वार्षिक यात्रेनिमित्त आलेल्या दिंडया काल्याच्या कार्यक्रमानंतर आपआपल्या गावी मार्गस्थ झाल्या.

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका यांच्या वार्षिक यात्रेस ४ में पासून प्रारंभ झाला. ७ मे ला श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर येथे मुख्य काल्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी उपस्थित हजेरी किर्तनात हभप शंकर महाराज थोबडे, हभप अतुल महाराज बामणीकर, ह भप भाऊसाहेब महाराज गोसावी यांची किर्तने झाली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. काल्याच्या किर्तनानंतर दिंडया आपआपल्या गावी मार्गस्थ झाल्या.काल्याच्या कार्यक्रमामुळे श्री नृसिंह यांना उटी लाऊन अलंकार घालण्यात आले होते.

श्री संत गोरोबा काका यांच्या वार्षिक यात्रेनिमित्त श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर येथील मुख्य कार्याचा कार्यक्रम असतो. त्या ठिकाणी तेर येथील सतिश पाटील यांच्या घरून काल्याच्या कार्यक्रमाची दहीहंडी पाठविली जाते ही परंपरा आजही अव्याहतपणे चालू आहे.

मोटारसायकल-कारच्या धडकेत २ जण ठार

तभा वृत्तसेवा
भूम, दि.८ मे -

भूम-नगर रोडवर भूम शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर संजय वीट उद्योगसमोर इंडिका कार आणि मोटारसायकलचा अपघात होवून या अपघातात दोघांचा मृत्यु झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास घडली.

या अपघातात पारधी समाजातील एकाच कुटुंबातील मयत झाल्याने पारधी समाजाच्या नागरिकांनी मयताला पाहण्यासाठी रूग्णालयात गर्दी केली होती. संबंधित कार चालकाला तात्काळ अटक करावी यासाठी भूम गोलाईमध्ये पारधी समाजातील महिला व पुरूषांनी गोलाई जाम करून येणाऱ्या वाहनांवर दगडफेक केली. या घटनेने या भागात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

शासकीय यंत्रणेने घेतला मोकळा श्वास...

धाराशिवचे नागरिक, मतदार म्हणतात झाले इलेक्शन जपा रिलेशन!

तभा वृत्तसेवा
खामसवाडी, दि.८ मे -

धाराशिव लोकसभा निवडणुकीचे सात मे ला मतदान झाले अन दिग्गज उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले. राजकिय सभा, कॉर्नर बैठका, रॅली, रोडशो आदी प्रकारच्या प्रचारामुळे राजकीय वातावरण अक्षरशः ढवळून निघाले. आरोप प्रत्यारोप, राजकीय कुरघोड्या, आचारसंहिता भंगच्या तक्रारी, कांही ठिकाणी गुन्हे दाखल आदी प्रकारचे राजकीय रंग निवडणुकीत पहायला मिळाले. सदरील निवडणूक हि देशाच्या भवितव्याची असली तरी ग्रामीण भागात मात्र ग्रामपंचायत निवडणुकीप्रमाणे राजकीय रंगत पहायला मिळाली. धाराशिव लोकसभेसाठी एकतीस उमेदवार रिंगणात असले तरीही खरी लढत ही घड्याळ विरुद्ध मशाल अशीच पहायला मिळाली.

दैनिक तरुण भारतने काल पार पढलेल्या मतदानापर्यंतचा थोडासा मागोवा घेतला. कांही दिवसांपासून चालू असलेला प्रचाराचा गोंधळ थांबला अन सात मे ला शांततेत मतदान पार पढले. कळंब तालुक्यासह अनेक गावात सकाळी मतदारांची गर्दी पहायला मिळाली मात्र दुपारी वाढलेल्या तापमानामुळे ही गर्दी पूर्ण ओसरली होती.

बाहेरगावी असलेल्या मतदारांनी या निवडणुकीकढे पाठ फिरवल्याने ग्रामीण भागातील मतदान टक्का घसरल्याचे चित्र पहायला मिळाले.वाढलेले तापमान लक्षात घेऊन शहरी, ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर आरोग्य यंत्रणा सज्ज होती. यावेळी आशा स्वयंसेविका प्राधान्याने हजर होत्या.

यासगळ्या प्रशासकीय यंत्रणेत खरी कसोटी झाली ती खाकीवर्दीची..! पोलीस निरीक्षक, पोलीस हवालदार, राज्य राखीव पोलीस हे मात्र वाढलेल्या तापमानात मतदान केंद्र, परिसर, रस्त्यावर चोख काम करीत होते. खामसवाडी, गोविंदपूर, मंगरूळ कांही गावात महिला पोलिसांनाही या तापमानात खडी ड्युटी करावी लागली असे ज्वलंत चित्र पहायला मिळाले.

एकंदरीत या झालेल्या निवडणुकीमध्ये राजकीय भाषेची पातळी घसरल्याचे दिसले. व्यक्तिगत आरोप-प्रत्यारोप, व्यक्तिशः उनेदुने निघाल्याने मतदारात मात्र याविषयी नाराजीची कुजबुज ऐकायला मिळाली.

निवडणूक लोकसभेची झाली पण तत्वाची पाहायला मिळाली नाही. ग्रामीण भागात असणारे व्यक्तिशः कुरघोडीचे राजकारण एका टप्प्यावर शांत झाल्याचे हेही तेवढेच पहायला मिळाले. धाराशिव लोकसभा मतदारसंघात झालेल्या निवडणूक चुरशीची झाली खरी पण आता चर्चा होतेय ती शर्यतीची, पैजेची, प्रतीष्टेची वाढत्या तापमानात सकाळी संध्याकाळी कट्ट्यावरील राजकीय गप्पा मात्र वाढल्या आहेत.

नळदुर्गमध्ये ८ हजार ८७३ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.८ मे -

धाराशिव लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी दि.७ मे रोजी घेण्यात आलेल्या मतदानात नळदुर्ग येथे ८ हजार ८७३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. जवळपास ५४ टक्के मतदारांनी मतदान करून आपले कर्तव्य बजावले.

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान दि.७ मे रोजी पार पडले. तिसऱ्या टप्प्यात धाराशिव लोकसभा मतदार संघाचा समावेश होता.

धाराशिव लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी दि.७ मे रोजी पार पडलेल्या मतदानात नळदुर्ग येथे १६ हजार १८९ मतदारांपैकी ८ हजार ८७३ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यावेळी शहरांतील विविध भागात १६ मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. सकाळी ७ वा. मतदानास प्रारंभ झाल्यानंतर वसंतनगर येथील बुथ क्र.३४७ या मतदान केंद्रावरील मतदान यंत्र कांही तांत्रीक कारणामुळे बंद पडले होते. तब्बल एक तासानंतर हे मतदान यंत्र सुरू झाल्यानंतर या मतदान केंद्रांवर मतदानास सुरुवात झाली.

त्याचबरोबर हुतात्मा स्मारकातील बुथ क्र.३५८ या मतदान केंद्रातील मतदान यंत्रही कांही काळ बंद पडले होते. मात्र २० मिनिटात हे मतदान यंत्र सुरू करण्यात आले. इतर ठिकाणी मतदान यंत्र सुरळीतपणे सुरू होते.

धाराशिव लोकसभा मतदार संघातील ३१ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. मतदान सुरू असताना नळदुर्ग येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी भेट देऊन महायुतीच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली त्याचबरोबर महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे यांनीही शहरांतील मतदान केंद्राला भेट दिली.

या निवडणुकीत मराठा समाज व मुस्लिम समाज मोठ्याप्रमाणात महायुतीच्या विरोधात गेल्याचे दिसुन येत होते.

सर्वच मतदान केंद्रावर अतीशय कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

धाराशिव जिल्ह्यात विविध ठिकाणी ८ लाख २१ हजारांचा अवैध दारू साठा जप्त

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.८ मे -

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यातंर्गत विविध पथकानी १३ ठिकाणी छापे मारुन अवैध दोरु विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ही कार्यवाही सोमवारी (दि.६) रोजी अवैध मद्य विरोधी विशेष मोहिमेतंर्गत करण्यात आली. या छाप्यामध्ये विविध ठिकाणावरुन १८७ लि. गावठी व देशी विदेशी दारुच्या १६९ सिलबंद बाटल्या असे एकूण ८ लाख २१ हजार ७५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात १३ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, लोहारा पोलीस ठाण्यातंर्गत दोन ठिकाणी छापे मारुन कारवाई करण्यात आली. यामध्ये तालुक्यातील सास्तुर येथे बाबासाहेब उग्रासेन गायकवाड हा गावामध्ये बाजार कट्टा येथे अंदाजे १ हजार ४० रूपये किंमतीच्या देशी-विदेशी दारुच्या १३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

तर दुसऱ्या छाप्यातील शिव शंकर सिद्राम व्हर्ट हे जेवळी येथील चरनकमल हॉटेल समोर अंदाजे २० हजार ८१० रूपये किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त विदेशी दारुच्या करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द गुन्हे नोंदविले आहेत. उमरगा पोलीस ठाण्यातंर्गत २ ठिकाणी छापे टाकण्यात आले.

यामध्ये एकोंडी येथील छाप्यात आत्माराम पांडुरंग मुळजे, हे उमरगा शहरातील मुन्शी प्लॉट येथील आउत लाईनच्या जवळील लक्ष्मी मंदीरच्या बाजूला अंदाजे २० हजार २८५ रूपये किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद वाटल्या जप्त करुन गुन्हा दाखल झाला आहे.

तर दुसऱ्या छाप्यात उमरगा शहरातील लालयया मारुती तेलंग हा डिग्गी ते हिप्परगा रोडवरील कर्नाटक बोर्डरजवळील पुलावर अंदाजे १,००,००० किंमतीच्या देशी ६५ सिलबंद बाटल्या व १२० गावठी दारु सह होंन्डा सिटी कंपनीची कारसह आढळून आला.

कळंब पोलीस ठाण्यातंर्गत दोन छापे टाकण्यात आले. यामध्ये कळंब शहरातील समाधान रमेश हौसरमल हा इसम अनिल भोजनालयाच्या बाजूला अंदाजे ७७० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १४ सिलबंद बाटल्यासह आढळून आला.

तर दुसऱ्या छाप्यात कळंब तालुक्यातील इटकूर येथे गोरख राजेंद्र शिंदे हा इटकुर प्राथमिक आरेग्य केंद्रासमोर ८४० किंमतीची १२ लि. गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

भूम पोलीस ठाण्याअंतर्गत १ छापा टाकायात आला. यामध्ये भूम तालुक्यातील पाश्रुड येथे समाधान नरहरी येडे ह दुधोडी पाटी येथे अंदाजे ६ लाख ५६ हजार २७० रूपये किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या सह मारुती स्वीफट डिझायर कार जप्त करण्यात आल्या.

तर उमाचीवाडी येथील छाप्यात कृष्णाथ साहेबराव सोनवणे हा २ हजार ७९५ रूपये किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. मुरुम पोलीस ठाण्याच्या पथकाने २ ठिकाणी छापा मारुन कारवाई केली.

यामध्ये नागुर येथील छाप्यात धनराज शाहुराज सोनवणे हा मुरुम मोड ते कोराळ जाणारे रोडवरील आर्यन ढाबा जवळ अंदाजे ६ हजार १५० रूपये किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तसेच मुरूम येथील बाळासाहेब माणिक गु ळवे हा मुरुम अक्कलकोट जाणारे रोडवरील डेक्कन ढाबा जवळ अंदाजे २ हजार ३५० रूपये किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

वरील सर्व प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी करत आहेत.

दिलखुलास'कार्यक्रमात बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांची मुलाखत

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी बीड जिल्हा प्रशासन सज्ज' याविषयी बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांची मुलाखत घेण्यात आली आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात, शुक्रवार १० मे २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत ही मुलाखत प्रसारित होणार आहे. पत्रकार अतुल कुलकर्णी यांनी ही मुलाखत घेतली आहे.

बीड जिल्ह्यात असलेले लोकसभा निवडणूक मतदार संघ, लोकसभा निवडणुकीचे कामकाज पार पडण्यासाठी सुरू असलेली कार्यवाही, मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रांवर करण्यात आलेली तयारी, मतदार जनजागृती उपक्रम, कायदा व सुव्यवस्थेबाबतचे नियोजन, सर्व घटकातील मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधा याबाबत बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी या मुलाखतीत माहिती दिली आहे.

बीड विधानसभा मतदारसंघातील कर्मचाऱ्यांनी ईडीसी प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून प्राप्त करावे

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

मतदानापासून आपले कर्मचारी अधिकारी वंचित राहू नये, यासाठी बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत बीड विधानसभा मतदारसंघातील अधिकारी/ कर्मचारी यांनी बीड तहसील कार्यालयातून निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.

बीड विधानसभा मतदार संघांतर्गत कार्यरत अधिकारी, कर्मचारी ज्यांनी प्रथम प्रशिक्षण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे केले आहे त्या ठिकाणी त्यांनी १२ (अ) अर्ज भरून दिलेले होते. अशा सर्व निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी कर्मचारी यांचे निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रचे वाटप तहसील कार्यालय बीड येथील पहिल्या मजल्यावर सुरू असून दि. ११ मे २०२४ तारखेपर्यंत ईडीसी प्रमाणपत्र करुन घ्यावे, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.

वडार समाजाचा बजरंग सोनवणे यांना पाठिंबा

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

बीड येथील वडार समाजाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. बीड येथील प्रकाश नगर मध्ये रहिवाशांची दीपक चौगुले यांच्या उपस्थितीत बैतक झाली. बैठकीत या भागात अद्यापही कोणी सार्वजनिक शौचालय, रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सुविधा दिलेल्या नाहीत यावर चर्चा झाली. येत्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना.पाठिंबा देण्याचा त्यांनी सर्वानुमते निर्णय घेतला. कारण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडी ही धर्मनिरपेक्ष असून जातीवादी पक्ष जे संविधान बसल्याची भाषा करून जाती पतीचे राजकारण करतात. समाजात तेढ निर्माण करत आहेत. अशा शक्तींना रोखण्यासाठी बजरंग सोनवणे यांना त्यांनी पाठिंबा दिला आहे.

दरम्यान निर्णया नंतर प्रकाश नगर येथे रहिवाशांनी एक बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, शेकापचे नेते भाई मोहन गुंड, धम्मपाल कांडेकर आणि डॉ.हर्षदा सोनवणे, जाधव मॅडम यांच्यासह संयोजक उपस्थित होते. या बैठकीला या भागातील महिला व नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपाकडून अंबाजोगाईत धर्माचे राजकारण केले

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

भाजप जेव्हा हरायला लागते तेव्हा धर्माची ढाल करते आणि शेवटी तो प्रयत्न माझ्या जिल्ह्यात झाला मात्र भाजपला पराभव चुकणार नाही आता द्वेषाचे राजकारण खूप झाले मोदी आले आणि त्यांनी कुठलेही आश्वासन दिले नाही उलट आरक्षण न देण्याची आणि मुस्लिम द्वेषाची पेरणी करत बीड मधील व देशातील अल्पसंख्याक समुदायाच्या भावना दुखवल्या आहेत . भाजपने धर्मांध राजकारन बंद करावे बीड फुले शाहू आंबेडकर विचाराचा आहे त्यामुळे भाजप नैतिक पातळीवर हारली असून आता केवळ मतदान आणि निकालाची औपचारीकता मागे असल्याचे बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

अंबाजोगाई येथील सभेत मोदी काय म्हटले तर त्यांचे भाषण होते सर्व मुस्लिम द्वेषी . भीती वाढवून मते मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे . इंडिया आघाडीचा एकच अजेंडा आहे ,सरकार मध्ये आल्यावर वर मिशन कॅन्सल चालविणार, आर्टिकल ३७० संपुष्टात येईल, CAA NRC कायदा संपुष्टात येईल,

तीन तलाक संपविणार इंडिया आघाडी, किसान सन्मान निधी पैसे कॅन्सल करतेन, मोफत अन्नधान्य संपविणार देशातील ५५ करोड लोकांना ५ लाखा पर्यत मोफत आरोग्य सेवा संपुष्टात येईल काँग्रेस सरकार इंडिया आघाडी राम मंदिर सुद्धा संपविणार सत्तेत आल्यावर महाराष्ट्र मधील काँग्रेस चा मुख्य नेता पंचवीस वर्ष काँग्रेस मध्ये राहून आलेला अस भाजप मध्ये आल्यावर बोलला,राहुल गांधी ज्यांचा मोदी ने भाषणात शहजादा म्हणून उल्लेख केला ते सुप्रीम कोर्ट मधून राम मंदिर चा निकाल बदलतेन तीन तलाक,शहा बानो केस मध्ये सुप्रीम कोर्ट चा निर्णय बदलला होता.असच राम मंदिर च्या निर्णयाला पलटून टाकतेंन इंडिया आघाडीच्या नेत्याने सांगितले आहे राम मंदिर बेक्कार आहे म्हणून हाच नेता राम मंदिर च्या पूजेला पाखड् म्हणत आहे.असले वक्तव्य स्वप्नात सुद्धा बोलू शकले नसते,पण दृष्टी साठी,वोट बँक साठी हे आज असले वक्तव्य करत आहे.वारंवार राम चा प्रभू श्रीराम चा अपमान करत आहे.असले लोक महाराष्ट्र च्या गौरव कसे वाढवणार.इंडिया आघाडीचे लोक वोट जिहाद साठी २६ /११ चे हल्ल्यातील लोकाना किलीन चिट देणार आहे.कसाब सोबत १० जण येणारे आतंकवादी त्यांना काँग्रेस पाठबळ देत आहे.देश विचारणार काँगेस च्या लोकांना काँग्रेस आणि आतंकवाद यह रिशता क्या कहलाता है...दिल्ली मध्ये झालेल्या बाटला हाऊस च्या हल्ल्यात काँग्रेसची मोठे नेता रडत बसली होती

मोदी चट्टन सारखा(पहाडा) तुमच्या समोर उभा आहे

राहुल गांधी एक चाल खेळत आहे.आदिवासी मागास लोकांचे आरक्षण सकावून घेऊन धर्माच्या नावावर आरक्षण देणार आहे.कर्नाटकात काय केलंय `लल ला रात्रीतून आरक्षण दिलंयकर्नाटक मधील सर्व मुस्लिमाना रात्रीतून `लल काँग्रेस ने केलंयओबीसी समुद्राय यांना २७% आरक्षण बाबासाहेब यांनी दिल होतभारताच्या संविधान यांनी दिल होत,संसद ने दिल होत काँग्रेसने कर्नाटक मधील मुस्लिमाना `लल केलंय,`लल च्या आरक्षण मध्ये डाका टाकून चोरी करून मुस्लिमांना आरक्षण दिलंयह्याचा सर्वात मोठा वाटा मुसलमान यांना गेला आहे.काँग्रेस ने जे कर्नाटक मध्ये केलंय असा खेळ तुम्हाला आवडणार आहे का...? असे म्हणत मुस्लिम द्वेष समोर आला आहे . पाठीमागच्या वाटेने दिलेले मुसलमान याना दिलेले आरक्षण तुम्हाला मंजूर आहे का..?हे अस पूर्ण राज्यात आणि देशात करणार आहे.

इंडिया आघाडीच्या नेते पूर्ण पणे मुस्लिम आरक्षण देणार आहे.ड्ली`लल च आरक्षण काढून सर्व मुस्लीम यांना देणार आहे.दलित ,आदिवासी साठी धोक्याची घंटा आहे.सरकार मध्ये आल्यावर हे बुलेट ट्रेन प्रोजेक्ट बंद करतेन. हे भाषण पाहता मोदींनी सलोखा धोक्यात आणल्याचे माझे मत तयार झाले असून यामुळे आता भाजपचा पराभव ही सामूहिक जबाबदारी बनले आहे . मी केवळ निमित्त ही जनतेची लढाई असल्याचे बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.

वडार समाज बाप्पांचा विजय घडवणार

बजरंग बली आम्ही आध्यत्मिक आणि राजकीय अस्मिता -दीपक चौगुले

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

वडार समाज दगड फोडणारा , काबाड कष्ट करणारा आणि मुख्य प्रवाहापासून दूर असलेला हा समाज विकासाच्या समीप आणेल असा शब्द देत बजरंग सोनवणे यांनी बीड शहरातील इमामपूर रोड वर झालेल्या प्रचार सभेत समाजाला कधी विसरणार नसल्याचे सांगितले यावेळी समाज सेवक दीपक चौगुले यांनी आम्ही दगडातून देव घडवतो आता आम्ही बाप्पा च्या रूपाने खासदार घडवू असे म्हटले .

बार्शी नाका भागात वडार समाजातील बांधवांच्या समवेत बजरंग सोनवणे यांनी तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह घेऊन मते मागितली . आपन समाजाचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आपली खासदारकी पणाला लावू .

यावेळी दीपक चौगुले यांनी पोटतिडकीने समाजाचे प्रश्न मांडले . आम्ही मुख्य प्रवाहात नाहीत आपण आम्हाला मदत करा असे आवाहन केले यावेळी व्यासपीठावर उमेदवार बजरंग सोनवणे , शेकाप चे नेते भाई मोहन गुंड , डॉ हर्षदा सोनवणे , गंगाधर गाडे यांचे संघटनेचे प्रदेश अध्यक्ष धम्मा कांडेकर युवक अध्यक्षा विद्याताई जाधव आदींची उपस्थिती होती.

लहान लहान समुदाय तुतारी वाजवू लागले

भाजपने आजवर केवळ आमचा वापर केला मोठया समुदायाची भीती दाखवायची आणि मते घायचची असे राजकारण होत आले आहे मात्र यावेळी आम्ही चुकणार नाही असे म्हणत बलुते ओबीसी आणि कष्टकरी समुदाय बजरंग सोनवणे यांना पाठिंबा देताना दिसत आहेत

संविधान वाचविण्यासाठी लोक एकत्र- आ.संदीप क्षीरसागर

बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ शहर आणि ग्रामीण भागात कॉर्नर सभा

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

इंग्रजांना या देशातून हाकलून देण्यासाठी ज्याप्रकारे लोक एकत्र आले होते त्याचप्रकारे आता सविंधानाचे रक्षण करण्यासाठी भाजपाला हाकलून देण्यासाठी सर्व जातीधर्माचे लोक एकत्र आले आहेत. आणि इतिहासात ज्याप्रकारे सर्व भारतीयांनी मिळून देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त केले त्याचप्रकारे आताही सर्व देशवासी मिळून भाजपाच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करणार आहेत. असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ झालेल्या कॉर्नर सभांमध्ये केले.

सध्या बीड मतदारसंघातील शहर आणि ग्रामीण भागात जाऊन महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी आ.संदीप क्षीरसागर कॉर्नर सभा घेत आहेत. दरम्यान सोमवारी (दि.७) रोजी सायंकाळी बीड शहरातील पेठ बीड भागातील बालाजी मंदिर येथे व सुभाष रोड येथे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे, माजी मंत्री सुरेश नवले व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत कॉर्नर सभा झाली. तसेच मंगळवार (दि.७) रोजी बीड तालुक्यातील विविध गावांमध्ये तसेच शहरातील नवा मोंढा येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठका घेतल्या. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे तसेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ गेवराईत मेळावा

तभा वृत्तसेवा
गेवराई दि.८ एप्रिल

मराठवाड्यातील शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तयार केलेली महत्वाकांक्षी योजना उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना रद्द केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडून पन्नास हजार कोटी रुपये मंजुर करून ही योजना पुन्हा कार्यान्वित करण्याचे प्रयत्न सध्या आम्ही करत आहोत. मराठवाड्यावरील दुष्काळाचा कलंक कायमस्वरुपी पुसण्यासाठी पंकजाताईंना निवडून देण्याचे आवाहन माजीमंत्री आ.बबनराव लोणीकर यांनी केले. महायुतीचा धर्म प्रामाणिकपणे निभावत गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्वाधिक मताधिक्य देवून असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. गेवराई येथे आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित कार्यकर्ता मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

बीड लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या अधिकृत उमेदावार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.६ मे रोजी गेवराई येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे माजी पाणीपुरवठा मंत्री तथा भाजपाचे निरीक्षक आ.बबनराव लोणीकर, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जालना भाजपाचे युवा नेते विश्वजित खरात, रिपाई आठवले गटाचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मोहम्मद गौस यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

निवडणुकीसाठी कर्तव्यार्थ पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच मतदान कर्मचारी यांच्यासाठी ९ ते ११ मे पर्यंत तहसील कार्यालयात मतदान सुविधा उपलब्ध

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

VOTE
VOTE
VOTE
VOTE

मतदानापासून कोणतेही अधिकारी, कर्मचारी वंचित राहू नये यासाठी, बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणारे २३०-बीड विधानसभा मतदारसंघात दि.९, ते दि.११ आणि दि.१२ मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार, असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, कविता जाधव यांनी कळविले आहे.

बीड विधानसभा मतदारसंघा अंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी बीड तहसील कार्यालयात सुविधा केंद्र उभारण्यात आले असून या ठिकाणी सकाळी ०९ ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच दिनांक १२ मे २०२४ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, कुर्ला रोड, बीड या ठिकाणी सुविधा केंद्र उभारून मतदान घेण्याची व्यवस्था ही करण्यात आलेली आहे.तसेच दिनांक १३ मे २०२४ रोजी मतदान होणाऱ्या इतर जिल्ह्यातील जे अधिकारी, कर्मचारी यांची पोलिंग स्टाफ म्हणून ३९-बीड लोकसभा मतदारसंघ अंतर्गत मतदानाच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे व ज्यांनी पोस्टल मतदानाचा नमुना क्रमांक १२ अर्ज भरलेला आहे अशा अधिकारी कर्मचारी यांची व पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी तहसील कार्यालय बीड येथे तहसीलदार यांच्या दालनात दिनांक ९ ते ११ मे रोजी पर्यंत सुविधा केंद्र उभारून मतदानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अशा मतदारांचे पोस्टल बॅलेट मतदानाची व्यवस्था सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत करण्यात आली आहे.

जिल्ह्याच्या विकासासाठी पंकजाताईंना बहुमताने विजयी करा

जेष्ठ कार्यकर्त्यांचे आवाहन

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ एप्रिल

श्री नरेंद्रजी मोदी यांना देशाच्या विकासासाठी तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवा असे आवाहन प्रा. सतीश पत्की, पंजाबराव मस्के, राजेंद्र आगवान, डॉ. लक्ष्मणराव नागरगोजे यांनी बीड येथील प्रज्ञावंतांच्या संवाद मिळाव्यात बोलताना केले.

बीड येथे प्रज्ञावंतांच्या मेळाव्याचे आयोजन स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या नजीकच्या सहकाऱ्यांनी केले होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. मुंडे साहेबांच्या प्रतिमेस अभिवादन करून या संवाद मेळाव्यास प्रारंभ झाला कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे ज्येष्ठ नेते विजयराव पालसिंगणकर यांनी केले. याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव नागरगोजे, पंजाबराव मस्के, राजेंद्र आगवान, संतोषराव नागरगोजे, यांनी गेल्या दहा वर्षातील मोदीचे कार्य, स्वर्गीय मुंडे साहेबांचे योगदान, पंकजाताई यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी केलेली कामे याचा उल्लेख केला.संवाद बैठकीचा समारोप प्रा. सतीश पत्की यांनी करून पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रवीण इंगळे यांनी केले. या कार्यक्रमास बीड शहरातील प्रज्ञावंतांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

हिंगोलीच्या पेन्शनपुरा भागातून ४२ जनावरे पोलिसांच्या पथकाने पकडली

पोलिसांकडून जनावरांच्या चारा, पाण्याची व्यवस्था

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ मे

शहरातील पेन्शनपुरा भागातून शहर पोलिसांच्या पथकाने तब्बल ४२ जनावरे संशयावरून पकडली आहेत. सर्व जनावरे ताब्यात घेऊन हिंगोली शहर पोलिस ठाण्यात आणली असून या प्रकरणी पोलिसांनी सहा ते सात जणांची चौकशी सुरू केली आहे. जनावरांमध्ये गायी, वासरे तसेच बैलांचा समावेश आहे.

शहरातील पेन्शनपुरा भागातील सहा ते सात घराजवळ जनावरे बांधलेली असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. सदर जनावरांची अवैधरित्या वाहतूक करून आणण्यात आल्याचा संशय असल्याने पोलिसांनी जनावरे ताब्यात धेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पोलिस अधीक्षक जी. श्रीधर, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर सपोनि गजानन मोरे, बोधगिरे, उपनिरीक्षक कपील आगलावे, जमादार अशोक धामणे, संभाजी लेकुळे, धनंजय क्षीरसागर, संजय मार्के यांच्यासह पोलिसांचा मोठा ताफा मंगळवारी रात्री या भागात पोहोचला.

दरम्यान, त्याठिकाणी ४२ जनावरे आढळून आली. पोलिसांनी सदर जनावरांबाबत चौकशी केली असता समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी सर्व ४२ जनावरे ताब्यात घेऊन हिंगोली शहर पोलिस ठाण्यात आणली आहेत. यावेळी सहा ते सात जणांनी सदर जनावरे आपल्या मालकीची असल्याचे सांगत जनावरांचे दाखले असल्याचे सांगितले. त्यावरून पोलिसांनी त्यांना जनावरांचे दाखले दाखविण्याची सुचना केली आहे.

परंतु दि ८ मे सकाळपर्यंत जनावरांचे दाखले घेऊन कोणीही पोलिस ठाण्यात आले नाही. त्यामुळे पोलिसांनीच जनावरांची देखभाल सुरू केली आहे. जनावरांना चारा पाणी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर आणि त्यांचे सहकारी देतांना दिसत आहेत. जनावरांच्या मालकांनी दाखले दाखविल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अक्षयतृतीयेच्या दिवशी होणारे बालविवाह थांबवावेत

जिल्हाधिकारी पापळकर यांच्या सूचना

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ मे

अक्षय तृतीयेच्या दिवशी मोठ्या प्रमाणात विवाह होतात. दि. १० मे, २०२४ रोजी अक्षय तृतीया असल्याने या दिवशी होणारे संभाव्य बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी खबरदारी घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी आणि अक्षय तृतीयेच्या दिवशी होणारे बालविवाह थांबवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ संपूर्ण राज्यात लागू करण्यात आलेला आहे. तसेच त्याबाबतचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २०२२ देखील लागू करण्यात आलेला आहे. या नियमानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी भागासाठी तर ग्रामीण भागासाठी ग्रामसेवकांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच ग्रामीण भागासाठी अंगणवाडी सेविका व शहरी भागासाठी पर्यवेक्षिका यांना सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यात अक्षय तृतीया या दिवशी बालविवाह होऊ शकतात. यास प्रतिबंध म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात. त्यानुसार एखाद्या पुरुषाने अल्पवयीन बाल वधुशी विवाह केल्यास त्या पुरुषाला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, त्यासाठीचा सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. बालविवाह झाल्यास संबंधित वर व वधु यांचे आई-वडील किंवा पालक, अन्य नातेवाईक मित्र परिवार, विवाह विधी पार पाडणारे संबंधित व्यक्ती, फोटोग्राफर, प्रिंटींग प्रेस, वाजंत्री, सभागृह व्यवस्थापक, कॅटरिंग अशा बालविवाह घडविण्यास मदत करणाऱ्या सर्वांना दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड होऊ शकतो. तसेच ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावरही कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत.

वसमत पंचायत समिती इमारतीचे भविष्य धोक्यात, निकृष्ट दर्जाच्या साहीत्याचा बांधकामात वापर ?

तभा वृत्तसेवा
वसमत, ८ मे

येथे मागील काही दिवसापासून पंचायत समितीच्या नूतन इमारतीचे बांधकाम खाजगी कंत्राकदारामार्फत करण्यात येत आहे परंतु कंत्राटदार हे आर्थिक बचतीचे धोरण लक्षात ठेवून वाळू ऐवजी चक्क डस्टमध्ये मुख्य इमारतीचे बांधकाम पायापासूनच करत आहे. काम डस्टमध्ये करत असल्याने येणाऱ्या काळात इमारत कमकुवत होऊन धोकादायक ठरणार आहे. या सर्व प्रकाराकडे संबंधित विभागाचे अभियंता दुर्लक्ष करत असल्याने पहावयास मिळत आहे. त्यामुळे इमारतीचे भविष्य धोक्यात येणार आहे.

वसमत तालुक्याला विविध विकास कामांसाटी कोट्यावधीचा निधी मिळत आहे. पंचायत समिती इमारत बांधकामाबाबत संबंधित वृत्तपत्राच्या प्रतिनिधींनी या कामा संदर्भात अभियंताशी विचारणा केली असता वाळू बंद असल्याने कंत्राकदार हे आर्टिफिशियल वाळूत काम करत असल्याचे सांगून मोकळे झाले आहे परंतु मुख्य इमारतीच्या कामाच्या जागी पाहणी केली असता आर्टिफिशियल न वापरता चक्क डस्टमध्ये इमारतीचे मुख्य कॉलमव पायाभरणीचे काम सुरू आहे. परंतु आता या झालेल्या कामाच्या तपासण्या कुठल्या स्तरावर करतील व येणाऱ्या तपासण्या तसेच चाचणीचा रिपोर्ट तरजोड करून येते का हे पाहणे तितकेच गरजेचे आहे.

शासकीय अभियंता वाळू बंद असल्याचे सांगून कंत्राटदाराची पाठराखण करत असल्याचे समोर दिसत आहे. वाळू, डस्ट, चुरी, आर्टिफिशियल वाळू यातील फरक अभियंत्यास कळत नसेल तर मुख्य इमारतीचे बांधकाम त्यांच्यामार्फत मजबूत होणे शक्यच नाही असे असताना आतापर्यंत झालेल्या कामाच्या चाचण्या तपासण्याचे रिपोर्ट तात्काळ मागून झालेल्या कामाची चौकशी लावण्यात यावी अशी मागणी होत आहे.

हिंगोली- वसमत येथील पंचायत समितीचे बांधकाम कोट्यावधी रूपये खर्च करून करण्यात येत आहे परंतु या बांधकामासाठी कंत्राटदार निकृष्ट दर्जाच्या साहीत्याचा वापर करीत असल्यामुळे इमारतीचे भविष्य धोक्यात सापडणार आहे. वाळू ऐवजी चक्क डस्टचा वापर करतांना दिसत आहेत. याकडे वरिष्ठांनी लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

संक्षिप्त वृत्त

औंढा पोलिसांकडून नागरिकांना आवाहन

औंढानागनाथ- पोलीस स्टेशन औंढा ना हद्दीतील सर्व ग्रामस्थांना विनंती करण्यात येते की सध्या उन्हाळ्याचे दिवस चालू असून घराचे दरवाजे उघडे ठेवून घरातील लोक बाहेर झोपतात तसेच लग्नसराईचे दिवस असल्याने घराला कुलूप लावून लोक बाहेरगावी जात आहेत. या संधीचा फायदा घेऊन चोरटे घरातून मौल्यवान वस्तू चोरून नेऊ शकतात त्यामुळे घरात/कपाटात मौल्यवान वस्तू न ठेवता घरात न सापडणाऱ्या अडगळी च्या ठिकाणी ठेवावे किंवा बँक लॉकरमध्ये ठेवण्यात यावेत जेणेकरून आपले नुकसान होणार नाही.मागील काही दिवसापासून अशा घटना घडत आहेत. आपल्या गावामध्ये ग्राम सुरक्षा दल स्थापन करावे व रोज रात्री ११:०० ते ०५:०० वा पर्येंत अळीपाळीने रात्रीला सतर्क राहावे जर कोणी संशयितरित्या फिरताना मिळून आल्यास तात्काळ पोलीस स्टेशन औंढा येथे ८६६९९००६८३ या नंबर वर संपर्क साधावा अथवा डायल ११२ या क्रमांकावर फोन करावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक जी एस राहीरे यांनी केले आहे.

हिंगोलीत भगवान परशुराम जयंतीनिमित्त शोभायात्रा



हिंगोली- भगवान परशुराम जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सकल ब्राम्हण समाजाच्यावतीने दि १६ मे रोजी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे तसेच दि १० मे रोजी रेल्वे स्टेशन रोडवरील गायत्री भवनात सकाळी ११ वाजता सकल ब्राम्हण समाजाच्यावतीने भगवान श्री परशुराम जयंतीनिमित्त भगवान परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. दि १६ मे रोजी भगवान परशुरामांची भव्य शोभायात्रा दत्त मंदिर मंगळवारा येथून सायंकाळी ४ वाजता निघणार आहे. शहरातील प्रमुख मार्गावरून शोभायात्रेचा गायत्री भवन येथे समारोप होणार असून याठिकाणी विधिवत पूजा, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमास मोठ्या संख्येने ब्राम्हण समाजाने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



हिंगोली- येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात बांधकाम करण्यात येणार असल्यामुळे हे मैदान आता खेळाडूंसाठी बंद करण्यात आले आहे. छाया- सुनील पाठक

रस्त्याचे काम संथगतीने, फुटकळ व्यापाऱ्यांवर उपासमारीची वेळ

तभा वृत्तसेवा
औंढा नागनाथ, ८ मे

येथे विकास योजनेअंतर्गत रेस्ट हाऊस ते नागनाथ मंदिरापर्यंतच्या रोडचे बांधकाम होत असून हे बांधकाम तहसील परिसरातही सुरू असल्याकारणाने तहसील परिसरातील असलेली सर्व दुकाने उठवण्यात आली असल्यामुळे त्या व्यवसायिकावर मात्र उपासमारीची वेळ आल्याचे दिसून येत आहे.

तहसील परिसरात पंचायत समिती, न्यायालय, भूमी अभिलेख कार्यालय रजिस्ट्री ऑफिस, मुख्य उद्यान असल्याकारणाने या परिसरात झेरॉक्स सेंटर, कॉम्प्युटर जॉबवर्क, टायपिंग सेंटर, नोटरी कार्यालय तसेच वकीलांचे पर्सनल कार्यालय, बौंड विक्रेत्यांचे दुकाने, छोटी मोठी हॉटेल आदी व्यवसाय चालू होते दरम्यान या रोडवर बांधकाम चालू केल्याने या सर्व दुकान धारकांच्या दुकानांना उठवण्यात आले. त्यामुळे सर्व कार्यालयात येणाऱ्या लोकांची मात्र झेरॉक्स काढणे, कम्प्युटर जॉबसाठी तारांबळ उडाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक व्यवसायिक मात्र बेरोजगार झाल्याचे दिसून येत आहे सदर रोड हा कार्यालयाच्या परिसरात असल्याकारणाने या रोडवर सतत कर्मचारी वर्ग व उद्यानांकडे जाणारा मार्ग असल्यामुळे सामान्य जनतेला ये-जा करावी लागते त्यातच रोडचे बांधकाम चालू असल्यामुळे या रोडवर धूळ मतीने अक्षरशः जीव मेटाकुटीला येत आहे. संबंधीत गुत्तेदार मात्र या रस्त्याचे काम संथगतीने करीत असल्यामुळे सामान्य नागरिकांसह फुटकळ व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. पुढचा महिना हा विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा असल्याकारणाने तहसील परिसरात शैक्षणिक प्रमणपत्र साठी आणखीनच वर्दळ वाढणार आहे.या परिसरात कुठलेही झेरॉक्स जॉबवर्क दुकाने नसल्याकारणाने सामान्य जनतेचे हाल होणार असे दिसून येत आहे त्यामुळे सदर रोडचे काम जलद गतीने व्हावे अशी मागणी या मार्गावर असलेले व्यवसायिक व सामान्य जनतेकडून होत आहे.

चोंढी खुर्दमध्ये आकडे टाकून वीज वापरणाऱ्या ३२ जणांविरूध्द गुन्हा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ मे

सेनगाव तालुक्यातीील चोंढी खुर्द आणि चोंढी बुद्रुक येथे वीज वाहीनीवर आकोडे टाकून अनधिकृतपणे वीज वापरणाऱ्या ३२ जणांवर सेनगाव पोलिस ठाण्यात बुधवार दि ८ मे रोजी वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, सध्या वीज कंपनीकडून वीज देयकाची थकबाकी वसुली मोहीम सुरू आहे. या मोहीमेसोबतच ग्रामीण भागातील वीज वाहीनीवंर आकोडे टाकून वीज वापरणाऱ्यांची तपासणी देखील केली जात आहे. त्यानुसार वीज कंपनीचे सेनगाव उपविभागाचे अभियंता सत्यनारायण वडगावकर यांच्या पथकाने चोंढी बुद्रुक आणि चोंढी खुर्द येथे अचानक तपासणी मोहीम हाती घेतली. या तपासणीमध्ये धक्कादायक बाब पुढे आली आहे. गावातील एक दोन नव्हे तर तब्बल ३२ जणांनी वीज वाहीनीवर आकोडे टाकून अनधिकृतपणे वीजेचा वापर चालविल्याचे दिसून आले. याप्रकरणात अभियंता वडगावकर यांच्या पथकाने वीज वाहीनीवरील आकोडे टाकण्यासाठी वापरलेले केबल जप्त केले आहे. तसेच या गावकऱ्यांना दंडासह वीजेचे देयक भरण्याच्या सुचना दिल्या होत्या. मात्र त्यानंतरही या गावकऱ्यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अभियंता वडगावकर यांनी बुधवारी सेनगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

यावरून पोलिसांनी आत्माराम काळे, साहेबराव भालेराव, सुभाष काळे, दिलीप खिल्लारे, लक्ष्मण काळे, कैलास बनसोडे, मधुकर बनसोडे, ईश्वर बनसोडे, विजय काळे, संतोष वायचाळ, विठ्ठल शिंदे, रामेश्वर कंवर, रामेश्वर काळे, अमोल बनसोडे, सोनु गोडे, अविनाश साळवे, जनार्दन काळे, गजानन जाधव, संजय काळे, लक्ष्मण इंगोले, दामोदर झाडे, यशवंत मोरे, गंगाराम शिंदे, नामदेव काळे, लक्ष्मण निवृत्ती काळे, लक्ष्मण अंभोरे, नारायण तांबोळी सर्व रा चोंढी खुर्द तसेच गौतम भालेराव, बंडू खिल्लारे, त्र्यंबक काळे रा. चोंढी बुद्रुक यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या अधिकाऱ्यानेच केला १३ लाखांचा अपहार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ मे

सेनगाव येथील एका फार्मर प्रोड्युसर कंपनीमध्ये सीईओ पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याने १३ लाखांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्याने ११ शेतकऱ्यांचा २३२ क्विंटल हरभरा परस्पर विक्री केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्याच्याविरूध्द मंगळवार दि ७ मे रोजी रात्री उशिरा सेनगाव पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, सेनगाव येथे शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी-विक्री करण्यासाठी स्मृती महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी स्थापन करण्यात आली आहे. या कंपनीकडून शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी करून त्यांना योग्य भाव दिला जातो. याठिकाणी खरेदी केलेला शेतीमाल नाफेडकडे दिल्यानंतर त्यातून कंपनीला कमीशन मिळते शिवाय शेतीमालासही चांगला भाव मिळतो. त्यामुळे हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी याठिकाणी हरभरा विक्री केला होता.

दरम्यान, या कंपनीचे सीईओ म्हणून कार्यरत असलेला सुरज प्रताप मोरे रा वरूड चक्रपान याने दि १६ मे २०२३ ते दि ११ सप्टेंबर २०२३ या कालावधीत या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी केला. मात्र सदर खरेदी केलेला हरभरा नाफेडकडे पोहोचविण्याऐवजी त्याची परस्पर विक्री केली. यामध्ये ११ शेतकऱ्यांचा २३२ क्विंटल हरभरा पिकाचा समावेश आहे. त्यातून आलेल्या १३ लाख रूपयांचा अपहार केला. दरम्यान, याठिकाणी विक्री केलेल्या हरभरा पिकाचे पैसे अद्याप बँक खात्यात जमा का झाले नाही अशी विचारणा करण्यासाठी शेतकरी कंपनीच्या खरेदी केंद्रावर आले होते. मात्र सुरूवातीला सुरज याने त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर शेतकऱ्यांनी नाफेडकडे हरभरा विक्रीच्या पैशाची चौकशी केली असता नाफेडकडे हरभरा आलाच नाही असे सांगण्यात आले. यावरून सुरज याने कंपनी आणि शेतकऱ्यांची फसवणुक केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी कंपनीचे कर्मचारी शेकुराव हागवणे यांनी तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरकुल लाभार्थ्यांना गोळेगाव वाळू डेपोतून वाळू पुरवठा करा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ मे

तालुक्यामध्ये ग्रामीण भागामध्ये घरकुल योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात घरकुल बांधकामाचे कामे चालू आहेत. घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळत नसल्याने घरकुलाची कामे रखडली आहेत. घरकुल बांधकामसाठी वाळू उपलब्ध करून द्या अशी मागणी रिपब्लिकन सेनेने तहसीलदारांकडे केली आहे.

तालुक्यामध्ये व संपूर्ण ग्रामीण भागामध्ये रमाई आवास योजना व शबरीची घरकुलाची कामे चालू आहेत. परंतु त्या कामांना वाळू मिळत नसल्यामुळे अपुरे आहेत. पंचायत समिती विभागाकडून वारंवार लाभधारकांना सांगण्यात येत आहे की लवकर घरकुल पूर्ण करावे. परंतु वाळू नसल्याकारणाने अनेक लाभार्थी हतबल आहेत. अनेक ठिकाणी वाळूचे लिलाव बंद असल्यामुळे अवैध मार्गाने वाळू एक ट्रॅक्टर पाच ते सहा हजाराला मिळत आहे. सामान्य माणसाच्या खिशाला न परवडणारा हा खर्च आहे. त्यामुळे गोळेगाव येथील वाळू डेपोवर तहसील प्रशासनाने वाळूचा खूप मोठा स्टॉक केला आहे. परंतु हा स्टाक घरकुल धारकांसाठी आहे की वाळू माफियासाठी आहे.

मागच्या वर्षी वाळू माफियानी बोगस आधार कार्ड नोंदणी करून पुर्ण वाळु डेपो लुटण्याचा प्रकार घडला होता. लाभार्थी यांना एक ब्रास रेतीचा लाभ मिळाला नाही आता प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून गरिबांना घरकुलासाठी वितरीत करण्यासाठी प्रयत्न करावेत. तालुका प्रशासनाने याविषयी योग्य पाऊल उचलावे लाभार्थ्यांना ग्रामपंचायत मार्फत किंवा तलाठ्या मार्फत या वाळूचे वाटप करावे अन्यथा रिपब्लिकन सेनेच्यावतीने गोळेगाव वाळु डेपोवर आंदोलन करुन थेट वाळु घरकुल लाभार्थ्यांना देण्याचा इशारा निवेदनातुन दिला आहे. या निवेदनावर रिपब्लिकन सेना युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, कपिल साखरे, नितीन गव्हाणे, विनोद जोगदंड, मनोज मुळे, राहुल पुंडगे यांच्या निवेदनात स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान शासनाने केवळ वाळू डेपो उभारण्याचा सोपस्कार केला आहे. याचा लाभ सर्वसामान्यांना मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

लातूर
दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

विजयवैभवलक्ष्मी माता मंदिराचा शुक्रवारी वर्धापन दिन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मे -

जुळे सोलापूर भागातील श्री विजयवैभवलक्ष्मी माता मंदिराचा १८ वा वर्धापन दिन शुक्रवार १० मे रोजी इंडियन मॉडेल स्कूल समोर पाण्याच्या टाकीजवळ जुळे सोलापूर येथील श्री विजयवैभवलक्ष्मी मंदिर येथे होईल.

त्यानिमित्ताने मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम होतील. शुक्रवार दि. १० मे रोजी पहाटे ५ ते सकाळी ८.३० वा. पर्यंत रुद्र पठणाने क्षिराभिषेक, पंचगव्याभिषेक, पंचामृताभिषेक त्यानंतर विशेष अलंकार महापुजा होणार आहे. सकाळी ९ वाजता महाआरती, सकाळी ९.३० ते १२.00 वाजेपर्यंत श्रीसुक्त हवन होईल. दुपारी ३ ते ४.३० वाजेपर्यंत भजनाचा कार्यक्रम, दुपारी ४.३० ते ५.३० वाजेपर्यंत देवी सहस्त्र नामावली कुंकुमअर्चना, सायंकाळी ६.00 वाजता मातेची पालखी मिरवणुक (मंदिर प्रदक्षिणा), सायंकाळी ६.३० वाजता भव्य दिपोत्सव कार्यक्रम होईल. त्यानंतर विशेष महाप्रसादाचे आयोजन करण्यात केले आहे. भक्तांनी उपस्थित राहून दिप प्रज्वलित करुन मातेचा शुभाशिर्वाद घ्यावा असे आवाहन जोकारे, सोलापूरे व भोगडे परिवारांकडून केले आहे.

दैठण्यातील महिलांचा लोकशाही उत्सवात उत्स्फूर्त सहभाग

दैठणा, दि. ८ मे-

लातूर जिल्हा लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये दैठणा (ता. शिरूरअनंतपाळ) येथील महिला मतदाराकडून उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवण्यात आला सकाळी मतदान सुरू झाल्यानंतर उन्हाची तीव्रता जशी वाढत गेली त्याचा मतदारांचा घराच्या बाहेर पडण्याचा कल थोडा कमी होत गेला दुपारनंतर मात्र पुरुष महिला तरुण अशा अनेक गटातील मतदाराकडून मतदान प्रक्रियेमध्ये हिरहिरीने सहभाग नोंदविण्यात आला छायाचित्रातील सर्वात ज्येष्ठ मतदार या श्रीमती भारतबाई बापूराव बिरादार या आहेत.तर स्वतःच्या आयुष्यात पहिल्यांदाच मतदानाचा अधिकार नोंदवून राष्ट्रहितामध्ये सहभाग नोंदवणाऱ्या मतदार म्हणून सह्याद्री राजनारायण बिरादार या आहेत तर या सोबतच केशरबाई माधवराव, बिरादार सुरेखा, भीमसेन बिरादार, शीला राजनारायण, बिरादार शितल, चंद्रशेखर बिरादार या महिलांकडूनही मतदानाचा अधिकार हा चोखपणे बनवण्यात आला

उत्सव समिती
महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना

जागतिक परिचारिका दिनानिमित्त लातुरात रक्तदान शिबीराचे आयोजन

लातूर, दि. ८ मे-

परिचारीका दिनानिमित्त परिचारीका सप्ताहानिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यानिमित्त ६ मे १२ हे याकाळात परिचारीका सप्ताहानिमित्त परिचारीकासाठी विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विलासराव देशमुख शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालयातही आज, महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना,शाखा लातूर संचलित-उत्सव समितीच्या वतीने परिचारीका सप्ताहाचे उद्घाटन सकाळी मुख्य अधिसेविका, श्रीमती अमृता पोहरे व सहाय्यक अधिसेविका श्रीमती लक्ष्मी आपटे यांच्या हस्ते व संघटना व उत्सव समितीचे पदाधिकारी व सभासदांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यांनंतर ५0 वर्षांवरील वयोगटासाठी मिनी मॅरेथॉन व इतरांसाठी धावणे, संगीत खुर्ची बॅडमिंटन, कॅरम, चेस इत्यादी क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत सर्व वयोगटातील परिचारीकांनी सहभाग घेतला. दुपारनंतर रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात आज २0 रक्त बॅगांचे संकलन करण्यात आले. येत्या १२ तारखेपर्यंत परिचारीकांना रक्तदान करणार आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेच्या राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे, छाया चव्हाण, संजीव लहाने, दिपक सोळंके, पांडुरंग गव्हाणे, दिपक शिंदे, विवेक वागलगावे, संभाजी केंद्रे, भगवान केंद्रे, मीना दैवज्ञ, परिमला उबाळे, संतोष पाटील, शारदा खोब्रागडे, रुबिना शेख, सुनंदा चिलगर, शोभा जाधव, योगेश वाघ, सुनिता डावकर, श्रीमती कल्पना गायकवाड, पुष्पा जावळे, गुणा बनसोडे, प्रिया गोमारे, अभिशक्ती पवार, ज्योत्स्ना पेरके, रुपाली वाघमारे, राणी जाधव, शलाका मोरे, निशा जाधव, प्राची मुसळे, सतिश करे,श्री किशोर पांचाळ, जगन्नाथ कोरके, भागवत देवकत्ते, बाळू बन, शुभम वानखेडे, कृष्णा देवगुडे, सुधाकर केदार, अमित मलिशे, समर्थ कोरे, विक्रांत हुलसुरे यांनी परिश्रम घेतले.

अभिनव उपक्रमांनी साजरा झाला लोकशाहीचा उत्सव

वडवळ (ना.), जानवळ, ब्रम्हवाडी, लोदगा, निलंग्यात मतदारांचा उत्साह

तभा वृत्तसेवा,
लातूर, दि. ८ मे-

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हाभरात मतदारांचा उत्साह होता. चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ इथे बीज वाटप, जानवळ इथं श्वानांची माहिती, ब्रम्हवाडी इथं पारंपरिक वेशात महिलांची मतदान केंद्रावरील उपस्थिती, औशातील लोदगा इथं बांबूपासून वस्तूंची निर्मितीवर आधारित मतदान केंद्र आणि निलंग्यात तृणधान्याचे महत्त्व पटवून देणारे मतदान केंद्र आदी अभिनव नवोपक्रम राबविण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांपासून दिव्यांग, नवमतदारांनी या उपक्रमांचे कौतुक करत भरभरून प्रतिसादही दिला.

चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथील जिल्हा परिषद प्रशालेतील मतदान केंद्रावर संजिवनी बेटाची माहिती फलकांद्वारे प्रदर्शित करण्यात आली होती. संजिवनी बेटावर असलेल्या विविध वनस्पती त्यांचे पर्यावरणीय महत्त्व आदी बाबींचा यामध्ये समावेश होता. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदार उत्साहाने सहभागी होत होते. या मतदान केंद्रांवरील मतदारांना मतदानानंतर विविध प्रजातींच्या बियांचे वाटप याठिकाणी करण्यात आले. या उपक्रमांचा शुभारंभ तहसीलदार नरसिंग जाधव यांच्याहस्ते झाला. याप्रसंगी रेणापूर येथील पर्यावरण प्रेमी शिवशंकर चापुले, मंडळ अधिकारी श्याम कुलकर्णी, तलाठी शंकर लांडगे आदींची उपस्थिती होती.

वनौषधीची माहिती सामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. 'झाडे लावा झाडे जगवा' याप्रमाणे प्रत्येकाने कृती करायला हवी. मतदान केंद्रांवर देण्यात आलेल्या बियांची रूजवण करून रोपटांची निगा राखण्याचे आवाहन श्री. जाधव यांनी यावेळी मतदारांना केले. त्याचबरोबर चापुले यांनी मतदानाच्या दिवशी वडवळ नागनाथ याठिकाणी मतदान केंद्रावरील वनौषधींची माहिती याबाबतची पार्श्वभूमी सांगितली.

जानवळ येथील जिल्हा परिषदेच्या केंद्रीय प्राथमिक शाळेत पश्मी, कारवान या विशेष प्रजातींच्या श्वानांची माहिती असलेले फलक मतदान केंद्रावर लावण्यात आले होते. इथल्या श्वानांची प्रजाती उत्तम म्हणून ओळखल्या जाते. अतिशय हुशार, दिसायला देखणी अशी पश्मी श्वान असतात. ही अफगान जातीचे असतात. शिकार, शेतीची राखणदारी ही प्रजात उत्तम करते. मागील पाच-सहा पिढ्यांपासून श्वानांचे पालन आमच्या कुटुंबात केले जाते, असे गावचे नागरिक तानाजी पवार यांनी मतदानानंतर सांगितले. गावात ४00 हून अधिक नागरिक श्वान विक्रीपासून उत्पन्न मिळवतात. यापैकीच एक असलेला अतुल काळे या युवकाने कारवान या श्वानाबाबत माहिती दिली. तिन्ही ऋतूमध्ये तग धरणारी प्रजाती कारवान आहे. शिकारी, राखणदारीसाठी कारवान प्रजात उत्तम आहे.

चाकूर तालुक्यातील ब्रम्हवाडी येथे मतदान अधिकारी, कर्मचारी यांनी मतदारांना गूळ आणि पाणी देऊन स्वागत केले. तर येथील महिला मतदारांनी पारंपरिक वेशात येऊन मतदानाचा हक्क बजावला. निलंग्यातील सखी मतदान केंद्रांवर पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या सुषमा एखंडे म्हणाल्या, सखी मतदान केंद्रावर उन्हापासून सावली, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या सुविधांबाबत माहिती देण्यासाठी कर्मचारीही उपलब्ध असल्याने समाधान लाभल्याचे मत श्रीमती एखंडे यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील मतदान केंद्रावर आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षाच्या उपक्रमावर आधारित तृणधान्याचे महत्त्व विषद करणारी माहिती, प्रतिकृती तयार करण्यात आली होती. पारंपरिक तृणधान्याचे दैनंदिन जीवनात महत्त्व असून तृणधान्याचा वापर करण्याचा संदेश या मतदान केंद्राच्या माध्यमातून देण्यात येत असल्याचे निलंग्याचे सहायक निवडणूक अधिकारी शरद झाडके यांनी सांगितले.

लोदग्यात बांबूच्या वस्तूंचे प्रदर्शन

उस्मानाबाद सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीतील औसा तालुक्यातील लोदगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मतदान केंद्र क्रमांक ३0 वर बांबूपासून निर्मित वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वाहनाचाही समावेश होता. किनीथोट येथील मंडळ अधिकारी टी.डी.चव्हाण यांनी मतदारांना बांबूच्या वस्तूंची माहिती मतदान केंद्रावर दिली. शेतकऱ्यांना परवडणारा असे बांबू उत्पादन असल्याचे या प्रदर्शनातून सांगण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले. मतदारांनीही या प्रदर्शनाबरोबरच याठिकाणी उभारलेल्या सेल्फी पॉइंटचाही लाभ घेतला

नवमतदारांमध्ये उत्साह

यंदा पहिल्यांदाच मतदान करणारा जानवळ येथील जगदीश पाटील म्हणाला हा मतदानाचा अनुभव माझ्यासाठी खास होता. श्रीमती एखंडे, लोदग्यातील मोहिनी गायकवाड, अनुप सुरवसे, निलंग्यातील प्रणव तरंगे यांनीही पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावला.

आ.देशमुख यांनी मानले पदाधिकारी, बुथप्रमुखांचे आभार

तभा वृत्तसेवा,
लातूर दि. ८ मे-

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. ८ मे रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बुथप्रमुख यांची भेट घेऊन लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीच्या विजयासाठी मेहनत घेतल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातील लातूर शहर निलंगा उदगीर शहर विधानसभा मतदारसंघ निहाय मतदानाचा आढावा घेऊन आपल्या बुथवर ८0 टक्के मतदान करून घेतलेल्या बूथ प्रमुखांचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोइज शेख, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, माजी महापौर दीपक सूळ, काँग्रेसचे लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक सर्जेराव मोरे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, उदगीर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक रवींद्र काळे, उदगीर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी चंदन पाटील नागराळकर, प्रा.शहाजी मुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर तालुकाप्रमुख चंद्रकांत टेंटोल, शहरप्रमुख अनिल पंचाक्षरी, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडीले, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, उपसभापती प्रीती भोसले, प्रा. प्रवीण कांबळे, संतोष देशमुख, माजी नगराध्यक्षा उषा कांबळे, डॉ.जी.बी. सोनकांबळे, सचिव अभय साळुंके, मंजूरखान पठाण, सचिन बंडापले, महेश काळे, डॉक्टर अरविंद भातंबरे, चक्रधर शेळके, गिरीश ब्याळे, अंगद वाघमारे, पंकज शेळके, महेश देशमुख, पद्माकर उगिले, विजयकुमार साबदे, फारुक शेख, आबासाहेब पाटील उजेडकर, पुनित पाटील, माजी सभापती अजित माने, विजयकुमार पाटील, व्यंकटेश पुरी, प्रवीण सूर्यवंशी, राजा माने, अशोक कोरे, बसवराज मठपती, संतोष बिरादार, दत्ता सुरनर, अशोक गोविंदपुरकर, सपना किसवे, एन.आर. पाटील, आनंद पवार, दिलीप पाटील नागराळकर, रवींद्र कोरे, जगदीश बाहेती, राजकुमार पाटील, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, असिफ बागवान, कैलास कांबळे, अहमदखा पठाण, राजा माने, अभिजीत अंकलकोटे, बसवंतआप्पा भरडे, दगडूआप्पा मिटकरी, गोविंद डुरे, चंद्रकांत मद्दे, विजय गायकवाड, विवेक जाधव, हर्षवर्धन सवई, यशपाल कांबळे, तबरेज तांबोळी, खाजा शेख, विष्णुदास धायगुडे आदींसह विविध पदाधिकारी कार्यकर्ते, बुथप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी घेतला निवडणुकीचा आढावा

महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचे केले कौतुक

तभा वृत्तसेवा,
लातूर दि. ८ मे-

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची आशियाना निवासस्थानी काँग्रेस महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली त्यांचा सत्कार केला नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीचा आढावा घेतला सर्व आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी निवडणुकीतील केलेल्या कार्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी कौतुक करून कार्यकर्ते पदाधिकारी यांनी अतिशय सुंदर नियोजन करत मतदारापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले.तसेच आगामी काळात होणाऱ्या सर्व निवडणुकीत याच पद्धतीने सर्वजण मिळून काम करू या अशा शब्दात माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांचे कार्याचे कौतुक करत सर्वांचे आभार व्यक्त केले.

यावेळी उदगीर तालुका कोंग्रेसचे अध्यक्ष कल्याण पाटील उदगीर कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष शिवाजी मुळे,युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंदन पाटील नागराळकर, श्रीकांत पाटील, माजी नगराध्यक्षा उषा कांबळे, बाजार समितीच्या उपसभापती प्रीती भोसले, शहर कोंग्रेसचे अध्यक्ष मंजुरखा पठाण, बाजार समितीचे संचालक संतोष बिरादार,संचालक बाहेती, संचालक कोरे, नाना ढगे यांच्यासह उदगीर तालुक्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते सरपंच सोसायटीचे चेअरमन आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उदगीर कोंग्रेसचे निरीक्षक रवींद्र काळे, माजी आमदार ॲड. त्रिंबक भिसे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, इंदिरा सूतगिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम उपस्थित होते.

हासेगाव फार्मसीत 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'

तभा वृत्तसेवा,
औसा, दि.८ मे-

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेअंतर्गत आयक्यूएसी-लातूर कॉलेज ऑफ फार्मसी हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर आणि चन्ना बसवेश्वर कॉलेज लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. संस्थाध्यक्ष भिमाशंकर बावगे काय्रक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पुणे येथील आरोग्य लाभ फाऊंडेशनचे संचालक एस.बी. भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे ,प्राचार्या डॉ. श्यामलीला बावगे, प्राचार्य श्रीनिवास भूमरेला उपस्थित होते.

फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामातून शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यात आणि शैक्षणिक संस्थांमध्ये सतत सुधारणा घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावता येते. याचबरोबर या कार्यक्रमातून शिक्षकांना सशक्त करण्यासाठी व नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी अद्ययावत पध्दती घेता येतात, असे मत कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाची सुरवात सरस्वती प्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर पाच दिवसीय फॅक्रल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामने सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमातील पहिल्या दिवशी नाशिक येथील रॅप अनॅलिटीकल रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग सेंटरचे संचालक रोहन पवार यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी एस.बी.भिसे यांनी शिबिरा अंतर्गत प्राद्यापकांना टीचिंग कशा प्रकारे करायची व कोणती पद्धत वापरायची याबद्दल प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर तिसऱ्या दिवशी पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.आत्माराम पवार यांनी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये नॅशनल एज्युकेशन पॉलिसीबद्दल माहिती सांगितली. वाय.बी. कॉलेजचे प्राचार्य डॉ.एम.ए. देहगण यांनी एन.बी.ए. न्याक आणि नॅशनल एज्युकेशन पॉलीसीबद्दल माहिती सांगितली. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.एस.बी.बोथरा यांनी पी.एच.डी आणि थेसिस याविषयावर मार्गदर्शन केले. सोलापूर येथील आधार लाईफ सायन्स रिसर्च लॅबने भेट देऊन इन्स्टमेंट हॅन्डलिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. पाचव्या दिवशी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये सहभागी झालेल्या सर्व प्राद्यापकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. लातूर कॉलेज ऑफ फार्मसी हासेगाव महाविद्यालयासह, ज्ञानसागर विद्यालय, लातूर कॉलेज ऑफ डी फार्मसी, राजीव गांधी पॉलिटेक्निक कॉलेज, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर कॉलेज ऑफ औधोगिक प्रशिक्षण संस्था, गुरुनाथ अप्पा बावगे इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, लातूर कॉलेज ऑफ सायन्स या सर्व युनिटचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. आयेशा पटेल यांनी केले.

रस्त्यासाठी सुनेगाव सां. ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

तभा वृत्तसेवा,
अहमदपूर, दि.८ मे-

नागपूर ते तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील अहमदपूर पासून १0 कि.मी. असलेल्या सूनेगव (सांगवी) या अंदाजे एक हजार लोकवस्ती असलेल्या गावास महामार्ग लगत सर्विस रोड देण्यात आला नसल्याने गावकऱ्यांना अवाजाई करण्यासाठी अडचणी येत आहेत. यामुळे येथील ग्रामस्थांनी दि ७ मे रोजी लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकला.

अधिक माहिती अशी तालुक्यातील सुनेगाव (सां) येथील ग्रामस्थांनी गावासाठी राष्ट्रीय महामार्ग ३६१ वर जोड रस्ता, प्रवासी थांबा उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी मागील एक वर्षांपूर्वी करून सुद्धा ती पूर्ण झाली नसल्याने गावकऱ्यांना हा मतदानावर बहिष्कार टाकावा लागला. या संदर्भात गावकऱ्यांनी दि. २४ एप्रिल रोजी अहमदपूर उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर यांना वरील मागणी संदर्भात निवेदन दिले होते.त्यानुसार मागणी मंजूर झाली नाही किंवा प्रत्यक्षात काम चालू नाही झाले तर दि ७ मे रोजी होणाऱ्या लोकसभा मतदानावर सामूहिकपणे, समस्त गावकरी बहिष्कार टाकणार असे निवेदनात नमूद करण्यात आले होते.

सुनेगाव हे गाव महामार्गावरून पूर्व दिशेला अर्धा कि.मी. असून गावातील जवळपास ९0% शेतकऱ्यांच्या शेत जमिनी या महामार्गाच्या पश्चिम दिशेला आहेत. शेतकऱ्यांना बैलगाडी, ट्रॅक्टर, मोटार सायकल व शेतीपूरक अवजारांची ने-आण करण्यासाठी सुनेगाव पासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या रुद्धा पाटीपर्यंत जावून परत सुनेगावकडे जात शेतीकडे जावे लागत आहे. तर शेतातून परत घरी जाण्यासाठी दोन किलोमीटर सांगवी फाट्यापर्यंत जाऊन परत गावाकडे दोन कि.मी. यावे लागत आहे. तसेच बस थांबा नसल्यामुळे महिलांना, शाळकरी मुलांना अडचणींना रोजच सामना करावा लागत आहे. वैतागलेल्या

सर्व ग्रामस्थांनी वारंवार या मागणीसाठी शासन, प्रशासनास लेखी, तोंडी, निवेदनाद्वारे रस्ता रोको केलेला असूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने दि. ७ रोजी लोकसभा मतदानावर बहिष्कार टाकला होता. गावात ४७७ मतदार असून २५६ पुरुष तर २२१ महिला मतदार असलेल्या या गावात एकही मतदार मतदान केंद्राकडे फिरकला नाही.

प्रशासनाकडून दिवसभर ग्रामस्थांची समजूत काढण्याचा प्रयत्न झाला मात्र प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान अहमदपुरचे तहसीलदार शिवाजी पालेपाड, नायब तहसीलदार मधुकर शिरसागर यांनी मंगळवार दि.७ रोजी सकाळी ११ वाजता सदर गावात भेट देऊन ग्रामस्थांना एकत्र करून त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. निवडणुकीनंतर काम मार्गी लागेल याबाबत शास्वती देत बहिष्कार मागे घ्यावा अशी विनंती केली. परंतु त्यांच्या विनंतीस ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळालेला नाही.

या संदर्भात सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी मंजुषा लटपटे यांनी सांगितले की, दि. २४ एप्रिल रोजी सुनेगाव ग्रामस्थांनी वरील मागणी संदर्भात निवेदन दिले होते, ही बाब माझ्या अधिकारातील नसून मी राष्ट्रीय महामार्ग प्रशासित कार्यालयास पत्र पाठवून ग्रामस्थांच्या मागणी संदर्भात बोलले आहे. ग्रामस्थांना बहिष्कार हाच पर्याय नसल्याचेही आम्ही समजावून सांगितले होते पण परत दि. ६ मे रोजी रात्री ८:३0 वाजता ग्रामस्थांनी निवेदन दाखल केले. ग्रामस्थांना आम्ही सुचवलेला कोणताही पर्याय मान्य नसल्याने त्यांनी बहिष्कार कायम ठेवला.